नोंदणी क्रं. एफ.१६०९४(मुंबई)

महाराष्ट्र शासन
मराठी भाषा विभाग
राज्य मराठी विकास संस्था
एल्फिन्स्टन तांत्रिक विद्यालय, ३, महापालिका मार्ग,
धोबीतलाव, मुंबई - ४००००१ दूरध्वनी : (०२२) २२६३१३२५ / २२६५३९६६
संकेतस्थळ https://rmvs.marathi.gov.in इ-पत्ता rmvs_mumbai@yahoo.com

निवेदन

महाराष्ट्र राज्याचे सांस्कृतिक धोरण २०१० अंतर्गत मराठी भाषेतील प्रतिमुद्राधिकाराची (कॉपीराइटची) मुदत संपलेले दुर्मिळ ग्रंथ महाजालावर उपलब्ध करून द्यावे असे म्हटले आहे. त्यानुसार मराठी भाषा विभागाच्या आदेशाप्रमाणे (शासननिर्णय क्र. रासांधो १०१२/ प्र. क./२०१२/भाषा-३ दि. २८ मार्च २०१३) राज्य मराठी विकास संस्थेद्वारे असे ग्रंथ आणि नियतकालिके महाजालावर उपलब्ध करून देण्याचा प्रकल्प राबवण्यात येत आहे. त्याच बरोबर प्रतिमुद्राधिकाराच्या कक्षेत येणारी काही साधनेही प्रतिमुद्राधिकारधारकांची उचित अनुमती प्राप्त झाल्यास संस्थेद्वारे संगणकीकृत करून अभ्यासकांसाठी उपलब्ध करून देण्यात येत असतात.

सदर प्रकल्पांतर्गत **विदर्भ साहित्य संघ, नागपूर** ह्या संस्थेद्वारे प्रकाशित करण्यात येणाऱ्या **युगवाणी** ह्या नियतकालिकाच्या अंकांचे संगणकीकरण करून ते सार्वजनिकरीत्या आणि विनामूल्य उपलब्ध करून देण्यासंदर्भात उपरोक्त संस्थेला आवाहनपर विनंती करण्यात आली होती.

सदर विनंती मान्य करून विदर्भ साहित्य संघाद्वारे सदर अंक संगणकीकरणासाठी उपलब्ध करून देण्यात आले. हे अंक सदर संस्थेच्या सहकार्यामुळेच आपल्याला संगणकीय स्वरूपात उपलब्ध होत आहेत.

या अंकांच्या पीडीएफ प्रती आपण विनामूल्य उतरवून घेऊ शकता. असे करताना खालील सूचना लक्षात घेऊन त्यांचे पालन करावे.

१. सदर ग्रंथांच्या पीडीएफ प्रती या वैयक्तिक वापरासाठी विनामूल्य उतरवून घेता येतील तसेच इतरांनाही विनामूल्य देता येतील. पण कोणत्याही कारणासाठी त्याचा व्यावसायिक वापर करता येणार नाही.
२. सदर ग्रंथांचे दुवे इतरांना देताना त्यासाठी कोणतीही रक्कम आकारता येणार नाही.
३. पीडीएफ प्रतींवर असलेली राज्य मराठी विकास संस्था, मुंबई व विदर्भ साहित्य संघ, नागपूर यांची मुद्रा आपणास काढता येणार नाही.
४. आपल्या अभ्यासासाठी, संशोधनासाठी या सामग्रीचा उपयोग करताना आपण योग्य तो श्रेयनिर्देश केला पाहिजे.

वरील अटींचा भंग झालेला आढळल्यास कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

स्पष्टीकरण : सदर सामग्री ही केवळ ऐतिहासिक दस्तऐवज म्हणून उपलब्ध करण्यात आली असून या सामग्रीतून व्यक्त होणारी मते, विचारसरणी इ. त्या त्या लेखक, संपादक इ. कर्त्यांची आहे. त्यांपैकी कोणतेही मत, विचारसरणी इ. यांचा पुररस्कार महाराष्ट्र शासन, मराठी भाषा विभाग, राज्य मराठी विकास संस्था व विदर्भ साहित्य संघ, नागपूर यांपैकी कुणीही करत नसून त्या त्या मताचे वा विचारसरणीचे दायित्व उपरोक्त विभागांवर/ संस्थांवर असणार नाही.

सदर अंक केवळ अभ्यासकांच्या सोयीसाठी संगणकीय स्वरूपात उपलब्ध करण्यात येत असून अंकांतील सामग्रीचे (लेखन, मांडणी, छायाचित्रे, रेखाचित्रे इ.) प्रतिमुद्राधिकार त्या त्या लेखकांकडे अथवा प्रकाशकांनी त्या त्या वेळी केलेल्या व्यवस्थेनुसार आहेत ह्याची नोंद घेण्यात यावी. त्या सामग्रीसंदर्भातील कोणतेही अधिकार वा दायित्वे राज्य मराठी विकास संस्था, मराठी भाषा विभाग किंवा महाराष्ट्र शासन ह्यांच्याकडे असणार नाहीत.

अनुक्रमणिका

युगवाणी विशेषांक

ऑक्टो-६६ (केशवसुत)


अनुक्रमणिका

युगवाणी (Yugwani) Regd No. N(




शक : अ. ल. लिमये, सरचिटणीस, विदर्भ साहित्य संघ, झांशी राणी चौक, नागपूर–१२
मधुसूदन पांडुरंग बनहट्टी, नारायण मुद्रणालय, धनतोली नागपूर–१२

अनुक्रमणिका



कलादालनातील चित्रप्रदर्शन बघणारे बालरसिक



श्रीशिवाजी संदर्भ ग्रंथालयातील अभ्यासक

साहित्य संघाचे मुखपत्र

मूल्य : रु. १-५०

युगवाणी

वसुत-विशेषांक

माझ्या दुर्मुखल्या मुखामधुनि या,
चालावयाचा पुढें
आहे सुंदर तो सदा सरसवाङ्-
निष्यन्द चोहींकडे !
तुम्हीं नाहिं तरी सुतादि तुमचे
धातील तो प्राशुनी !
कोणीही पुसणार नाहिं, 'कवि तो
होता कसा आननीं ?'

अनुक्रमणिका

महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ–पुरस्कृत
विदर्भ साहित्य संघाचे मुखपत्र

युगवाणी

संपादक
मा. नी. गलगलीकर

वर्ष २१] आक्टोबर १९६६ [अंक ६

सूक्ति–धन

आम्ही कोण म्हणूनि काय पुससी ? — आम्ही असूं लाडके—
देवाचें, दिधलें असें जग तयें आम्हांस खेळावया;
विश्वीं या प्रतिभाबलें विचरतों चोहींकडे लीलया,
दिक्कालांतुनि आरपार अमुची दृष्टी पहाया शके !

सारेही बडिवार येथिल पहा ! आम्हांपुढे ते फिके;
पाणिस्पर्शच आमुचा शकतसे वस्तूप्रती द्यावया—
सौंदर्यातिशया, अशी वसतसे जादू करांमाजि या;
फोलें पाखडितां तुम्ही, निवडतों तें सत्त्व आम्ही निकें !

शून्यामाजि वसाहती वसविल्या कोणी सुरांच्या बरें ?
पृथ्वीला सुरलोक साम्य झटती आणावया कोण ते ?
ते आम्हीच सुधा कृतीमधुनिया ज्यांच्या सदा पाझरे;
ते आम्हीच शरण्य मंगल तुम्हा ज्यांपासुनी लाभतें !

आम्हाला वगळा–गतप्रभ झणीं होतील तारांगणें;
आम्हाला वगळा–विकेल कवडीमोलावरी हें जिणें !

—केशवसुत

कविता—

केशवसुतास

सारी चिद्-जड-सृष्टि, तेंवि हृदिच्या गूढोन्नता भावना
सत्तेचे मुकले जुळे मुलुख हे ध्येयें पुन्हा जिंकुनी
शाहीरी वतनें सनातन तुम्ही तेथें दिली स्थापुनी
सोडी प्राकृत तेधवाच कविता कोत्या जुन्या रंगणा.

केंद्री निश्चल बैसुनी बदलत्या विश्वाचिया, आपुली
वृष्टी व्यापक, तीव्र, गाढ, अभया, सीमावधी फेंकितां
जें जे सुंदर, दिव्य, अक्षय, हृदीं झेलीयलें सर्वथा
शब्दत्वीं फुलवूनि त्यास, अपुलीं गाणीं तुम्ही गुंफिली.

'भृंगी' गुंगत जी, फिरे गरगरां जी "वातचक्रा"सवें
जी 'स्फूर्ति' 'प्रतिभा' मिषें गरुडशी घे ठाव आकाशिचा
मेल्याहि मनिं नाचवी विनत जी कांक्षा 'तुतारी' रवें
राहे दिव्य-तृषार्तसा, "हरपल्या श्रेयांत" आत्मा जिचा.

शब्दीं नूतन अर्थविश्व उभवी जादू जिची निस्तुला
वाणी ती तुमची पुन्हा अवतरो साधावया मंगला.

—दामोदर व्यंकटेश घारपुरे, वर्धा

[श्री. श्री. वि. वर्तक ह्यांच्या 'तुतारी'चे पडसाद वरून पुनर्मुद्रित]

केशवसुत

काही लोकांना शाप असतो आजन्म दुःखात पिचण्याचा
पण सर्वंकष पीडेच्या जाणीवेचे भाग्य तुझे होते.

परंपरेच्या चार भिंतीत स्वर्ग सर्वांनाच दिसतो;
पण क्रांतीच्या आकाशाचे भाग्य केवळ तुझे होते.

अन्यायाने चिरडलेल्या प्रत्येक हतभाग्याच्या मुकेला
तुझ्या दयामय घासाचा खंबीर आधार होता.

सौभाग्याची काळी पोत शैशवातच गमावणाऱ्या तारुण्याच्या
दुःखामुळे तुझे डोळे जन्मभर पाणावत असत.

म्हणून अर्जुनाला मिळालेली दृष्टि तुझ्या दुःखाला होती;
तुझ्या प्रत्येक शब्दाची धार परशुरामाच्या आयुधाची होती.

अश्रूंना धैर्य देणाऱ्या तुझ्या तुतारीचा महानाद
भेडसावत राहिला जन्मभर नाजुक मैफलीतील लोकांस
ज्यांनी केली होती अपेक्षा केवळ शाहिरी नखऱ्याची.

पण आम्ही आज आदरयुक्त अभिवादन करतो;
व मागतो क्षमा कालच्या आमच्या अंधत्वाची !

—मनोहर वझे

(पुनर्मुद्रित युगवाणी मे-जून १९५९)

अनुक्रमणिका

केशवसुत

अंधारानंतर उजेड
क्रमच आहे सृष्टीतला.
सारस्वताचाच अपवाद कसा असणार ?
अशाच एका झुंजुमुंजू पहाटे
जागलेल्या एका मानवाला,
मराठी मातीतून जन्मलेल्या
मख्ख चेहऱ्याच्या कवीला
फुटला बोल—
"नव्या मनूतिल नव्या दमाचा
शूर शिपाई आहे !"
झाली काव्यक्रीडा आरंभ…
तोच तर प्रारंभ
नव्या मराठी कवितेचा,
भव्य दिव्य आविष्कार
एका नव्या जाणिवेचा.
वेड होते कवितेला
परमात्म्याचे नि परमार्थाचे;
पण नव्हती तमा त्याला
रूढीची वा परंपरेची
होती ओढ नव्याची
निसर्गाची अन् जीवनाची
सौंदर्याचा शोधक
स्वातंत्र्याचा पूजक
व्यक्तिस्वातंत्र्याचा पुरस्कर्ता
निसर्गाचा भक्त नि भोक्ता,
होता सर्व काही…!
रमणीयतेमागील गूढ सौंदर्य,
साध्या विषयातला सखोल आशय
अन् जीवनाचा गहन अर्थ
जाणले त्याने;
आणि उधळले माप
महाराष्ट्र भूमीत—
उदेले त्यातून
नव्या युगाचे नवे शिपाई !

—म. ना. लोही

केशवसुतांच्या कवितेतले वैज्ञानिक, आध्यात्मिक व सामाजिक सूर

प्रा. भवानीशंकर श्रीधर पंडित

केशवसुतांची कविता पुष्कळ प्रमाणात वैचारिक आहे. तिच्यात अधून मधून वैज्ञानिक, आध्यात्मिक व सामाजिक सूर कानी पडतात. याचे कारण ज्या एकोणिसाव्या शतकात त्यांचा जन्म झाला त्या शतकाच्या पूर्वार्धात इंग्लंडच्या जीवनावर व विचारांवर जॉन स्टुअर्ट मिल्ल याच्या उपयुक्ततावादाचा (Utilitarianism) आणि कॉम्टेच्या निश्चिततावादाचा (Positivism) प्रभाव होता; आणि त्या शतकाच्या मध्यापासून हर्बर्ट स्पेन्सरच्या अज्ञेयवादाचा (Agnosticism) आणि चार्लस् डार्विनच्या विकासवादाचा (Evolution) प्रभाव होता. इंग्लंडमधील या विचारकांच्या ग्रंथांची मराठीत भाषांतरे झाली होती. मिल्लच्या 'पोलिटिकल इकॉनॉमी'चे कृष्णशास्त्री चिपळुणकरांनी 'अर्थशास्त्राची मूलतत्त्वे' या नावाने, 'लिबर्टी'चे फडक्यांनी 'स्वातंत्र्य' या नावाने आणि 'सब्जेक्शन ऑफ वुमेन' याचे कानिटकरांनी 'स्त्रियांची परवशता' या नावाने भाषांतर केले होते. दामोळकरांच्या ग्रंथमालेतून स्पेन्सरच्या ग्रंथांची भाषांतरे झाली होती. त्या काळाच्या महाराष्ट्रीय सुशिक्षितात या वादांची (isms) चर्चा होत असे. आगरकरांच्या निबंधावर मिल्ल, स्पेन्सर व डार्विन यांच्या विचारसरणीचा पगडा आहे. इमर्सन् या अमेरिकन विचारकाच्या मतांवर देखील या वादांची छाया आहे इमर्सन् हा केशवसुतांचा आवडता ग्रंथकार होता. केशवसुतांच्या वाचनात तत्कालीन इंग्रजी व मराठी वैचारिक ग्रंथ होते. तेव्हा त्या वाचनाचा व व्यासंगाचा परिपाक त्यांच्या कवितेत उतरावा हे स्वाभाविक आहे.

केशवसुतांच्या जन्मापूर्वी सात वर्षे चार्विडान 'दी ओरिजिन ऑफ् स्पिसीज्' हा ग्रंथ प्रसिद्ध झाला होता. त्यात त्याने प्राणिशास्त्र व नीतिशास्त्र यांचा आधार घेऊन विकासवादाचा सिद्धान्त यशस्वी रीतीने प्रतिपादन केला आहे. त्याच्या सिद्धान्तानुसार निसर्गामध्ये सदैव वस्तुमात्रात व प्राणिमात्रात जीवनार्थ कलह चालू असतो. निसर्गाने दिलेल्या ज्या शक्तींचा प्राणी उपयोग करीत नाहीत, त्या शक्ती कालान्तराने गंजून झिजून नाश पावतात. शहामृग पंखांनी उडत नाही. त्यामुळे त्याचे पंख आता कुचकामी झाले आहेत. आता तो दोन पायांनी जनावराप्रमाणे पळत असतो. जीवनार्थ कलहात नैसर्गिक निवड असते. त्यात जो सर्व दृष्टींनी सुयोग्य असेल तो टिकाव धरून राहतो. जो अयोग्य असेल तो नष्ट होतो. सर्व चल व अचल, सजीव व निर्जीव सृष्टि एकदम उत्पन्न झाली नसून एकापासून एक जीवमात्र उत्पन्न होत होत ती आता सर्वोत्तम अशा मनुष्यप्राण्याच्या उत्पत्तीपर्यंत आली आहे. निसर्ग हा महान आहे. त्याच्या समोर मनुष्य लहान आहे. निसर्ग मुखस्तंभ आहे. मनुष्य मुखर आहे. निसर्गाचे रूप अवाढव्य व भव्य आहे, त्याच्या अमर्यादतेची मनुष्याला कल्पना येणे शक्य नाही. मनुष्य हा मर्यादांच्या बंधनात आहे. निसर्ग हा आपल्या नियमांचे मुकाट्याने परिपालन करीत असतो. त्या बाबतीत तो निष्ठुर आहे. मनुष्य ते नियम चुकवता आले तर पहावे म्हणून प्रयत्न करीत असतो. निसर्गाशी संघर्ष नको म्हणून करीत असतो. पण संघर्ष अटळ असतो.

केशवसुतांच्या काही कवितांत, निसर्गाशी तुलना केली तर मनुष्य हा यःकश्चित आहे, हा विचार आला आहे. केशवसुत निसर्ग व सृष्टि हे दोन्ही शब्द एकाच अर्थाने प्रयुक्त करतात. पद्यरचना करतांना यांपैकी जो शब्द पद्यात चपखल बसेल तो शब्द ते योजतात. 'सृष्टि आणि कवी 'त ते प्रश्न करतात; — 'वयस्या गाते ही मृदु घनरवे सृष्टि मधुर। कसा गाऊं तीच्या पुढति वद मी पामरनर ? 'भृंग' हा काही निसर्गाचा प्रतिनिधि आहे अशा कल्पनेने ते त्याला उद्देशून उद्गारतात; — 'भृंगा ! आणि तुझे गान। सृष्टीचे गमते कवन। गा, तूं गा, नादी भ्रमरा। मी गणमात्रा जुळणारा ? ' विकासवादाच्या सिद्धान्तानुसार 'पुष्प' आणि 'फुलपाखरू' ही दोघे अनेक अवस्थांतरातून निरनिराळी रूपे व रंग घेऊन आजच्या विकसित अवस्थेला प्राप्त झाली आहेत. 'पुष्प' कोमेजते आणि 'फुलपाखरू' मरते असे सामान्य दृष्टीला दिसते. परंतु विकासवादाचे तत्त्व ज्याच्या परिचयाचे आहे तो त्यांना निसर्गाप्रमाणे अजरामर मानतो. म्हणूनच केशवसुत 'पुष्पा 'स चिरतरुणा रे ! चिररुचिरारे ! ' असे संबोधतात व 'कालहि तुझिया दिव्यत्वाला-वाटे नमन करी ! ' असे निःशंक विधान करतात. आणि 'फुलपाखरा 'ची वनश्रीमधील निर्वेध हालचाल पाहून विचारतात; — 'सर्व विनाशी असती प्राणी; ही मज खोटी वाटे वाणी; फुलपाखरू-मरण पाहिले—आहे कां कोणी ?' 'म्हातारी' ला अनुलक्षून ते असेच उद्गार काढतात; —

'तव जनि, मृति न दिसे। अजामर रूप तुझे भासे.'

निसर्ग आपले कार्य करीत असतो. उत्क्रमण हा त्याचा स्वभाव आहे. तो बदलत नाही. मनुष्याला त्याच्याशी व काळाशी मिळतेजुळते घ्यावे लागते.

'तुतारी 'त केशवसुतांनी त्याचा निष्ठुर स्वभाव सांगितला आहे; —

'निसर्ग निर्घृण त्याला मुर्वत। नाही अगदी पहा कशाची ! । कालासह जी क्रीडा त्याची,। ती सकलांला समान जाची,। चुरली टाकी प्रचंड पर्वत ! ' इमर्सनने 'नेचर' मध्ये हा विचार मांडला आहे; — "Nature tyrannizes over our works. They must be conformed to her law or they will be ground to powder by her omnipresent activity." केशवसुत 'जुन्यातून जी निष्पत्ति नवी। काय नव्हे ती श्रेयस्कारक ? किंवा, 'जुने जाउ द्या मरणा लागुनि जाळुनि किंवा पुरुनी टाका,। सडत न एक्या ठायी टाका,।' अथवा, 'त्यांशी भिडुनी, झटुनि झगडत। उठवा आपुले उंच मनोरे'।—ही जी भाषा बोलतात, ती विकासवादाच्या तत्त्वाला अनुसरून बोलतात हे लक्षात घेणे आवश्यक आहे. या संदर्भातील 'नवे' व 'जुने' हे केशवसुतांचे शब्द कालवाचक नसून काळाच्या ओघात 'टिकून राहणारे' व 'नष्ट होणारे' या अर्थाचे द्योतक आहेत. केशवसुतांची भाषा अटपट व तोकडी आहे. त्यामुळे अनेक वेळा अर्थ एकदम लक्षात येत नाही.

निसर्गाच्या नियमांची अवहेलना हितकारक नाही हा विचार केशवसुतांनी 'समुद्राच्या काठाशी उभ्या असलेल्या तरुणीस' मध्ये देखील मांडला आहे;

'पयःस्था त्या देवी, फणिपतिसुता पंकजपदी,
स्वयंभू सृष्टीचे नियमचि सदा मानिति सुधी,
स्वयंभू सृष्टीचे नियम सुधरू पाहत असे
नराच्या ऐसा या कवण दुसरा मूर्ख गवसे ?'

हा विचार मांडताना त्यांनी या कवितेच्या बाराव्या श्लोकात स्त्रीपुरुषांचा समागम हा नैसर्गिक आहे पण लोक त्याला 'पाप' समजतात. वस्तुतः 'पाप' व 'पुण्य' या कल्पना लौकिक आहेत, नैसर्गिक नाहीत असे सूचित केले आहे; आणि या सूचनेतच स्त्रीपुरुषांची सामाजिक समता ध्वनित केली आहे.

विकासवादातील या सिद्धान्ताशिवाय केशवसुतांनी 'कवी 'त उद्भिज विज्ञानातील एका सिद्धान्ताचा उपयोग केला आहे. त्यात ते कवीच्या थोरवीचे वर्णन करताना म्हणतात; —" वनस्पती ज्याप्रमाणे हवेतला 'कर्बाम्ल' शोषून केवळ 'कार्बन' ठेवतात, आणि पृथक्करणानंतर तिच्यात 'प्राणवायू 'ला सोडतात, तेच कार्य कवि आपल्या श्वासोच्छ्वासांनी समाजासाठी करीत असतो."

केशवसुतांनी विकासवादाच्या सिद्धान्ताचा आपल्या कवितेत उपयोग केला. परंतु त्यामुळे समाजात खळबळ उडाली नाही. कारण तो सिद्धान्त आपल्याकडे फक्त काही सुशिक्षितांच्या परिचयाचा होता; आणि

केशवसुतांच्या कवितेचा प्रसादहि त्या वर्गापुरता मर्यादित होता. पण युरोपमध्ये त्या सिद्धान्ताने हाहाकार उडवला. तेथील समाजाचा ईश्वराच्या अस्तित्वावरील विश्वास उडाला; आणि आत्म्याचे अमरत्व डळमळित झाले. निसर्गाचा नियम निष्ठुर व कठोर आहे. तो मनुष्याच्या आशावादास धक्का देणारा आहे. त्या नियमान्वये वंशाच्या (Race) सुखासाठी व्यक्तीचे (individual) बलिदान आवश्यक असते; इतरांना सुख मिळावे म्हणून कुणास तरी दुःख सहन करावे लागते; अन्यांच्या अकल्याणाशिवाय कांहीचे कल्याण होत नाही. इतकेच काय, पण मनुष्याच्या स्वाभाविक श्रद्धेला विरोध करतांना निसर्गाचा हा नियम अधिकच जाचक व जुलमी वाटतो. कारण निसर्ग म्हणतोः "मला दयामाया नाही. मी व्यक्तीला, वंशाला, शरीराला किंवा आत्म्याला–कुणालाच वाचवीत नाही. केवळ विनाशासाठीच मी विकास करीत असतो. तुम्ही समजता की परमेश्वर आणि आत्मा चिरंतन आहेत; आणि निसर्ग, वस्तुजात व शरीर नश्वर आहेत. तुम्ही ज्याला आत्म्याचे अमृतत्त्व म्हणता ते मी जाणत नाही. मरणाबरोबर श्वास थांवतो आणि तो थांबला की शरीराबरोबरच आत्मा, असेल तर, नाश पावतो."

या विचारसरणीने युरोपातील धार्मिक विचाराच्या जनतेवर तर वज्रपातच झाला. परंतु बुद्धिवादी (Rational) जनही संशयाच्या डोहात गटंगळचा खाऊ लागले. केशवसुतात देखील ही साशंकवृत्ती आढळते. परंतु ते लवकरच तिच्या जाळयातून सुटलेले दिसतात. या विचारसरणीला पुष्कळ बुद्धिवाद्यांनी मान्यता दिली पण ती मनमोकळेपणाने दिली नाही.* हर्बर्ट स्पेन्सरने या वादाचा आधार घेऊन एक निराळीच मीमांसा केली. तिच्यामुळ अनेकांना धीर आला. इतिहास, प्राणिशास्त्र आणि नीतिशास्त्र यांचा आधार घेऊन स्पेन्सरने जी मीमांसा केली ती अशी;—"जड द्रव्यापासून तो सचेतन प्राण्यांतील श्रेष्ठ प्राणी जो मनुष्य त्याच्या समाजरचनेपर्यंत सर्व काही विकासवादाच्या तत्त्वानुसार परिणत होत गेले आहे. सर्व विश्वाची अन्तर्बाह्य रचना काही विवक्षित नियमानुसार झाली आहे; आणि आपणास त्या नियमांचे ज्ञान अमूक एका मर्यादेपर्यंत चांगले होते. त्या मर्यादेच्या पलिकडे मात्र आपले ज्ञान जाऊ शकत

(१) * राजकवि टेनिसन यांच्या 'इन् मेमोरिअम्' मध्ये ही साशंकवृत्ति आढळते.

'There lives more faith in honest doubt,
Believe me, than in half the creeds'

* *

Are God and Nature then at strife,
  That Nature lends such evil dreams ?
  So careful of the type she seems,
So careless of the single life;

*

So careful of the type ?' but no,
  From scarped cliff and quarried stone
  She cries, 'A thousand types are gone;'
I care for nothing, all shall go.
'Then makest thine appeal to me :
  I bring to life, I bring to death;
  The spirit does but mean the breath;
I know no more'............[LV & LVI.]

(२) केशवसुतांपेक्षा वींनी 'दीपज्योतीस'मध्ये एका विधवेस लक्ष्य करून तिची नैसर्गिक प्रसवशक्ति वाया कशी जाते हे या सिद्धान्ताच्या आधारे दाखविले आहे. त्यांच्या 'तीव्र जाणीव' आणि 'पूर्ण की अपूर्ण' मध्येही या सिद्धान्ताचा उपयोग केला आहे;—

'पूर्णोत्थापनकाल तोच पतनप्रारंभही होतसे
  ऐसा निष्ठुर कायदा सकल या सृष्टीस शासीतसे.
येथे नूतन, जीर्ण, रूप अथवा विद्रूप, नीचोत्तम,
  न्यायान्याय, अनीतिनीति, विषयीं संभोग का संयम;
जाती ही मरडोनि एक घरटी, एकत्र आक्रंदत

...

दाने दे न कुणा निसर्ग घन तो व्याजे तुम्हा देतसे
ते त्याचे ऋण टाक फेडुन गडे ! राजीखुशीने कसे
होता वेल रसप्रसन्न फुटुनी येतो फुलोरा तिला,
ती आत्मप्रतिमांस निर्मुनि हसे संहारकालानला;
'वाढा आणि जगा' निसर्ग म्हणतो सृष्टीस भूतात्मिका
[दीपज्योतीस]

* *

भागीदार कृतींत मानव असे कालानिसर्गासवे
  आणा त्यास समीप एकवटुनी यत्नप्रयत्नोत्सवें.
[तीव्र जाणीव]

नाही." स्पेन्सर मर्यादेतील ज्ञानाला knowable (ज्ञेय) आणि मर्यादेपलिकडील ज्ञानाला unknowable (अज्ञेय) अशा संज्ञा देतो. अज्ञेयाचे विवरण करण्याचा भार तो जुन्या आध्यात्मावर सोपवतो; आणि विज्ञानाचा आधार घेऊन स्वत: फक्त ज्ञेयाचे विवरण करतो. ज्ञेयात अन्तर्गतशक्तीला (Force or Energy) महत्त्व आहे. प्रकाश, उष्णता, ध्वनि, गति ही सर्व त्या शक्तीचीच भिन्न भिन्न रूपे आहेत. त्यांचे ज्ञान आपल्या आटोक्यातले आहे. ईश्वर, आत्मा. परलोक इत्यादिकांचे ज्ञान आपल्या आटोक्यातले नाही, तेव्हा त्यासंबंधी तो मुग्ध राहतो.

परंतु केशवसुतांच्या कवितेत या विचारासंबंधी मुग्धता नाही, अव्यक्त सृष्टीतील अमृतध्वनी त्यांच्या कानावर पडतात. अंतरातील तारकांत त्यांना आत्मे दिसतात. ते निर्जिवातला जीव पाहू शकतात. लोकांना फक्त काचेमधूनच दिसते. पण घोंडयाच्या "सर्ववस्तुषु" या उत्तराचे रहस्य लक्षात आणून ते त्याच्यातून मनोरम मूर्ती प्रकट करू शकतात. ज्ञानाच्या कुंपणावरून उड्डाण करून अज्ञातात गेलेल्या त्यांच्या प्रतिभेला अंधुक आकृतींच्या निगूढ गीती ऐकू येतात. शारदा त्यांना कानमंत्र देते आणि तिला रुचेल असे काव्य ते निर्माण करू शकतात. म्हातारी म्हणजे अज्ञातातला मूर्त ध्वनी आहे असे त्यांना वाटते. तिच्या स्वरूपाचे चिंतन करताना ते तत्काळ प्रत्यक्षातून परोक्षात प्रवेश करतात. 'हरपले श्रेय' शोधताना त्यांचे मन किरणातील अणूवरोवर परोक्षाकडे उडू लागते. मात्र कधीकधी त्यांना समुद्रावरले तरंगतांडव पाहून क्षणभर अज्ञेयावरती भासमान होणाऱ्या अस्तित्वाची आठवण येते. कधी कधी

'जड हृदयी जग जड हे याचा।
प्रत्यय होता प्रकटत साचा।
जड ते खोटे, हे मात्र कसे।
ते न कळे मज, जडलेच पिसे'

अशी समस्या न सुटून वेड्यागत स्थिति होते. कधीकधी

'भोगांची अवशिष्टे तुसे।
घशात खुपती, लागे पिसें; ।
मागे पुढे न कांही दिसे; ।
संशयडोही नौका फसे; ।
मग वदे–हरे राम! रे,
करावें कसें? जिवलगे'

अशी त्यांची मन:स्थिति भ्रांत होते. पण हे सारे क्षणभरच! किंचित् विवेकशील चिंतनानंतर आपली विभूति स्फुरत विश्वात पसरून दिशा आणि काळ यांना अतीत झाली असून आपण उगमाशी व विलयाशी अनंत असल्याचा त्यांना अनुभव येतो. आपण तिमिरामधून तिमिरामध्ये म्हणजे अज्ञातातून अज्ञातात जात आहो असे त्यांना क्षणभर वाटते. पण दुसऱ्याच क्षणाला शून्यातील दीप्ति त्यांच्या दृष्टीस पडते आणि आपण आपल्या धामाकडून इथे ऋणे फेडण्यासाठी आलो असून, ती फिटल्यावर आपण पुन्हा आपल्या धामाकडे परत जाणार आहो याची त्यांना जाणीव होते. इतकेच काय, पण कालचक्रात उडणारी जिर्ण पर्णे पाहून त्यांच्या मनात येते की, आपण जगद्द्रुमाचे पिकलेले, गळावयास झालेले, असे जीर्ण पर्ण आहोत. ज्याला चिकटावे असे येथे आपले काय आहे! तेव्हा—

'वाटे गिरक्या घेत मिळावें–।
या पवनाच्या चक्रीं, होउनि लीन सच्चिदानंदात

या कवितांतील 'विभूति', 'धाम', 'ऋण', 'सच्चिदानंद' इत्यादी केशवसुतांची परिभाषा लक्षात घेतली की त्यांच्या भारतीय आत्म्याची ओळख सहज पटते. काही जणांना या कवितांचा संबंध आध्यात्माशी जोडणे अप्रस्तुत वाटते. असे वाटण्याचे कारण केशवसुतांनी या कवितांत पाश्चात्त्य व पौरस्त्य कल्पनांचा सुंदर समन्वय साधला आहे, त्यांचा आवडता अमेरिकन कवि इमर्सन् जर 'ब्रह्मा'वर व 'विष्णुपुराणा'वर कविता लिहितो आणि वर्डस्वर्थ जर आपल्या सुप्रसिद्ध ओड'मध्ये भारतीयांच्या पुनर्जन्मवादाच्या कल्पनेचा वापर करतो, तर मग केशवसुतांनी पूर्व आणि पश्चिम यांच्यातील कल्पनांची सांगड घातली असेल तर त्यात आश्चर्य कोणते?

केशवसुत नास्तिक होते असा एक प्रवाद आहे. पण त्यांच्या कवितांतील 'मत्कारणे स्तवुनि देव',

'द्वारी हरी या असे' किंवा 'प्रेमाने परमेश्वरास भजतो जो निर्मले मानसे! । लोटी निर्मल सौख्यसिंधु लहरी त्याचेवरी जीवित' यासारख्या ओळी वाचल्या म्हणजे तो प्रवाद खोटा आहे हे सहज पटते. केशवसुतांच्या युगात भारतीयांच्या जीवनामध्ये विज्ञानाचा प्रादुर्भाव नव्यानेच होत होता. तेव्हा त्यांच्या लेखनात जुन्या तत्त्वज्ञानाचा व नवीन विज्ञानाचा मिलाफ आढळतो. जिथे दशावतारांचा संबंध विकासवादाशी जोडण्यापर्यंत मजल जाते, तिथे केशवसुतांचा प्रयत्न तर नवीन आणि हृद्य म्हणून विशेष प्रशंसनीय आहे.

केशवसुतांच्या सामाजिक कवितांमागे मिल्लच्या मतांची प्रेरणा आहे. मनुष्यमात्र जन्माला येतात ते एकाच प्रकाराने येतात. त्यात उच्चनीच अशी विषमता नसते. परंतु पुढे समाजात ही विषमता निर्माण होते. त्यामुळे गोरगरिबांना कष्टात दिवस काढावे लागतात. जिथे दारिद्र्यामुळे त्यांना घड पोटालाही मिळत नाही, तिथे इतर आवश्यक बाबींच्या विचारास तरी जागा कुठे? त्यांच्या दुःखाला व दैन्याला कारण समाजातला मूठभर पैसेवाल्यांचा वर्ग आहे. पैशाची विभागणी जोपर्यंत सारखी होत नाही, तोपर्यंत समाजात दुःखी बहुजन आणि निवडक पैसेवाले असा भेद कायम राहणार अशी त्यांची धारणा आहे. सत्ता व कायदा हा पैसेवाल्यांचा पाठिराखा असतो. तेव्हा दीनांना न्याय मिळत नाही. हा अन्याय पाहून केशवसुत उद्‌गारतात;––

'मलाही या पृथ्वीवरील गमते गे जड जिणे ।
इथे या दुःखांचे सतत मनुजाला दडपणें! ।
इथे न्यायस्थानी अनय उघडा स्वैर फिरतो ।
नरालागी येथे नरच चरणांही तुडवतो ।'

मनुष्यच मनुष्यावर अत्याचार करतो ही कल्पना अस्पृश्यांच्या संदर्भात 'तुतारी'च्या एका पाठात पुनरुक्त झाली आहे;––

'पडली छाया मनुजाची जर ।
विटाळ होतो तर मनुजाला, ।
व्हावे स्नानचि सचैल त्याला; ।
काय म्हणावे या मूर्खाला?—।
नरेचि केला हीन किती नर'।*

विषमतेविरुद्ध आवाज उठवताना केशवसुतांनी क्वचित् विकासवादाचा आश्रय केला आहे. परंपरागत सामाजिक रूढीला ते दितीची कन्या, दुष्ट जुलूमी राणी, राक्षसी व कैदाशीण ही विरुदे बहाल करतात आणि लिहितात;—"रूढी राज्य करीत आहे. तिच्या जुलमी अंमलाखाली लोक नाडले जात आहेत, तरी ते सृष्टीच्या नियमांस अनुसरण्यास नाखूष असून 'शास्त्रात् रूढिर्बलीयसी' असली वेडगळ मते अलंघनीय मानीत आहेत. लोक ज्याला कली म्हणून भितात, तो त्यांच्या बऱ्याकरिता रूढीचा पाडाव करण्यासाठी झपाट्याने ग्रंथप्रसार करीत आहे. तेव्हा लवकरच रूढीअक्का राम म्हणतील; आणि सृष्टीला लोक भजू लागतील असा रंग दिसत आहे." अस्पृश्यता, स्त्रीदास्य, बालविवाह, सक्तीचे वैधव्य, केशवपन इत्यादी सामाजिक रूढींचा नायनाट करून योग्य त्या सुधारणा घडवून आणता येतील. परंतु जिथे निसर्गतः बुद्धिमत्ता आणि शारीरिक श्रम यांच्यात वैषम्य असेल तिथे समता कशी प्रस्थापित करता येईल? तिथे मनुष्याने निर्माण केलेल्या कायद्याचाच आसरा घ्यावा लागेल. इंग्लंडमध्ये एकोणिसाव्या शतकाच्या पूर्वार्धात धार्मिक व राजनैतिक मतप्रणालीवर मिल्लच्या उपयुक्तता वादाचा जसा प्रभाव होता तसा तो त्या शतकाच्या उत्तरार्धात राहिला नाही. तो दिवसेंदिवस कमजोर होत गेला.

---

*केशवसुतांना ही कल्पना वर्डस्वर्थवरून स्फुरली आहे. पण वर्डस्वर्थला फक्त सृष्टिसौंदर्य अभिप्रेत आहे. त्याच्या वेळी विकासवाद माहित नव्हता;—

'To her fair works did Nature link
The human soul that through me ran;
And much it grieved my heart to think
What man has made of man?
From Heaven if this belief be sent,
If such be Nature's holy plan,
Have I not reason to lament
What man has made of man?'

[*Man and Nature*]

मिल्लची भूमिका मूलतः राजनैतिक अर्थशास्त्राची होती. तो एक सामाजिक विचारवंत होता. देवाधर्मावर अगर भावनेवर त्याचा भरवसा नव्हता. प्रत्येक उपयुक्त वस्तूला मूल्य आहे. ,त्यातून जी संपत्ती निर्माण होईल तिचा उपयोग स्वतःचे व इतरांचे जीवित जेवढे सुखी करता येईल तेवढे करण्यात झाला पाहिजे असे त्याचे तर्कशुद्ध व्यावहारिक तत्त्वज्ञान होते. सामाजिक विषमता दूर करणे व प्रत्येकाचें जीवन सुखावह करणे हे शासनाचे कार्य आहे असे त्याचे मत होते. ते कायदेकानूने व समजूतदारपणाने झाले पाहिजे. त्यासाठी बंड करण्याच्या तो विरुद्ध होता. याउलट केशवसुतांची भूमिका केवळ भावनाप्रधान समाजसुधारकाची होती. ते हातात 'निशाण' घेतात आणि 'तुतारी' फुंकून समाजाला समतेचा, नीतीचा, प्रगतीचा व उन्नतीचा संदेश देतात. जे रूढीचे दास त्यांच्या आड येतील त्यांच्यावर ते सुधारणेच्या 'गोफणी'ने कठीण शब्दांच्या धोंड्यांचा मारा करतात. सुधारणेसाठी लागणारी 'स्फूर्ती' म्हणजे एक धुंदी आहे. आम्ही त्या धुंदीत जग उलथून टाकू आणि बंडाचा झेंडा उभारून रूढीच्या जुलुमाचे तुकडे तुकडे करून टाकू असे ते मोठ्या आवेशाने व त्वेषाने बजावतात. त्यांच्या 'कवी'च्या भूमिकेस हे सर्व साजेलं असेच आहे.

स्त्रियांच्या परवशतेच्या बाबतीत मिल्ल व केशवसुत यांची मने मिळतीजुळती आहेत. स्त्री ही पुरुषाची दासी नाही, सहचरी आहे. पुरुषाच्या प्रत्येक कार्यात ती सहभागी आहे असे "आम्हाला रुचती न ती श्रमफले कान्ते दिल्यावाचुनी" या चरणात केशवसुत सूचित करतात; आणि "स्त्री जातीस असाच काढ वरती", असा 'पण लक्षात कोण घेतो'च्या कर्त्यास धन्यवाद देतात. एका प्रबल राष्ट्राने दुसऱ्या दुर्बल राष्ट्रावर आक्रमण करावयाचे किंवा दुसऱ्या राष्ट्रातील लोकांना गुलाम म्हणून आपल्या राष्ट्रात गुराप्रमाणे विकावयाचे व राबवावयाचे हे केशवसुतांना मान्य नाही. मजुरावर उपासमारीची पाळी यावी याचे त्यांना दुःख होते. त्यांचा मजुर प्रचलित युगातला 'लालभाई' नाही. कारण त्यांनी ही कविता ज्याकाळी लिहिली त्या काळी येथे कार्ल मार्क्सच्या तत्त्वज्ञानाचा प्रसार झाला नव्हता. त्यांचा अगतिक मजूर देवाला आळवताना आपली व्यथा व्यक्त करतोः—

> 'सर्वांस देवा! बघतोसि सारखा।
> होतोस कां रे! गरिबांस पारखा?
> कांहीस सुग्रास सदन्न तू दिले।
> साधी अम्हा भाकरही न का मिळे?'

मिल्लच्या कोटिक्रमात ही लाचारी नाही. तो समाजाच्या अगोदर व्यक्तीच्या स्वातंत्र्याला मान देतो. प्रत्येक व्यक्ती त्याला सुखी हवी;— "Our ideal of ultimate improvement went far beyond democracy,......While we repudiated with the greatest energy that tyranny of society over the individual which most socialistic systems are supposed to involve, we yet look forward to a time when society will no longer be divided into the idle and the industrious; when the rule that they who do not work shall not eat, will be applied not to paupers only, but impartially to all; when the division of the produce of labour, instead of depending, as in so great a degree it now does, on the accident of birth, will be made by concert on an acknowledged principle of justice........."
[Principles of Political Economy]

समाजाच्या सुखासाठी संपत्ती हवी आणि संपत्तीच्या निर्मितीसाठी उद्योग हवा. त्या उद्योगाची महती केशवसुतांनी आठदहा 'स्फुटां'त आणि 'जगामधी या तुला कशाला परमेशे धाडिले?' या गीतांत वर्णन केली आहे. हे गीत मिसेस ब्राउनिंगच्या 'वर्क' या कवितेचे भाषांतर आहे. त्यात आज ज्यांचा रशियात उद्घोष आहे, त्या 'श्रमाची थोरवी' आणि 'संपत्तीची सर्वांत विभागणी' या तत्त्वांचे उद्भावन झाले आहे. केशवसुतांनी 'एका खेड्या'त 'लहान्या गरजा' असा आणि 'पुष्पाप्रत'मध्ये 'स्वोपयोगबद्धता' असा प्रयोग केला आहे, त्यावरून समाजसुधारणाविषयक

कविता लिहिताना ते अर्थशास्त्राकडे पाहत असावेत असे वाटते.

मिल्ल मुरलेला अर्थशास्त्रज्ञ होता. समाजात समता हवी असेल, तर त्याची पुनर्घटना हवी. त्याशिवाय दुःख व वैषम्य कमी होणार नाही असे त्याचे म्हणणे होते.--" Until society is better constituted—grievances less pressing—inequalities less glaring—we cannot hope for any great reform of the individual."

केशवसुतांच्या 'मूर्तिभंजना'त हाच सामाजिक पुनर्घटनेचा विचार आहे. 'स्फीन्स्क' (sphinx) ही जणू काही रूढीरूपी कैदाशीण कोडे घालून, मनुष्याच्या प्रगतीचा मार्ग कुंठित करीत आहे. केशवसुत म्हणतात, "आम्हा सुधारकांना तिच्या व्यूहात अडकावयाचे नाही. समाजाची ही 'मूर्ति' म्हणजे 'घडण' (form, idol नव्हे) आम्ही तोडून वदलणार आहोत. आम्ही समाजाचे हितकर्तेच आहोत. आम्ही हरामखोर किंवा चोर नाही. आम्ही त्याची पुनर्घटना करणार आहोत." रूढीमुळे वारंवार सामाजिक समस्या निर्माण होतात म्हणून केशवसुतांनी तिच्यासाठी इजिप्तमधील 'स्फीन्स्क'ची प्रतिमा योजिली आहे. सकाळी चार, दुपारी दोन व संध्याकाळी तीन पाय असणारा प्राणी कोण म्हणून ती प्रवाशाना कोडे घालत असे. मनुष्य लहानपणी रांगतो, तरुणपणी चालतो व म्हातारपणी हातात काठी घेतो, त्याच्या जीवनावर हे कोडे होते. प्रवाशाला कोडे सुटले नाही तर ही राक्षसी त्याला खाऊन टाकत असे. हे कोडे ओडिपस्ने सोडवताच ती राक्षसीण मेली अशी ग्रीक कथा आहे.

केशवसुतांचा 'नवा शिपाई' (volunteer) हा व्यापक दृष्टीचा विश्वबंधुतावादी आहे. इथून तिथून मनुष्य तेवढा एक आहे ही त्याची भावना आहे. तो म्हणतो; —'पूजितसे ती कवणाला? — तर मी पूजी अपुल्याला, । आपुल्यामध्ये विश्व पाहुनी पूजी मी विश्वाला, । इमर्सन् असेच म्हणतो, "I am born unto the Great, the Universal mind,—I the Imperfect, adorn my own Perfect." (Over soul). वस्तुतः हा विचार भारतीयांना नवीन नाही. 'सर्वेऽत्र सुखिनः सन्तु' या सर्वश्रुत प्रार्थनेत तो अंतर्भूत आहे. काहीजण हा विचार आध्यात्मिक समतेचा व केशवसुतांचा विचार हा सामाजिक समतेचा असा तथाकथित भेदभाव करीत असतात. घराला सोयीसाठी अनेक खोल्या असतात. पण वास्तविक घर एकच असते. समतेचे तसेच आहे. ती जर सर्वत्र एकरूप नसेल तर मग तिला 'समता' म्हणताच येणार नाही. 'निश्चिततावादा'त ही असेच मानवतेचे (Humanity) पूजन आहे.

केशवसुत 'कवि' होते. तेव्हा त्यांच्या लेखनाकडे 'काव्य' या दृष्टीनेच पाहिले पाहिजे. त्यांचे 'काव्य' त्यांच्या पूर्ववर्ती पिढीपेक्षा निराळे व नवे वाटते याचे एक कारण त्याची ही वैचारिकता होय. मात्र या वैचारिकतेचा आविष्कार उत्कट भावनेतून झाला आहे; आणि म्हणूनच तिला 'कविते'चे रूप प्राप्त झाले आहे.

हृदयस्थ प्रकाश

दि. के. बेडेकर

केशवसुतांनी आपल्या मृत्यूच्या आधी आठ महिने, (९-२-१९०५) रोजी, श्री. ज. वा. हर्षे (आनंदीरमण) यांना एक पत्र लिहिले. हर्षे यांच्या कविता त्याना चांगल्या वाटल्या नाहीत व हा अभिप्राय हर्षे यांना रुचणार नाही, म्हणून केशवसुतांनी त्यांना पत्र लिहिण्याचे अनेक दिवस लांबणीवर टाकले. शेवटी हर्षे यांच्या आग्रहामुळे त्यांनी एक पत्र लिहिले. त्यात नम्र पण परखड शब्दात त्यांनी आपला अभिप्राय कळविला आहे. केशवसुतांच्या स्वभावात निस्पृहपणा, ऋजुता, प्रेमळ औदार्य व नम्रता अशा गुणांचा समन्वय होता व हे पत्र त्यांच्या या स्वभावाचे उत्तम दर्शन घडविणारे आहे.

या पत्रात एक परिच्छेद प्रस्तुत लेखाच्या दृष्टीने महत्त्वाचा आहे. तो परिच्छेद पत्राच्या उत्तरार्धात येतो. हर्षे यांच्या कवितेवर अभिप्राय देत असताना, मित्राला उपदेश करण्याच्या साध्या व्यावहारिक पातळीवर असताना, अचानक अनाहूतपणे केशवसुत काव्याच्या तत्वचिंतनात शिरले आहेत. असे का व्हावे? मला याचे असे कारण दिसते की, त्या सुमारास कवीचे मन अशा तत्त्वचिंतनाने व्यापलेले होते. याच मग्नतेत २५ मे १९०५ रोजी त्यांनी 'हरपले श्रेय' ही उत्कट कविता लिहिली. 'श्रेया'चा विचार त्यांच्या हृदयात प्रभावी होता.

कविता करणे म्हणजे 'आकाशीची वीज' धरू पाहणे आहे, त्यात नव्याण्णव टक्के लोक नुसते होरपळूनच निघतात; 'वाणी या देवतेची आराधना' इतर देवतांच्या आराधनेपेक्षा फार अवघड व जपून करावी लागते, असे सांगून कवीने पुढील परिच्छेद लिहिला आहे :—

> "तुम्हास जगाच्या अंधारात आपल्या बुद्धीचा किरण पाडणे आहे काय? असेल तर तुमचे हृदय उललेले आहे काय? फाटले आहे काय? म्हणून मी विचारतो. कारण तो प्रकाश जेव्हा बुद्धि परावृत्त करून जगावर पाडते तेव्हा अंधारात चाचपडणाराला वाट दिसू लागते. एरव्ही कागदावर दिव्याची चित्रे रंगवून 'अंधारात चालला आहा तर एवढा आमचा कंदील तरी घेऊन जा' असे आग्रहाने आपले ते दिवे म्हणजे दिव्याची चित्रे लोकांच्या हाती देणारे स्वयंसेवक उर्फ स्वसेवक नाक्यानाक्यावर गर्दी करून उभे आहेत. त्यांच्या या दिव्यांच्या चित्रांनी त्यांना काय किंवा कोणाला काय, वाट थोडीच दिसणार आहे?"

परिच्छेदाच्या उत्तरार्धात 'दिव्यांच्या कागदावरील चित्राने' प्रकाश देऊ पाहणारांचा केशवसुतांनी कठोर उपहास केला आहे. इतके मर्मभेदक शब्द ते सहसा लिहीत नाहीत. पण यावरून एवढेच दिसते की, प्रकाश देणाऱ्या काव्यांचे महत्त्व त्यांना अगदी तळमळीने सांगावयाचे होते. वेगडी कविता व खरी कविता यांतील फरक त्यांना स्पष्ट करावयाचा होता. खऱ्या काव्याविषयी आपली भूमिका त्यांनी परिच्छेदांच्या पूर्वार्धात फार सूत्ररूपाने मांडली आहे. ती आता पाहू.

त्यांचे पहिले विधान असे आहे की, 'जगाच्या अंधारात बुद्धीचा किरण पाडणे' हे कवीचे कार्य आहे.

केशवसुतांना 'जग' अंधारमय दिसते. हा अंधार त्यांच्या हृदयाला भिडतो. 'तिमिरातून तिमिराकडे' माणूस जात राहतो. जगाचे 'घनतमिस्र' माणसाला वेढून टाकते. माणसाला जगातील वस्तू दिसतात पण हे 'अवलोकन' कसे आहे? तर 'नित्याच्या अवलोकने जन पहा होती किती आंधळे?' असे कवी सांगतो. अवलोकनामुळे अंधत्व येते! माणसाची दृष्टी जगावर खिळलेली राहते, जड होते व मग या अंधारात, ओंगळपणातच ती सुप्तपणे रमून जाते.

जगाच्या या अंधारात जर 'बुद्धीचा किरण' पाडला तर माणसांना पायाखालची वाट दिसू लागेल, असे कवी म्हणतो. वरवर पाहता बुद्धिवादी तत्त्वज्ञाने दिलेल्या संदेशासारखा हा उपदेश आहे. आणि एवढ्या-पुरते असे मानावयास हरकत नाही की कवी 'बुद्धिवादी' आहे. माणसाने आपल्या बुद्धीने व कर्तृत्वाने जगाला स्वर्गसम बनवावयाचे आहे. 'जग हे जड असले तरी खोटे नाही', तसेच 'नाही स्वप्न न भास वा बुडबुडा, जीवित्व साचे असे', अशी कवीची दृढ श्रद्धा आहे. जगाला, संसाराला, असार माया, आभास वा विवर्त म्हणणारा वेदान्त त्यांना मान्य नाही.

पण, केशवसुतांचा 'बुद्धिवाद' इतरांच्या बुद्धि-वादापेक्षा फार वेगळा आहे. याचे प्रत्यंतर पुढील लागोपाठ येणाऱ्या विधानात येते. ते विचारतात :

"असेल तर तुमचे हृदय उललेले आहे काय? फाटले आहे काय? म्हणून मी विचारतो."

ता वाक्यांत एक भाषेची अशी लकब आहे की, बायबलमधील साध्या भिडणाऱ्या प्रश्नांची आठवण होते, किंबहुना पुढील वचनाचे स्मरण होते :

"पाहा मी दारात उभा आहे व दार ठोठावीत आहे. जो मनुष्य हे ऐकू शकेल व दार उघडील त्याच्या घरात मी प्रवेश करीन." (रेव्हेलेशन्स,३.२०)

केशवसुतांच्या प्रश्नातच असा गर्भित अर्थ आहे, माणसांनी आपल्या हृदयांची दारेकवाडे घट्टपणे व मठ्ठपणे बंद करून घेतलेली आहेत. पण जगाच्या अंधाराची ज्याला प्रतीती येते तो हृदयाचे दार उघडतो; म्हणजेच हृदय उलते, कमलपुष्पाप्रमाणे उमलते. हृदयकोष फाटून जातो व विकसित कमल-पुष्पाप्रमाणे त्याचा सौरभ, सौंदर्य व प्रकाश जगाला दिसू लागतो.

आता, समजा की हृदय उललेले आहे! तर कवी म्हणतो :

"तो प्रकाश जेव्हा बुद्धि परावृत्त करून जगावर पाडते, तेव्हा अंधारात चाचपडणारास वाट दिसू लागते."

या विधानात 'तो प्रकाश' हे शब्द एकदम संदर्भहीन आल्यासारखे वाटतात, कारण येथे आधी एक सांगावयास हवे होते, ते कवीने अध्याहृत ठेवले आहे. ते असे की हृदय उलताच प्रकाश बाहेर फाकू लागतो. 'तो प्रकाश' म्हणजे **हृदयस्थ प्रकाश.** केशवसुतांच्या मते मानवी हृदयात एक प्रकाशस्रोत आहे व हृदयकोष उलल्यावर तो आपली प्रभा बाहेर पसरू लागतो. त्यांनी 'प्रतिमा' या कवितेत म्हटले आहे :

"स्वान्ती मंडल जे हिरण्मय तवी दिव्य प्रभा विस्तरी,
त्याच्या पाजळती अरांवरि सुखे देव स्वशस्त्रे जुनी"

मानवाच्या अंतःकरणात 'हिरण्मय मंडल' आहे, या अंतस्थ दिव्य प्रकाशचक्राच्या अरांवर देव आपली जुनी शस्त्रे पाजळून घेत आहेत, असे वर्णन करताना केशवसुतांनी मानवी प्रतिमेला देवांहून श्रेष्ठ स्थान दिले आहे. ते असेच मानतात की देवदानवांना माण-वाने निर्माण केले आहे, तेव्हा देवांनी मानवहृदयस्थ चक्राच्या अरांवर शस्त्रे पाजळावीत हे ओघानेच आले.

आता, पुन्हा त्या विधानाकडे वळू. 'तो प्रकाश' सरळ जगावर पडतो का? नाही. उलट, येथे एक विलक्षण प्रक्रिया केशवसुतांनी सांगितलेली आहे. ते म्हणतात की हृदयस्थ प्रकाश बुद्धी परावृत्त करून जगावर पाडते!

याचा अर्थ असा घ्यावा लागतो की, मानवी बुद्धी स्वयंप्रकाश नाही, प्रकाशस्रोत तर नाहीच नाही. पण तिच्यामध्ये असा विलक्षण गुण आहे की, ती आरशाप्रमाणे प्रकाशाला परावृत्त करू शकते. किंवा दुसरी उपमा द्यावयाची तर बुद्धी ही विलोरी (प्रिझम-सारख्या) स्फटिकासारखी आहे. हृदयस्थ प्रकाश हा शुभ्र आहे व तो या स्फटिकातून जातो त्यावेळी त्यातून इंद्रधनुष्याच्या सप्त रंगांची सौंदर्यप्रभा चोहीकडे

फाकते. अंधाराचे, ओंगळवाणे जड जग या इंद्रचाप-रंगांनी उजळून सुंदर होते. खंतीने भारावलेले आंधळे जन आता या परावर्तित रंगप्रकाशात आनंदाने न्हाऊन निघतात. मग या जगातच स्वर्गसमक्षता पाहण्याचे भाग्य या अंधजनांना लाभते.

हृदयस्थ प्रकाश परावृत्त करणारी बुद्धी म्हणजे तर्कबुद्धी नव्हे, बुद्धिवादी तत्त्वज्ञाला अभिप्रेत असलेली विवेकबुद्धीही नव्हे. 'हरपले श्रेय'' या कवितेवरील टीपेत केशवसुतांनी 'उदात्त बुद्धी 'चा उल्लेख केला-तीच ही प्रकाश परावृत्त करणारी बुद्धी. ही बुद्धी हृदयाशी संलग्न व संवादी आहे. प्रेमसंन्यासमधील घन:श्याम हृदय आणि मस्तक यांच्यातील अंतर सांगून भावना व बुद्धी यांच्यातील अंतराय स्पष्ट करतो. तेथे बुद्धीचा अर्थ केवळ तर्ककर्कश, प्रसंगी दुष्टपणातही अधोगत होणारी, मनाची शक्ती असा गडकऱ्यांनी घेतला आहे. केशवसुतांनी तो अर्थ येथे मुळीच घेतलेला नाही व मनाची दुसरीच एक शक्ती त्यांना अभिप्रेत आहे. बुद्धीचा अर्थ मानवाच्या उदात्त, हृदयसंवादी प्रवृत्ती ('high instincts') असा केशवसुतांनी घेतलेला आहे.

हृदयस्थ प्रकाशाचे हे तत्त्व मांडीत असताना केशवसुत कोणत्या परंपरेचा आधार घेत होते ? हा विचार येथे करावयास हवा. कारण हृदयस्थ प्रकाशाचे तत्त्व सृष्टीच्या प्रकाशतत्त्वाशी त्यांनी निगडीत केलेले आढळते. मानवी हृदय आणि जगाच्या जडत्वापलीकडची प्रकाशमय सृष्टी यांची एकरूपता केशवसुतांनी मानलेली आहे, असे आढळते. ही एकरूपता समजावून घेण्यासाठी प्रथम परंपरेचा प्रश्न विचारात घ्यावयास हवा.

केशवसुतांच्या काव्यात 'अंधार व प्रकाश', 'जड व चेतन' यांचे द्वंद्व अखंड नांदताना दिसते. याला भारतीय परंपरेचा आधार शोधणे सोपे आहे. देव आणि असुर यांचे द्वंद्व आपल्याकडे मानलेले आहे. देव हे स्वर्गात राहणारे, दिव्य तेजस्वी स्वरूपाचे, तर दानव हे अंधाराच्या पाताळात राहणारे क्रूर, ओंगळ स्वरूपाचे, असे द्वंद्व पुराणातून आपण पाहतो...तसेच उपनिषदांतून म्हटलेले आहे की, तमातून ज्योतिस्वरूपाकडे, प्रकाशाकडे, ब्रह्मविद्येच्या साधकाला जावयाचे असते.

महाराष्ट्रात प्रबोधनाचा उत्कषकाल होता त्या वेळी केशवसुत काव्यरचना करू लागले व या प्रबोधनामध्ये पूर्वदिव्याचे स्मरण, गौरव व अनुकरण हा भाग होता. त्यामुळे 'हृदयस्थ प्रकाशा 'चे तत्त्व केशवसुतांनी आपल्या तत्त्वज्ञानातून घेतले असावे, ही कल्पना प्रथमदर्शनी स्वीकार्य वाटते. पण खोलवर पाहिले तर दिसते की 'हृदयस्थ प्रकाशा 'चे व बुद्धीच्या प्रकाश–परावर्तनक्षमतेचे तत्त्व भारतीय परंपरेत नाही. आपल्या अध्यात्मामध्ये मन, हृदय, बुद्धी, इत्यादींना प्रकाशमय मानलेले नसून केवळ 'आत्मा 'च स्वयंप्रकाश आहे व तोही जेव्हा परमात्म्याच्या (ब्रह्माच्या) स्वरूपाशी एकरूप होतो तेव्हाच तसा आहे. ब्रह्म हेच सत्, चित् व आनंद यांनी निर्भर आहे व आत्मा ब्रह्मरूपच आहे. किंवा, ईश्वर प्रकाशरूप मानलेला आहे.

पण, केशवसुतांच्या मते 'हृदयस्थ प्रकाश' जसा मानवी मनात आहे, तसाच तो सृष्टीतही आहे. जगात मात्र अंधार आहे. तशी प्रकाशमय सृष्टीची कल्पना भारतीय परंपरेत मुळीच नाही. ख्रिस्ती तत्त्वज्ञानातही अशी सृष्टीची कल्पना नाही. ईश्वराचे ऐश्वर्य निसर्गातील सुंदरतेमध्ये प्रकट होते, आणि मानवी मनाच्या उदात्ततेत आविष्कृत होते, असे ख्रिस्ती तत्त्वज्ञांना मानता आले तरी प्रकाशस्रोत फक्त ईश्वरच आहे असे त्यांनी मानले. त्याचा चिद्विलास म्हणून तेजाचे किंवा सौंदर्याचे प्रकटीकरण त्यांनी मानले आहे. तेव्हा केशवसुतांची काव्यदृष्टी व प्रकाशमय हृदयाची व सृष्टीची कल्पना ख्रिस्ती धर्माच्या प्रभावानेही बनलेली नाही.

सन १७८९ ते १८२० पर्यंत ब्लेक, कोलरिज, वर्डस्वर्थ, शेली व कीटस् या पांच आद्य रोमॅन्टिक कवींच्या तत्त्वज्ञानाशी, आणि पर्यायाने कोलरिजवर प्रभाव पाडणाऱ्या शेलिंग या जर्मन तत्त्वज्ञानाच्या भूमिकेशी, केशवसुतांच्या या तत्त्वभूमिकेचे नाते आहे. त्यांच्या काव्याचे योग्य रसग्रहण होण्यासाठी त्यांचे हे प्रकाशतत्त्व नीट समजावून घ्यावयास हवे.

'केशवसुतांची काव्यदृष्टी' ह्या आगामी पुस्तिकेतले एक अवतरण.

"शब्दांनो, मागुते या!"

माधव गोपाळ देशमुख

To judge of poets is the faculty of poets :
Not of all poets, but the best.

—*Ben Johnson*

बेन् जॉन्सनच्या मताप्रमाणे कवींबद्दल निर्णायक मत देण्याचा अधिकार हा फक्त कवींनाच आहे; पण तो सर्व कवींना नाही, तर केवळ सर्वोत्कृष्ट कवींनाच आहे. सर्वोत्कृष्ट कवी म्हणजे आधीच्या कवींहून काही तरी वेगळ्या आणि स्वतंत्र प्रकारची रचना करणारा, नवोदितांना व पुढिलांना उपजीव्य होणारा अर्थात् एखाद्या संप्रदायाचा जनक ठरणारा कवी.

आधुनिक मराठी काव्यसंप्रदायाच्या दृष्टीने केशवसुत हे एक अशा प्रकारचे कवी होऊन गेले. त्यांच्या जन्माला आज शंभर वर्षे झाली व त्यांना दिवंगत होऊन आज साठांवर वर्षे होऊन गेली. या साठसत्तर वर्षांत केशवसुतांच्या लोकप्रियतेने अनेक चढउतार पाहिले. पण एवढी गोष्ट खरी की त्यांच्यावर झालेल्या अनुकूल-प्रतिकूल टीकेइतकी विस्तृत टीका आजवर कोणत्याही एका आधुनिक मराठी कवीवर झाली नाही. केशवसुतांवरील टीका जशी विपुल, त्याचप्रमाणे खुद्द केशवसुतांनी काव्याच्या स्वरूपाविषयी जे काही आपल्या काव्यातच लिहून ठेवले आहे तेही विपुल आणि आजही ताजेतवाने वाटावे असे आहे.

केशवसुतांच्या कवितेचे आज पुनर्मूल्यन करिताना त्यांच्याविषयी इतर टीकाकारांनी व समीक्षकांनी काय म्हटले आहे ते पाहण्यापूर्वी खुद्द केशवसुतांनी, विशेषत: स्वत:च्या काव्यावर आणि एकंदरीने सर्वसामान्यत: कवी आणि काव्य या विषयावर कोणकोणती मते व्यक्त केली आहेत त्यांचा आढावा घेणे अगत्याचे आहे. या बाबत खुद्द कवीचाच दृष्टिकोण डोळ्याआड केल्यास केशवसुतांच्या कवितेचे मूल्यांकन पूर्णांशाने होणार नाही. या दृष्टीने या छोट्या लेखात केशवसुतांच्या एका कवितेची छाननी करण्याचे योजिले आहे.

"शब्दांनो, मागुते या!" या कवितेत केशवसुतांनी काव्यशक्ती, काव्यनिर्मिती, काव्यानुकूल मन:स्थिती, काव्यार्थ आणि शब्द यांचा परस्पर संबंध, एका रूपकाद्वारे वर्णिला आहे. स्रग्धरा वृत्तातील सुनीतसदृश अशा चार श्लोकांच्या या कवितेत प्रथम त्यांनी काव्यशक्तीच्या संचाराचे वर्णन केले आहे—

तेजाचे पंख वाऱ्यावरि हलवित ती
चालली शब्दपंक्ती
देव्हारा शारदेचा उचलुनि गगनांतूनि
ती नेत होती;
शब्दांहीं चित्तभूमी विकसित हिरवी
तों मदीया बघूनी
देव्हारा माझिया तो उतरुनि हृदयीं
स्थापिला गौरवूनी.

ब्रह्मदेवाचे विमानवाहक जसे सोन्याचे पंख असलेले राजहंस असतात तद्वत् शारदेचा देव्हारा अर्थात काव्यशक्तीचे मूळपीठ आकाशमार्गाने वाहून नेणारे तेजाचे पंख असलेले शब्दरूपी पक्षी आहेत, अशी येथे कल्पना केली आहे. पृथ्वीवर अनेक ठिकाणी शारदेचे देव्हारे माजविलेले दिसत असले तरी तिचे खरे अधिष्ठान हे गगनात आहे. 'न प्रभातरलं ज्योतिरुदेति वसुधातलात्' या न्यायाने काव्यदेवतेचे अधिष्ठान

वसुधेवर आणावयाचे झाल्यास आकाशाचा गुण असलेले जे तेजःपुंज शब्द तेच आणू शकतील. आणि शारदेचा देव्हारा आकाशातून पृथ्वीवर आणून जर त्याची गौरवपूर्वक स्थापना करावयाची असेल तर त्यासाठी योग्य अशी जागा एकच. ती म्हणजे कवीची विकसित आणि हिरवी चित्तभूमी. अर्थात् 'भावश्चित्तलक्षणम्' या व्याख्येनुसार कवीच्या संस्कारयुक्त आणि भावनार्द्र हृदयात जेव्हा त्याचे भाव हे तेजस्वी शब्दांचे रूप धारण करतात तेव्हा त्या ठिकाणी काव्यशक्तीची प्रतिष्ठापना झाली असे समजावे.

चित्तावरील संसृतीचे दडपण निघाले म्हणजे मन हे काव्यात्मक वस्तूंबरोबर तरंगू लागते (म्हातारी). प्रौढत्वात शैशवाची, निरागस संस्कारक्षमतेची, जपणूक करणे हा कवींचा बाणा आहे (कवितेचे प्रयोजन). जे रम्य ते बघून कवीला वेड लागते आणि त्या तन्मयतेमधून आपोआप काव्यनिर्मिती होते (फूलपाखरू). हाच आशय या श्लोकात व्यक्त झाला आहे. 'फूलपाखरू' या कवितेत केशवसुतांनी--

जेथे हिरवळ फार विलसते,
लताद्रुमांची शोभा दिसते,
तेथे फुलपाखरूं पहा हें
सुंदर बागडते !

असा हिरवळ शब्दाचा उपयोग केला आहे. 'शब्दांनो, मागुते या !' मधील पहिल्या श्लोकातील 'हिरवी आणि विकसित चित्तभूमी' म्हणून निर्देशिलेली भूमी म्हणजे अर्थात् संस्कारक्षम मन.

'शारदेचा देव्हारा' हाच पुढील तिसऱ्या श्लोकात 'दिव्य वाग्देवीपीठ' म्हणून संबोधिला आहे.

दिव्यशक्तीने स्फुरे गंध पुष्पीं
रंग खुलतीही तिने इंद्रचापीं
सृष्टिमाजीं जें रम्य असे काही
तीच कारण त्या शक्ति असे पाहीं ।।

(काव्य कोणाचे ?) येथे दिव्यशक्ती म्हणून जिला संबोधिले आहे तीच काव्याचा हेतू किंवा त्याच्या मुळाशी असलेले कारण होय. ही दिव्य शक्ती म्हणजेच वाग्देवीपीठ. म्हातारी ही गंधर्वांचे सूक्ष्मरूप विमान असून ती वातावरणातून तरंगत असताना ते तिच्यावर सूक्ष्म देह धारण करून बसून येतात व सुखाने दिव्य गाणे गात असतात, असे म्हटले आहे. अर्थात् गंधर्वांचे गाणे जसे आकाशात तरंगणाऱ्या म्हातारीला वाहक बनविते तद्वत् वाग्देवीच्या काव्याचे शब्द हे वाहक आहेत असा भाव.

'शब्दार्थौ सहितौ काव्यम्' ही संस्कृतातील काव्याची व्याख्या प्रसिद्धच आहे. आता हीच कल्पना केशवसुतांनी या कवितेत रूपकाद्वारे कशी मांडली आहे ती पाहा—

शब्दांसंगें तदा मीं निजहृदयवनामाजि
संचार केला,
तेथे मी कल्पपुष्पें खुडुनि नमुनि तीं
वाहिलीं शारदेला,
शब्दांच्या कूजिताने सहजचि मम हृत्प्रान्त
गुंगूनि गेला;
मीं त्या स्वप्नांत गद्यग्रथित जग मुळीं
लोटिलें तुच्छतेला !

शारदेची उपासना करण्यासाठी आधी शारदेचे अधिष्ठान हवे, संस्कारक्षम हृदय हवे, कल्पनांची पुष्पे आणि शब्दांचे कूजनही हवे. ज्यांनी शारदेचे अधिष्ठान कवीच्या हृदयात स्थापावे त्या शब्दांनीच कवींच्या कल्पनांची फुलेही फुलवावी यात अस्वाभाविक असे काहीच नाही. आकाशात संचार करताना शब्दरूपी पक्ष्यांचे काम शारदेचा देव्हारा उचलण्याचे असते तसेच कवीच्या संस्कारक्षम मनात—हृदयवनात— संचार करिताना आपल्या कूजिताने, कल्पपुष्पाप्रमाणेच शब्द हे शारदेच्या उपासनेस साहाय्यभूत होतात. कवीला कल्पना सुचण्यासाठी हृदयाची तन्मयता आवश्यक आहे, ती शब्दांच्या साहाय्यानेच साधू शकते. अशा प्रकारे, कल्पना म्हणजे काव्यार्थ आणि तो सम्यक् रीतीने व्यक्त करणारे शब्द यांच्या साहित्यातून शारदेची उपासना करणारा कवी एक प्रकारच्या गुंगीत, स्वप्नमय अवस्थेत असताना त्याच्या मनावरचे संसृतीचे दडपण निघून गेल्यामुळे काव्याबाहेरील जगाला अर्थातच उपेक्षितो, तुच्छ लेखतो.

पण काही झाले तरी कवी हा केवळ आपल्या हृदयवनातच गुंगत राहून जगाविषयी उदासीन राहू

शकत नाही. ज्याची सृष्टीशी तन्मयता झालेली आहे असा भृंग 'उदासीनही जगाविशी' राहू शकतो. अशी स्थिती परमानंदाने परिपूर्ण असणाऱ्या भृंगाचीच असू शकते. ज्यांना जीवनामध्ये तिमिरातच नित्य रखडावयाचे आहे, विवंचनेतच जिणे कंठावयाचे आहे, त्यांना ही पुष्पपतंग-स्थिती कशी मिळणार ? (फूलपाखरू). त्यामुळेच कवीने जगाला झिडकारल्याबरोबर त्याचा परिणाम कवीला भोगावा लागला तो असा—

रागाने या जगाने अहह! म्हणुनिया
शापिलें या जनाला,
तेणें चिन्ताग्नि माझी हृदयहरितता
नाशिता फार झाला;
गाणारे शब्द सारे झडकरि उडुनी
दूर देशास गेले,
वाग्देवीपीठ येथे परि मम हृदयीं
दिव्य तें राहियेलें !

कवीने जरी जगाला तुच्छ लेखले तरी जग काही कवीविषयी उदासीन राहू शकत नाही. नानाप्रकारच्या विवंचनांची आग ते कवीला लावणारच ! अशा परिस्थितीत कवीची संस्कारक्षम वृत्ती कशी टिकून राहणार ? आणि मग त्या वठलेल्या वृक्षाला कल्पनांची फुले तरी कशी येणार ? जेथे हिरवळच नाही तेथे कूजन करणारे पक्षी तरी कशाला राहतील ? गगनातून तेजाचे पंख हलवीत चालणारी शब्दपंक्ती कवीच्या हिरण्यागार हृदयवनात कूजन करण्यास शिकली होती ती आता नाहीशी झाली. जिथे हिरवळ आहे, तिथेच कल्पपुष्पे राहणार. संस्कारित हृदयाचा आविष्कार म्हणजेच काव्यार्थ—तोच जेथे नाही तिथे काव्यार्थ व्यक्त करणारे शब्दही नाहीत. शारदेचे अधिष्ठान तेथे भलेही राहो !

'छंदोरचना'कार डॉ. पटवर्धन येथे एक मोठी शंका व्यक्त करतात. "(शब्दविहंग) उडून गेले तेव्हा त्यांनी तो देव्हारा नेला कसा नाही ?" ही शंका त्यांनी रूपकातील उपमेयार्थाबाबत विचारली असती तर त्यांना उत्तर देणे सोपे होते. "जेथे शब्द जातात तेथे काव्य जाते असे नाही तर जेथे काव्य जाते तेथे शब्द अनुसरतात" असे खुद्द त्यांच्याच शब्दांत या प्रश्नाचे उत्तर आहे (अर्वाचीन मराठी वाङ्मयसेवक, खंड १, पृ. १४१). पण या शंकेनंतर त्यांनी लगेच दुसरा प्रश्न विचारला आहे. "कां बरें झालें, ओझें गेलें म्हणून स्वतःचें समाधान करून घेण्याइतके ते स्वार्थी होते ?" या त्यांच्या औपरोधिक प्रश्नावरून त्यांची शंका ही उपमानातील साधर्म्याला वाजवीपेक्षा अधिक ताणणारी अतएव चावटपणाची आहे हे उघड होते. मुख हे कमलासारखे सुंदर आहे, असे म्हणताच मग चिखल कोठे आहे ? अशी चिखलाची चौकशी करणाऱ्या चटोर टीकाकाराला चावट म्हणू नये तर काय म्हणावे ? हृदयाची हरितता नष्ट झाली म्हणून गाणाऱ्या शब्दपक्ष्यांनी उडून जाणे अगदी स्वाभाविक आहे. ज्या हृदयात संस्कारक्षमता नाही तेथे कल्पना व त्या व्यक्त करणारे शब्द स्फुरू शकत नाहीत.

शब्दांचा जेथे जेथे संचार होईल तेथे तेथे त्यांनी आपल्या बरोबर शारदेचा देव्हाराही उचलून नेलाच पाहिजे, नाही तर "बरे झाले, ओझे गेले !" असे समाधान मानणारा स्वार्थ त्यांना चिकटेल—अशा प्रकारची शृंगापत्ती डॉ. पटवर्धनांनी निर्माण करून तीत ते स्वतःच गुरफटून गेले आहेत. वास्तविक पाहता "शब्द हे एका दृष्टीने अर्थवाहक आहेत" हे त्यांचे विधान काव्येतर वाङ्मयाला मात्र लागू पडेल. परंतु काव्याच्या बाबतीत जेवढा अर्थ तेवढेच शब्द आणि जेवढे शब्द तेवढाच अर्थ, असा शब्द आणि अर्थ यांचा सहभाव म्हणजेच साहित्य असल्यामुळे या ठिकाणी केशवसुतांनी केवळ शब्द दूर निघून गेले असे न म्हणता 'गाणारे शब्द' असे म्हटले.

डॉ. पटवर्धनांच्या आक्षेपाला दुसरे उत्तर असे आहे की 'शारदेचा देव्हारा' उचलण्याचे जसे एक काम शब्दविहंगांचे आहे त्याप्रमाणे त्यांना दुसरीही कामे आहेतच ! वरच्याच श्लोकात असे म्हटलेले आहे की शब्दांबरोबर कवीने हृदयवनात संचार करून शारदेला कल्पपुष्पे वाहिली. शब्दरूपी विहंगांनीच आपल्या कूजनाने कवीचा हृत्प्रान्त गुंगून टाकला. ज्या हृदयात चिंता, निराशा यांनी ठाण मांडले आहे तेथे कसले गाणे ? पण "हृदयात जर प्रतिमा असेल तर ती निःशब्द, मूक राहणार नाही, ती शोकगीते

रवील ! "— असे म्हणून डॉ. पटवर्धनांनी सरळ अर्थाचा विपर्यास केला आहे. गवई रडला तरी तो संगीतातच रडला पाहिजे असा त्यांचा आग्रह ! सशब्द प्रतिमा आणि निःशब्द प्रतिभा असे दोन प्रकार सुचविण्याबद्दल त्यांना धन्यवाद द्यावे की केशवसुतांवर आग पाखडताना त्यांनी काहीही सव्यापसव्य करण्याचे बाकी ठेवले नाही म्हणून त्यांची कीव करावी, हे कळत नाही. प्रतिभा ही काव्याच्या मुळाशी असलेली दैवी शक्ती आहे. ती जेथे आहे तेथे शब्द आणि अर्थ यांचे साहित्य आपोआप स्फुरते. सांसारिक तापांमुळे कवीची मनःस्थिती चिंताजड झाली असेल तर त्याच्या मनात कल्पना असूनही त्या व्यक्त करण्यासाठी अर्थव्यंजक शब्द आढळत नाहीत. ते त्याच्यापासून दूर गेल्यासारखे भासतात. अर्थात् शब्दांच्या साहाय्याशिवाय नुसत्या कल्पनांना काहीच किंमत नाही; आणि कल्पना स्फुरू लागल्या की शब्दांना त्यांच्या मागोमाग यावेच लागते. हाच अर्थ ते आपल्या अखेरच्या श्लोकात व्यक्त करतात—

वाग्देवी शारदे गे ! फिरवुनि
अपुले शब्द पाचार येथें !
साहाय्यावीण त्यांच्या भजन तव
कसें सांग साधेल मातें ?
आशामेघालि चिन्तानल
अजि विझवूं जाहलीसे तयार,
शब्दांनो ! मागुते या !
बहर मम मनीं नूत्न येईल फार !

काव्यदेवीची आराधना अर्थात् काव्यनिर्मितीसाठी शब्द आणि अर्थ या दोहोंचे सहभावाने अन्वित असे साहाय्य आवश्यक आहे. काही तात्कालिक आणि परिस्थितिजन्य कारणांमुळे चिन्ताग्रस्त झालेल्या मनात शब्द ठरत नसले तरी आशापूर्ण मनःस्थितीत विवंचना लोप पावतात आणि 'वाचमर्थोऽनुधावति' या न्यायाने मग शब्द हे आपोआप सुचू लागतात. वाग्देवीचे पीठ आहे, एका काळी हिरवळ होती; पण चिन्तानलाने ती दग्ध झाली. तो चिन्तानल आशामेघांच्या जलसिंचनामुळे आज विझून जाऊ लागला आहे. ज्या शारदेने कानमंत्र दिल्यामुळे काव्य स्फुरते, तिनेच आपल्या विमानवाहकांना गाण्याला साथ देण्यासाठी शब्दांना परत आणले तर कवीच्या काव्याला नवा बहर येण्यास काय उशीर ?

'शब्दांनो, मागुते या !' या कवितेमधील रूपक बाजूला सारून तीतील मुख्यार्थ ध्यानात घेतला तर केशवसुतांनी या कवितेद्वारा काव्यविषयक कितीतरी गोष्टींवर नवा प्रकाश टाकला आहे असे लक्षात येईल काव्य हे शब्दांशिवाय संभवत नाही. काव्यानुकूल असे तेजस्वी शब्द हेच खरेखुरे काव्याचे निर्माते आहेत. कारण काव्यप्रतिभा ही संस्कारक्षम मनाच्या कवीजवळ असते याचा प्रत्यय त्याच्या तेजस्वी शब्दांतून निर्माण झालेल्या काव्यावरूनच आपणास येतो. काव्य आणि शब्द हे एकमेकांवर अवलंबून असले तरी शब्दाशिवाय काव्य संभवत नाही हे जसे खरे; म्हणजे काव्यानुकूल शब्दांमुळे कवी हा काव्यातल्या कल्पनांची मांडणी करू शकतो, त्याचप्रमाणे अशा रसाळ शब्दांचे गुंजन कवीच्या मनात सतत चालू असल्यामुळे तो भोवतालच्या रूक्ष व्यवहारात रस घेऊ शकत नाही. अशा परिस्थितीत जशास तसे या न्यायाने या व्यावहारिक जगाकडून कवीची उपेक्षा झाल्यास काय आश्चर्य ? सर्व बाजूंनी होणाऱ्या या उपेक्षेमुळे कवी हा चिन्ताग्रस्त होतो आणि त्याच्या मनाची संस्कारक्षमता नष्ट होते. संस्कारक्षमता नाहीशी होताक्षणीच काव्यानुकूल शब्द हेही आपोआपच नाहीसे होणार ! पण नवनवोन्मेषशालिनी प्रज्ञा असलेला कवी हा आशावादी असतो. त्याच्या प्रभावी आशावादामुळे तात्पुरती नाहीशी झालेली संस्कारक्षमता ही पुनः जागृत होते; व पुनः एकवार त्याच्या काव्याला नवा बहर येतो. फक्त शब्दांचीच कमतरता असते म्हणून कवीच्या मनातील अर्थ केवळ शब्दांचीच वाट पाहत असतो.

काव्यनिर्मितीप्रक्रियेचे स्वानुभवावर आधारलेले अत्यंत प्रत्ययकारक वर्णन कवीने 'शब्दांनो, मागुते या !' या कवितेमध्ये केले आहे. काव्यनिर्मितीतील शब्दांचे दुहेरी कार्य येथे स्पष्ट झाले आहे. या कवितेची सूक्ष्म छाननी केली तर केशवसुतांच्या कवितेसंबंधी व एकंदर काव्यासंबंधी सर्वसामान्य टीकाकारांच्या मनात जे अनेक पूर्वग्रह असतात ते निरस्त होतील. काव्यनिर्मितीची

तळमळ आहे पण काव्योचित शब्दच केशवसुतांना सुचत नसत त्यामुळे ते सतत शब्द जुळविण्यासंबंधी धडपड करीत असत असा एक प्रवाद केशवसुतांसंबंधी प्रचलित आहे या प्रवादाला खुद्द 'शब्दानो, मागुते या !' ही कविता देखील कारणीभूत झालेली दिसते. या कवितेचे यथार्थ आकलन केल्यास कवीच्या मनात काव्य आणि व्यवहार यांच्या द्वंद्वामुळे कशा प्रकारची आंदोलने निर्माण होतात व ज्याच्या मनोभूमिकेवर प्रतिभेचे अधिष्ठान प्रस्थापित झाले आहे तो कवी काव्य-निर्मितीबद्दल येणाऱ्या अडचणींचा आपल्या आशावादी तत्त्वज्ञानामुळे कसा सहजासहजी निरास करू शकतो हेही येथे स्पष्ट झाले आहे.

केशवसुतांना काव्याच्या निर्मितिप्रक्रियेची किती विशद जाणीव होती हे जसे या कवितेमुळे कळून येते त्याचप्रमाणे काव्यविषयावरील कविता देखील किती सफाईदार रचनेत होऊ शकते याचाही प्रत्यय या कवितेत येतो. केशवसुतांची कविता ही ओबडधोबड खडबडीत शब्दांनी बनलेली आहे या आक्षेपाला ही कविता एक साक्षात् उत्तर आहे. शब्दांचा ओबडधोबड-पणा किंवा मुलायमपणा हा त्या शब्दांनी व्यक्त होणाऱ्या अर्थाशी संवादी असतो. हाच आशय केशव-सुतांनी आपल्या अनेक काव्यविषयक कवितांतून प्रस्तुत कवितेतून विशद करून सांगितला आहे, तो लक्षात न घेता काव्यातील भाषेचा वेगळाच विचार करणे रास्त होणार नाही. वऱ्हाडी भाषेत पारिजातकाच्या झाडाला खडबडीचे झाड म्हणतात. खडबडीच्या झाडाची फक्त खडबडी लक्षात घ्यावी, पण त्या झाडावर निर्माण होणाऱ्या अलौकिक रंग-संगतीच्या, मनोहर आकाराच्या आणि मधुर सुगंधाच्या नाजूक फुलांकडे मात्र लक्ष जाऊ नये, याला अभिजात अरसिकतेशिवाय दुसरे कोणते नाव द्यावे ?

अनुक्रमणिका

केशवसुतांचा लढा

दिलीप पुरुषोत्तम चित्रे

केशवसुतांची कविता मराठी परंपरेच्या ऐतिहासिक संदर्भातली एक महत्त्वाची आणि विवाद्य जागा आहे. ह्याच ठिकाणी मराठी परंपरेचा स्वाभाविक स्रोत दुबळा झाला आणि इंग्रजी शिक्षणाच्या संस्कारांच्या जोरदार प्रवाहात तो पूर्णपणे गुरफटला. ह्याच ठिकाणी महानुभावांपासून तुकारामापर्यंत अत्यंत समृद्धपणे प्रकट झालेला मराठी संवेदनस्वभाव (sensibility) एका विचित्र खोड्यात अडकला. आमचे स्वाभाविक साहित्यादर्श हरवून गेले आणि व्हिक्टोरियन दृष्टिकोणातून इंग्रजी परंपरा जशी दिसत होती तिचा, अनोळखीपणामुळे जास्तच क्षीण झालेला, कित्ता जास्त प्रभावी ठरला. स्वायत्त उच्चारशक्तीचा शोध घेणारी केशवसुतांची पिढी ह्या बदलत्या धारणांना बळी गेली.

लॉर्ड मेकॉलेने भारतीय विद्यार्थ्यांसाठी जो शिक्षणक्रम रचला त्याचा मुख्य हेतू इथल्या ब्रिटिश नोकरशाहीसाठी कसबी नेटिवांचा एक कार्यक्षम वर्ग निर्माण करणे हा होता, हे उघड आहे. ह्या नेटिवांवर इंग्रजी, व इंग्रजी दृष्टिकोणांतून एकूण पाश्चिमात्य संस्कारांची छाप टाकणे हे अव्वल इंग्रजीतल्या शिक्षणक्रमाचे ध्येय होते. त्यामुळे जसे अनेक महत्त्वाचे सामाजिक व बौद्धिक आदर्श बीजरूपाने इथे येऊन पडले त्याचप्रमाणे अनेक अनोळखी आणि अस्वाभाविक आदर्शही आमच्या संवेदनस्वभावासमोर उभे झाले.

थोडे मागे जाऊ. श्रीज्ञानदेव हे दांतेचे समकालीन. सांस्कृतिक दृष्टया कोठल्याही ठिकाणच्या श्रेष्ठ कलावंताइतकाच सशक्त होता. त्यामुळेच त्यांची उच्चारशक्ती स्वायत्त होती. तुकाराम एलिझाबेदन इंग्रज कवींच्या जवळपासच्या काळातला कवी. आणि काव्यदृष्टया कोणत्याही एलिझाबेदन इंग्रज कवीपेक्षा जास्त प्रगल्भ आणि उच्चारक्षम, तितकाच स्वयंभू, आणि शोधक. ह्या शतकाच्या सुरुवातीनंतरचे इंग्रजीभाषीय कवी एलिझाबेदन आणि रनेसांसपूर्व पाश्चिमात्य साहित्यादर्शांकडे पुन्हा वळले. आता, अव्वल इंग्रजीतल्या संस्कारांकडे वळू. तेव्हाचे सर्व साहित्यादर्श गोल्डन् ट्रेझरीतले. गोल्डन् ट्रेझरीचा मुख्य भर आहे रोमँटिक काव्यावर : शेली, कीटस, बायरन, आणि मग वर्डस्वर्थ. पुढे किंचित् ब्राव्निंग्. ह्या कवींपैकी कोणाचीही आपण मराठी परंपरेतल्या थोर काव्याशी तुलना करा. ते सर्व कमी पडतात. त्यांचे भावकाव्य एलिझाबेदन काव्यापुढे फिके, बेचव, भरताड वाटते. आणि त्यांचा संवेदनस्वभावावरला संस्कार तीक्ष्ण असणे अशक्य वाटते. भावकाव्य हा त्यांचा बालेकिल्ला. निसर्ग आणि अतिरंजित प्रणय हे त्यांच्या भावविश्वातले प्रकर्षाने प्रकाशणारे विषय. आत्मशोधन आणि वस्तुनिष्ठा ह्या त्यांना वर्ज्य वाटणाऱ्या गोष्टी.

असल्या संस्कारांना केशवसुत, त्यांच्या पाठचे कवी, आणि पुढल्या पन्नास वर्षांतली मराठी कविता बळी गेली.

मात्र केशवसुत, बी आणि थोड्याच अंशी बालकवि यांची मूळची उच्चारशक्ती स्वायत्त होती, त्यांचा नेटिव संवेदनस्वभाव इतके असूनही टिकून राहिला. **आणि ह्या टिकावातच त्यांचे मोठेपण**

दिसते. पुढल्यां पन्नास वर्षांत असा टिकाव धरलेला कवि विरळा.

इथे ह्या गोष्टींचे सोदाहरण, तपशीलवार विवेचन मी करू शकत नाही, कारण तसा प्रयत्न मी पुढे सविस्तर करणार आहे. ही फक्त त्या प्रयत्नाची रूपरेषा.

परंपरेशी जिवंत संबंध तुटल्यामुळे स्वाभाविक उच्चारपद्धति विकृत करणारी वृत्ते मराठीत उगवली ती याच सुमारास. पूर्वी पंडितकवींना अशाच विकृत पद्यरचनेचा आश्रय करावा लागला होता. उलट संतकवींच्या ओव्या-अभंगात मराठी उच्चारपद्धतीच्या स्वायत्त सामर्थ्याची जाणीव स्पष्ट दिसते. ही स्वाभाविक उच्चारपद्धती पुढे अटळपणे बदलली, कारण अव्वल इंग्रजीत गद्याचा विकास झाला आणि आमच्या संभाषणपद्धतीवर ह्या बदलांचे प्रभावी संस्कार झाले. पण व्हिक्टोरियन इंग्रजी साहित्यदर्श आणि संस्कृत पद्यविचार ह्यांची दुहेरी पकड काव्यात मात्र दुहेरी ऱ्हासाची लक्षणे दाखविते.

केशवसुतांवर ही पकड तितकीशी घट्ट नाही. आणि हळव्या कानाच्या लोकांना जिथे त्यांची पद्यरचना दांडगी व मठ्ठ वाटते, तिथेच त्यांचा मराठी संवेदनस्वभाव इंग्रजी परिणामांशी निकरावर आलेला दिसतो. मर्ढेकर असेच नंतर निकरावर आले—पण "काही कविता"त त्यांना गवसलेली उच्चारशक्ती पुढे "आणखी काही कवितां"तील पादाकुलकाने क्षीण केली. केशवसुतांनंतरच्या पिढीत तांब्यांसारखा कवी ही उच्चारशक्ती सहज भासणाऱ्या यांत्रिक पद्यरचनेत गमावून बसला. उलट पु. शि. रेग्यांना ती उच्चारशक्ती सापडली.

"कोणीकडून कोणीकडे", "सतारीचे बोल", "झपूर्झा" ह्या कवितांत केशवसुत स्वाभाविक उच्चारशक्तीचा प्रभाव गाजवतात. इतकेच नव्हे तर इतर कमी महत्त्वाच्या कवितांतही त्यांची दांडगी मराठी शब्दसंहती यांत्रिक वृत्तरचनेशी झगडते. त्यांचा हा झगडा बालकवींच्या प्रवाही भासणाऱ्या पण अस्वाभाविक पद्यरचनेपेक्षा जास्त भीषण, जास्त सर्जनशील आहे. स्वतःच्या उच्चारशक्तीचा शोध कोणाही कवीला जीवघेणा वाटावा इतका भयंकर असतो, कारण त्याद्वारा तो स्वतःच्या संवेदनस्वभावाचा शोध घेत असतो. आणि हा शोध खरोखर धाडसी टिकाऊ, आणि कालातीत व्हायला, स्वतःच्या काळाची, त्यातल्या सांस्कृतिक अराजकाची, आणि स्वतःच्या व्यक्तित्वावर होणाऱ्या प्रत्येक संस्काराची आणि आघाताची, सूक्ष्म आणि विकासशील जाणीव असावी लागते. मला वाटते, केशवसुत ही लढाई हरले, पण त्यांच्या पिढीत वा नंतरच्या अर्धशतकात, इतर कोणी ही लढाई सरळसरळ लढलेच नाहीत.

केशवसुतांची कविता आज मला झपाटू शकते ती तिच्यातल्या ह्या उच्चारक्षम संघर्षामुळे आणि त्यातून लाभलेल्या सर्जनशील मुक्तीमुळे.

वैर तयांला, थप्पड बसता.
चोळिति जे गालांस,
वैर तयांला, जे गरिबी
शिकवितात बालांस !

अनुक्रमणिका

केशवसुतांची इंग्रजी कविता

व. दि. कुलकर्णी

केशवसुतांचे धाकटे बंधू सीतारामपंत दामले यांनी केशवसुतांचे इंग्रजी चार 'चुटके' (=कविता) 'चित्रमयजगत्'च्या १९२१ च्या डिसेंबरच्या अंकात प्रसिद्ध केले. 'आणखी' दोन तीन (चुटके) प्रसिद्ध करण्यासारखे आहेत' असे त्याचवेळी सीतारामपंतांनी म्हटले होते, पण हे चुटके काही प्रकाशात आले नाहीत. प्रा. भवानीशंकर पंडित यांनी संपादित केलेल्या 'समग्र केशवसुत' या ग्रंथात उपारिनिर्दिष्ट चार 'चुटक्यां'हून आणखी एक नवा 'चुटका' समाविष्ट करण्यात आलेला आहे. तेव्हा केशवसुतांच्या प्रकाशित अशा इंग्रजी कवितांची संख्या 'पाच' होते. त्यांची शीर्षके उपलब्ध लेखनकाल आणि स्थल पुढीलप्रमाणे आहेत —

१. 'TO A POET.' (कल्याण, २१ एप्रिल, १८९१)
२. 'FLOWERS FROM A GRAVE' (मुंबई, २३ फेब्रु. १८९२)
३. 'THE WAVES' (२१ डिसें. १८९३)
४. 'AN APOLOGY TO A FLOWER'
५. 'THE STAR OF CONSTANT LOVE'

यातील पाचव्या कवितेच्या शेवटी 'K. K. D.' अशी केशवसुतांनी आपल्या संपूर्ण नावाची आद्याक्षरे घातली आहेत.

या पाचही कवितांचे मराठी अनुवाद येथे देत आहे. हा अनुवाद पद्यरूपात नाही, आणि अगदी शब्दशः- ही केलेला नाही; शेवटच्या कवितेच्या अनुवादासाठी मुक्तशैलीचा अनिबंधपणे वापर केला आहे. केशवसुतांच्या इंग्रजी कवितांची सुरस आणि समर्पक अशी मराठी काव्यरूपे मराठी सिद्धहस्त कवींनी करणे इष्ट आहे; तोवर हा गद्यानुवाद बराच उपयुक्त ठरेल !

(१) कवीस*

'चंद्रबिंबातले अमृत(किरण) प्राशन करण्यासाठी जेव्हा जेव्हा कृष्ण मेघ पांगतात—

'अलौकिक स्वप्नांच्या पंखांवर बसून जेव्हा जेव्हा माझं हृदय उंच झेपावत जातं,

अन्

शुभ्रधवल स्वर्गंगेवरून पायी विहार करण्याची इच्छा करतं—

'माझ्या विशीर्ण जीवनतरूवर जेव्हा जेव्हा एखादं फूल फुलून येतं,

अन्

दैनंदिन चिंता-गरजांच्या, जीव चिरीत जाणाऱ्या सुरीची तमाही न बाळगता,

माझा जीवनतरू, कल्पनावृष्टीत न्हाऊन निघून मौक्तिकमय होऊ इच्छितो —

'माझ्या विजनातील कुंजात जेव्हा जेव्हा मुक्त कोकिल विहंग सहज म्हणून शिरतो,आपलं गीत पकडू पाहातो अन् क्षणा–दो–क्षणात स्वतःच मूर्तिमंत गीत होऊन जातो—

"(तेव्हा)........"

......(खरं म्हणजे) ही माझी

* 'To a Poet'

चिरंतन मधुर अशी इच्छा (स्वप्नं) आहेत,
पण याहूनही माझं एक आणखी कितीतरी
मधुर असं वेगळं इच्छास्वप्न आहे !

वाटतं की, ' मला साक्षात् ' कवी 'ला भेटण्याची
संधी मिळावी, त्याच्या चरणांशी मी नमावं
अन् ती ' भावलय ' आस्वादावी,

अगदी तिच्या उगमबिंदूशीच !'

* *

(२) कबरीवर आलेली फुले*

माणसांच्या वर्दळीचा उबग आला, भटकंतीला कंटाळलो, काळजीनं थकलो, आणि एका शांतशीतल पर्वत–प्रदेशात आलो; हेतू हा की मनाला काही समाधान मिळवावं !

माणसांच्या वर्दळीचा मला उबग आला, पण खरं तर, तिथं मला खूप कामं होती; परंतु दैवाचा फासा उलटा पडला आणि त्यानं मला नैराश्य (भूमीत) फरफटत नेलं.

मी अतिनिवांत अशी एक जागा शोधली, आणि मधमाशांच्या पोळ्याप्रमाणे गजबजलेल्या घोंगावणाऱ्या जगासंबंधीचे आगंतुक विचार मनात घुसू नयेत, त्याविषयी मन बंद करावे म्हणून मी कल्पनाविहारात रमायचं ठरविलं.

सभोवताली वाढलेलं गवत बाजूला करीत मी निघालो, तोच एका लहानशा उंचवट्यावर एक साधी फुलांनी झाकून गेलेली कबर मला दिसली. मी लगेच तडक तिकडं निघालो.

फुलांनी इतकी झाकून गेलेली कबर मी पाहिली, पण खरंच मला त्यानं आनंद झाला का? 'नाही' असं मी म्हणू शकत नाही; तरी पण माझ्या मनात काही तरी खळबळलं !

मनात विचार आला " या हरितसुंदर कबरीखाली जे हृदय गाढ निद्रा घेत आहे, तेच या फुलवेलीचं पोषण करीत आहे, तिच्या अनुपम कळ्या फुलवीत आहे. ते हृदय किती गोड असेल नाही ?...

"ज्या हृदयानं जिवंतपणी संगीताचे सूर आळवावे, त्यालाच आपली रक्षा भूषविण्यासाठी फक्त एखादं फूल, एखादी कळी अर्पण करता यावी ना ?"

मी अशी कल्पना करतो आहे तोच माझ्या अंतर्हृदयातून तिचाच प्रतिध्वनी उठला, आणि मी आतल्या आत कान देऊन ऐकू लागलो, तर माझ्या हृदयातून हे बोल उमटत होते—

"अरे, तुझ्या ठायी जो 'कवी' वास करीत आहे, तो मृत्यू पावला तर —(माझं दुर्दैव जर असंच नेहमी माझ्या वाटेत येऊन माझ्या विरुद्ध ओरड करू लागलं, तर हे घडणं अनदी संभवनीय आहे !) आणि मागं केवळ देहमात्रच मला जगत राहावं लागलं तर ? त्या स्थितीचं वर्णन शब्दांनी करणं फार कठीण आहे; मी सांगतो, मी म्हणजे 'माझ्या काव्यकलेचं जिवंत कब्रस्तानच' बनेन; निःसंशय मरणाहून हे महाभयंकर आहे.

"आणि दिव्याग्नीची (दैवी प्रतिभाज्वालेची) ठिणगी (स्फुलिंग) येथे अंतर्हित असल्याची खूण म्हणून या माझ्या कबरीतून अबूनमबून काही भावलयी जेव्हा उठतील तेव्हा एखादा पांथस्थ इथं थांबेल का ? या कबरीखाली पहुडलेल्या जिवासंबंधी जसं मला काही वाटतं, तसं त्याला माझ्यासंबंधी काही वाटेल का ?"

बस्स ! माझ्या हृदयभूमीतून याहून आणखी काही शब्द उमटले नाहीत. मी अगदी भारावून गेलो पुढं सरलो, त्या कबरीवर वाकलो. मी फुलं चुंबिली ! अश्रू वाहातच राहिले ! !

(३) सागरलहरी*

...उन्हात चमकणाऱ्या सागरावर लाटांचा नाच
सुरू आहे; त्या खेळत आहेत, खिदळत आहेत.
दुःखानं गांजून गेलेलं जग त्यांच्या ध्यानी-
मनीही नाही. खेळकर वाऱ्याबरोबर त्या हलत-
डुलत आहेत.

...या कठीण जगात सर्वत्र, पशु–पक्षी आणि मनुष्य
प्राणी यांच्या नशिबी येणारीं दैन्यं आणि दुःखं

* ' Flowers from a Grave.

* ' The Waves '

यांचं त्यांना काय कळणार आहे? आणि त्यांनी ह्याची चिंता तरी का करावी? त्या भाग्यवंत आहेत!

...वायुलहरी येतात आणि त्यांना साद घालतात; झटकन् सागरतळापासून एखाद्या जलपरीसारख्या मोहकपणे त्या वर येतात. सूर्यकिरण चुंबन घेऊन त्यांना झोपवू लागतात—सूर्य निघून जातो अन् सागरपृष्ठावर लाटांची खळी पडत राहाते!

(४) पुष्पास क्षमायाचना*

'हे पुष्पा, मी तुला खुडीत आहे; क्षमा कर; रागावू नकोस! अरे, मला स्वतःची पूजा करायची नाही! कारण (हे पहा), मी प्रेमाचा इतका काही दास बनलो आहे की, माझा 'मी'-पणाचा सारा बडिवार मी केव्हाच टाकून दिला आहे.

'हे पुष्पा, मी तुला खुडतो आहे ना, ते माझ्य 'तारा'साठी, तिच्या मुखप्रसाधनासाठी! तुझं सारं नाजूक सौंदर्य तिथं उमलू दे, खुलू दे! आणि (हे पहा) पुष्पा, तुझ्या गंधोच्छ्वासातून तिला माझी गोड प्रतिज्ञा कळू दे की, 'मी' तिचीच--अलौकिक देवतारूप अशा तिचीच--अनन्य सेवा करणार आहे!'

(५) चांदणी, अढळ प्रीतीची*

'प्रिये, तुझी माझी भेट झाली,
त्याला दोन महिने झाले;
दोन महिने होत आले!
ती रात्र!--किती झर्कन् संपली...
वाटत होतं, ती सारखी वाढतच राहावी!
कारण--माहीत होतं तुला-मला,
पहाट होत आली आहे
अन् निरोप घ्यावयाचा आहे—
तुला माझा, मला तुझा—
नकोनकोसा!

अन् ठावूक होतं हेही आणखी—
जायचं होतं मला
पाय ओढीत कष्टानं,
ओलांडीत दरी-खोरी,
ओसाड-भयंकर..
मागं सोडून, तुला एकटीला,
अश्रूंनी न्हालेल्या,
नाजूक आठवणींची
करीत उजळणी!

पहाटेचा वियोग!
कल्पनेनंच त्याच्या, केलं आपणांस, प्रिये,
'प्रियतर' (प्रियतम)
एकमेकां!

दोन हृदयं, प्रीतीनं त्या,
ओढली जवळ—आणखी जवळ--अगदी जवळ!

त्या रात्री, हलकेच उघडली
जाळी सरकती गवाक्षाची
आणि पाहिली चांदणी ध्रुवाची
आपण दोघांनी, (अगदी दोघांनी)
निःश्वसलो, अन् वदलो,
आहोत अढळ, अगदी आपण
चांदणीपरी--ध्रुवाच्या या!

खरंच प्रिये असलो दूर
कितीही आपण,
तरीही आपुली प्रीति अढळ,
अगदी अचल...
कारण पहा की, चमकत आहे
तुझ्याही वरी अन् माझ्याही वरी
ती एकच चांदणी,
अढळ प्रीतीची, उदात्त सुंदर
'ध्रुवाची चांदणी'

* *

ह्या कविता केशवसुतांनी वयाच्या पंचविशीत केलेल्या आहेत. १८९१ ते १८९४ या तीन-चार वर्षांतल्या या कविता. या काळात केशवसुतांचे वास्तव्य

---

* 'An Apology to a Flower'
* 'The Star of constant Love!'

मुंबईत व अल्पकाळ कल्याणात होते. त्यांचे यावेळी इंग्रजी काव्यग्रंथांचे वाचन बरेच होते. कीट्सचे 'Endymion' व शेलेचे 'Prometheus Unbound'चे त्यांनी वाचन केल्याची नोंद आढळते (समग्र केशवसुत सं. भ. श्री. पंडित, पृ. ५७). ते नेहमी आपल्या नादात गर्क दिसत, ते आपली काव्ये म्हणून दाखवीत, त्यावेळी त्यांच्या नजरेत चांगलेच तेज चमकू लागे...इत्यादी तपशीलही (या काळातला) आपणांस मिळतो. 'या वेळी केशवसुतांनी टेनिसनचे काहीच वाचले नसावे.' असेही वि. रा. जोशी यांनी आवर्जून नोंदविले आहे. ह्या माहितीच्या आधारे केशवसुतांची इंग्रजी कविता आणि याउलट त्यांच्या इंग्रजी कवितेच्या आधारे ही माहिती आपणांस परीक्षून घेता येईल, आणि त्यातून निघणारे निष्कर्ष फार महत्त्वपूर्ण आणि मूलगामी ठरतील, असे वाटते.

केशवसुतांच्या ह्या इंग्रजी पाच कवितांमध्ये प्रकट झालेली जीवनानुभूती आणि कविप्रकृती थोडक्यात अशी आहे—

'...हे जग दुःखाने परिपूर्ण भरले आहे; येथील जीवमात्राच्या कपाळी दैन्य-यातना लिहिल्या आहेत. दैनंदिन गरजांची सुरी जिवाला उभी चिरीत जाते—ही पृथ्वी अंतर्बाह्य कठीण (hard) आहे.

आपले दैव प्रतिकूल आहे; ते नेहमीच आपल्या आड येते, वैर साधते; आपला जीवनवृक्ष विशीर्ण झाला आहे.

या व्यावहारिक गद्य जिण्याची केशवसुतांना चीड आहे; माणसांच्या वर्दळीचा त्यांना उबग आला आहे. हे जग म्हणजे घोंघावणाऱ्या मधमाशांचे पोळ आहे. हे सोडून एकान्तात, विजनात केशवसुतांना काही विशेष समाधान लाभते.

या जगाचा विचारही मनात यायला नको म्हणून ते कल्पनाजाल विणीत बसतात; कल्पनेच्या बरसातीत न्हाऊ पहातात. काळे ढग दूर जावेत आणि चंद्रामृत पिण्यास मिळावे; हृदयाला पंख फुटून आकाशगंगेच्या पट्ट्यावरून फिरावयास जावे, कोकिळपक्षाने आपल्या घरी यावे, अशी स्वप्ने ते पाहू लागतात, आणि त्यात इतके रंगून जातात की ती स्वप्ने प्रत्यक्ष साकारच झाली आहेत, असेच त्यांना वाटू लागते. कल्पनाविलास आणि स्वप्नरंजन यात ते रमतात.

निसर्ग त्यांना भाग्यवान (Blessed) वाटतो; त्याला मानवी दुःखाची दाद ना फिर्याद! सुंदर, खेळकर, आनंदी, असा हा निसर्ग आहे. त्याच्याठायी 'Spirit's grace' आहे. 'कवी होणे' हे केशवसुतांचे महत्तम स्वप्न होय; महत्तम ध्येय होय!

'To bend low at a Poet's feet,
And, at its source to taste
his rhyme!'

ही त्यांची मधुरतम जीवनेच्छा होय! आपली प्रतिभा आटली, कवित्वशक्ती गेली तर आपण 'काव्या'चे जिवंत थडगे होऊ ही त्यांची भावना आहे. आपल्या 'कवित्वा'चे भविष्यकाळात स्मरण व्हावे ही त्यांची इच्छा आहे.(?)

कवि आणि कविता यांबरोबरच केशवसुतांची 'अपरकवितादैवता'वरील भक्तीही दृढ आणि खोल आहे. पत्नी ही देवतागुणरूप आहे; या भक्ताने फुले खुडायची ती तिच्या पूजेसाठी! 'अहंकार तिच्या पायी अर्पण करून हा पूजाप्रारंभ होतो. हे प्रेम ध्रुवताऱ्यासारखे अविचल, स्थिर आणि हृदयंगम आहे.. ...'

ही प्रवृत्ती Romantic प्रवृत्ती होय. रोमँटिक वाङ्मयात अगत्याने आढळणाऱ्या, अगदी निवडून काढलेल्या गुणधर्मांतील 'Delight of desolation', 'Silence', 'Remoteness' या गुणधर्मांचा उघड आविष्कार या कवितांत आहे.* इतका की, इंग्रजी रोमँटिक कवितेतील नित्य आढळणारी 'A lowly grave with flowers crow-

* —'Poets as dreamers should sit aloof, listening to the ethereal voice of silence and trying to render it into their uncouth vernaculars, whenever the Muse favours them—'

—'कविसंमेलनासंबंधी केशवसुतांचे उद्गार

—'समग्रकेशवसुत'–सं. भ. श्री. पंडित, पृ. ३९१

ned' ही एका गीतात भावचिंतनाचा विषय झाली आहे. केशवसुतांच्या मराठी कवितेत अशी कबर किंवा समाधी कुठेही येत नाही. 'Flowers From a Grave'मध्ये कबरीत चिरनिद्रा घेणारी व्यक्तीच कबरीवरील फुलवेलींचे पोषण करते, अशी जी कल्पना आहे ती उमरखय्यामच्या

And this delightful Herb
whose tender Green
Fledges the River's Lip on
which we lean—
Ah, lean upon it lightly!
for who knows
From what once lovely lip
springs unseen!
(रुबाई १९)

या रुबाईची आठवण करून देणारी आहे. अर्थात् केशवसुतांच्या काळी मराठी काव्यरसिकांना आणि कवींना उमरचे वेड लागलेले नव्हते; टागोरांच्या 'गीतांजली'च्याही वेडाआधी वीस वर्षे ही कविता केशवसुतांनी केलेली आहे. शेली, बायरन्, कीट्स् यांच्या भावकवितांशी समरस, तन्मय झाल्याने, आणि मूलतःच त्यांच्याशी समानधर्मित्व असल्याने केशवसुतांची कल्पनाशक्ती अशी सहजतेने भावस्पंदने चित्रित करीत होती.

पालग्रेव्हच्या 'Golden Treasury' मध्ये कवी 'ग्रे'ची 'Elegy written in a oountry Church-Yard' या शीर्षकाची जी कविता आहे तीमध्ये कबरीतील जीवात्म्यासंबंधीच्या कविभावना व्यक्त झाल्या आहेत;

Perhaps in this neglected
spot is laid
Some heart once pregnant
with celestial fire;
Hands, that the rod of
empire might have sway'd,
Or waked to ecstacy
the living lyre:

इत्यादीमधील भावना बीजरूपाने केशवसुतांच्या अंतर्मनात असणे सहजसंभवनीय आहे. केशवसुतांची Golden Treasury ची पारायणे आणि त्यातही 'ग्रे'च्या ह्या कवितेची लोकप्रियता ध्यानी घेता केशवसुतांचा 'कबरीशी' झालेला हृदयसंवाद कसा प्रकटत गेला ते समजून येते. कवी 'ग्रे'च्या याच कवितेत 'Far from the madding crowd's ignoble strife' ही वृत्तीही व्यक्त झाली आहे. केशवसुतांनी 'Sick of the busy haunts of men' या शब्दरूपांनी तेच म्हटले आहे. येथे 'ग्रे'च्या कवितेशी केशवसुतांच्या 'Flowers from a Grave' या कवितेची तुलना करायची नाही; दोन्हीतील अनुभवसृष्टी अगदी भिन्न आहेत; पण काही कल्पना, काही अभिव्यक्तीचे सादृश्य आढळते, हे मात्र खरे!

'To a Poet' मधील स्वप्नरंजनात जितकी विमुक्तता आणि अलौकिक सौन्दर्यास्वादोत्सुकता आहे तितकी केशवसुतांना आपल्या मराठी भावकवितेत साधलेली नाही. या इच्छास्वप्नांतून त्यांचे रोमँटिक मन एका आदर्श विश्वाच्या भेटीला निघाले आहे; जे अलौकिक आणि अमर आहे त्याच्याशी आपले नाते जोडून बसले आहे! कोकिळ पक्ष्याला मरण आहे पण त्याच्या संगीताला मृत्यू स्पर्शू शकत नाही! आकाशातील चंद्रामृताचे तळे कधीही आटणारे नाही! स्वर्गेचा दिव्य मार्ग विशुद्ध आणि अक्षुण्णच राहाणार! केशवसुतांना हवा आहे तो ह्या अशा निष्कलंक, परमनिर्मळ, नितांत सुंदर, अक्षयानंदरूप, निर्लेप सृष्टीतला मुक्त रम्य विहार! या स्वप्न-सृष्टीत मानव नाही. पृथ्वीवर स्वर्गसमक्षता पाहू बघणारे नंतरचे केशवसुत ऐन पंचविशीत स्वर्गीय वास्तवातच जणू प्रत्यक्ष विहरत होते आणि या दिव्यत्वाचे द्रष्टे म्हणून 'कवि'कोटीची पूजा करीत होते! केशवसुतांच्या स्वर्ग-वरेच्या चुंबनाची ही वेगळी प्राथमिक मनोभूमी आहे; उत्तरकालीन गूढवादाची पूर्वावस्था (pre-mystic and pro-mystic) येथे जाणवते.

प्रत्यक्षपणे निसर्गाला वाहिलेली अशी केशवसुतांची मराठी कविता आढळत नाही. फुलपाखरू, भृंग, पुष्पाप्रत इत्यादी कविता या निसर्गदर्शनात्मक म्हणण्यापेक्षा आत्मचिंतनपरच अधिक आहेत, आणि या आत्मचिंतनातून जीवनार्थ व्यक्त झालेला दिसतो.

'The Waves' मध्येही कविमनाची हीच भावप्रतिक्रिया असल्याचे स्पष्ट होते; आणि त्यातील जीवनचिंतनार्थही तोच— म्हणजे 'Nature is blessed and, men and creatures are miserable!' हाच! फक्त पुष्प–पतंग यापेक्षा 'The Waves' हा विशाल–विस्तृत–विलोल दृक्–संवेदना घडविणारा असा विषय आहे. आणि त्या दृक्-संवेदनांचे काहीसे चित्रण येथे केशवसुतांनी केलेही आहे. शिवाय सूर्यकिरण आणि सागरलहरी यांच्यातील एक भावबंधही येथे सूचित झाला आहे. सूर्यकिरणांच्या स्पर्शाने भावपुलकित झालेल्या सागरलहरींचे खेळकर हसणे–नाचणे, आणि दिनान्तीच्या सूर्यकिरणांच्या निरोप–चुंबनाने लहरींचे आतल्या आत विरत–विरत जाणे, यात काही भावनिक संबंध केशवसुतांना अभिव्यञ्जित करायचा आहे. 'Sunlit Sea' आणि 'Sunless ocean' या दोन विरोधी अवस्थांतील सागरलहरींचे जीवन येथे चित्रित झाले आहे. केशवसुतांच्या मराठीतील निसर्गकवितांतील पेक्षा 'The Waves' मध्ये निसर्गसौंदर्यचित्रण आणि निसर्गदर्शन याकडे केशवसुतांचे बरेच स्वतंत्र असे लक्ष गेलेले आहे.

'An Apology to a Flower' आणि 'The Star of Constant Love' या कवितांतील प्रणयभावनांचे चित्रण केशवसुतांच्या मराठी कवितेतील प्रणयभावनेपेक्षा अधिक अशारीरिक, म्हणजे मानसिक स्वरूपाचे आहे. केशवसुतांच्या मराठीतील प्रेमकवितांतून चित्रित झालेला विप्रलंभ शृंगार आणि उत्तानता ही संस्कृत काव्यातील रीतीशी जुळणारी आहेत, तर, इंग्रजी कवितांतील प्रेमदर्शन हे इंग्लिश रोमँटिक कवींच्या कवितांतील चित्रणाशी अधिक प्रामाणिक आहे. यात 'The thoughts of parting at the dawn' आणि 'all claims of self.' टाकून दिल्याची अनुभूती आहे. प्रेमानुभूतीतील एकनिष्ठता, अचलता, आत्मलोप, ऐकांतिक भक्ती यांचाच भावोत्कट आविष्कार या गीतांतून झाला आहे.

काव्यकलेला किंवा कविप्रतिभेला केशवसुतांनी 'Promethean Spark' असे म्हटले आहे. ('Flowers from a Grave' मध्ये) प्रॉमेथिअस ही (ग्रीक पुराणात) मुळात अग्निदेवता असावी; 'Prometheus, the Fire bearer' असे संबोधिले गेलेही आहे. शेलीच्या 'Prometheus unbound' या 'काव्यरूप नाटका'त (Lyrical Drama) 'प्रॉमेथिअस' जो दाखविला आहे तो 'आदर्श मानव' म्हणूनच. या नाटकाच्या प्रस्तावनेत शेली म्हणतो, "Prometheus is, as it were, the type of the highest perfection of moral and intellectual nature, inpelled by the purest and the truest motives to the best and noblest ends" प्रॉमेथिअस हा मानवधर्माचा प्रवक्ता होता; त्याने 'अग्नी' आणि 'कला' मानवांना दिल्या. याचा क्रोध येऊन झीअसने त्याला विजनातील एका मोठ्या शिळेवर खिळचांनी ठोकून टाकले होते; तरीही तो शरण गेला नाही; त्याची इच्छाशक्ती आणि सहनशक्ती कल्पनातीत होती. ......' In addition to courage and majesty, and firm and patient opposition to omnipotent force, he (Prometheus) is susceptible of being described as exempt from the taints of ambition, envy, renvenge and a desire for personal aggrandisement', असे प्रॉमेथिअससंबंधी शेलीने आणखी म्हटले आहे. १८९१ ते १८९४ या काळात केशवसुतांनी Prometheus Unbound वाचल्याचा उल्लेख मागे आला आहे. तेव्हा 'Promethean Spark' हा शब्दप्रयोग करताना केशवसुतांना काय अभिप्रेत होते, ते सहज ध्यानी येईल. मानवाला पूर्णत्व आणून देणारी, पृथ्वीला सुरलोकसाम्य देऊ शकणारी सर्जनशक्ती, म्हणजे ही 'प्रॉमेथिअन स्पार्क' होय.

या 'प्रॉमेथिअन स्पार्क'चा उल्लेख ज्या कवितेत आला आहे ती कविता २३ फेब्रु. १८९२ मध्ये लिहिलेली आहे. या आधी एक वर्ष केशवसुतांनी 'कल्पकता' (१७ फेब्रु १८९१.) आणि त्याही आधी सहा महिने

दिव्य ठिणगी ' (२७ ऑगष्ट १८९०) ह्या दोन कविता लिहिल्या. ही ' दिव्य ठिणगी 'च पुढे ' spark promethean ' म्हणून अवतरली असावी. कवी, कविप्रतिभा, काव्यहेतू, काव्यप्रभाव या संबंधीच्या त्यांच्या साऱ्या मराठीतील, कवितांचे अर्थ ' Spark Promethean '· या एका संज्ञेत स्पष्ट होतात. अनन्वित हालअपेष्टा भोगल्याशिवाय प्रॉमेथिअसला आपली तत्त्वे आचरता आली नाहीत; कलावंत, शास्त्रज्ञ किंवा कवी यालाही दिव्दतत्त्वांसाठी असेच तपश्चरण करावे लागते; आत्मबलिदानाची तयारी ठेवावी लागते! केशवसुतांनी आपल्या ' दिव्य ठिणगी ' या कवितेत हे व्यक्त केले आहे; शिवाय कवी आनंदीरमण यांना लिहिलेल्या पत्रातही त्यांनी म्हटले आहे की ' कविता म्हणजे आकाशीची वीज आहे; ती धरू पाहाणारे शेकडा ९९ आपणांस होरपळून मात्र घेतात. ......वाणी ही फार मोठी देणगी आहे. सामान्य देवतांच्या आराधनास सुद्धा फार जपावे लागते; मग या देवतेच्या आराधनास किती जपावे लागेल बरे!'... आपले हृदय फाटून त्यातून प्रकाशकिरण बाहेर पडले तरच जगाचा अंधार थोडा दूर होईल, अशा आशयाचेही लेखन याच पत्रात केशवसुतांनी केले आहे. कवि आणि कल्पकता यासंबंधी केशवसुतांच्या कल्पना किती विशाल आणि उच्च आहेत, ते त्यांनी घेतले म्हणजे

—" Ah! should in me the poet die,

And should I continue to be
—How hard to speak it out!
A living tomb of poesy
Far worse than death no doubt—"

या कवि केशवसुतांच्या उद्गारात अतिशयोक्ती नाही तर सत्यता आहे हे पटते! केशवसुत म्हणजे ' The spark promethean ' चे मराठी कवीतील पहिले उद्गाते! पहिले प्रवक्ते!!

केशवसुतांच्या मनावर, कल्पनाशक्तीवर, प्रतिमासृष्टीवर आणि रचनापद्धतीवर इंग्रजी रोमँटिक कवींचा किती प्रभाव पडला आहे, याची प्रतीती त्यांच्या या इंग्रजी कवितांवरून अधिक उघडपणे येते. भाषा बदलली की कलावंताचे हृदयधर्मही बदलतात, असे नाही. केशवसुतांच्या इंग्रजी कवितांनी उलट केशवसुतांचा मूळ कविधर्म ' रोमँटिक 'च आहे, हे पटण्यास साहाय्यच होते. ह्या इंग्रजी कविता वाचताच केशवसुतांच्या कवितेचे ' नवेपण ' निर्मळ स्वरूपात झटकन दृष्टिगोचर होते. एक गूढवाद आणि सामाजिक बंडखोरीची जाणीव वगळली तर केशवसुतांच्या मराठी कवितांतून प्रकट झालेल्या साऱ्या नव्या जाणिवा, आपल्या अनिर्बंध मूळ रूपात या पाच कवितांतून प्रकट झाल्या आहेत. केशवसुतांचे समानधर्मित्व शेली, कीट्स, वर्डस्वर्थ या रोमँटिक कवीशी आहे. त्यांच्या ठायी असलेला कवी, जे अनुभव घेतो आणि त्यांची अभिव्यक्ती करतो, ते या रोमँटिक कवींच्या रीतीने! केशवसुतांची इंग्रजी कविता पूर्णतः रोमँटिक आहे, आशय आणि अभिव्यक्ती या दोन्ही दृष्टींनी! मराठी आणि संस्कृत काव्यपरंपरेहून अगदी भिन्न जातीची आणि परंपरेची ही कविता आहे; फार काय सामाजिक क्रांतीच्या जाणिवेचा रंग तिच्या अंगकांतीत उतरलेला नाही. त्यामुळे तिच्यातील भावनांचे, स्वप्नांचे रूप एकेरी असले तर ठळक आणि स्पष्ट आहे! (केवळ दोन-चार वर्षातल्या पाच कवितांवरून ठामपणे निष्कर्ष काढणे योग्य नव्हे; म्हणून आहे ह्या कवितांचे रूप जसे आहे तसे पाहण्याचा हा प्रयत्न आहे!)

शेली, कीट्स, वर्डस्वर्थ आदींच्या कवितांपुढे केशवसुतांच्या ह्या कविता जातितः वेगळ्या वाटणार नाहीत. याच प्रकृतीचे त्यांचे इंग्रजी कवितांचे लेखन आणखी होत गेले असते, तर त्यांना इंग्रजी कवींमध्ये स्वतंत्र स्थान मिळाले असते का? असाही प्रश्न मनात उपस्थित होतो. ह्याबाबत एवढे म्हणता येईल की इंग्रजी रोमँटिक कवीमध्ये केशवसुतांना, आत्मानुभूतीचे प्रामाणिक आणि भावोत्कट चित्रण करणारा, आपला एक समानधर्मा म्हणून, ओळखण्यास कोणासच कठीण गेले नसते! मराठी कवितेतील जनकत्वाचा मान मिळविणारे केशवसुत, रोमँटिक कवींच्या घराण्यातील एक जातिवंत कवी म्हणूनच राहिले असते. केशवसुत हे इंग्रजी रोमँटिक कवींचे केवळ अनुकरण करणारे कवी होते, असे म्हणणाऱ्यांसाठी, मला

शेलीचे, या संदर्भातले, एक स्पष्टीकरण आवर्जून द्यावेसे वाटते.—

......'It is impossible that any one who inhabits the same age, with such writers as those, who stand in the foremost ranks of our own, can conscientiously assure himself that his language and tone of thought may not have been modified by the study of the productions of those extraordinary intellects. It is true, that, not the sprit of their genius, but the forms in which it has manifested itself, are due less to the peculiarities of their own minds than to the peculiarity of the moral and intellectual condition of the minds among which, they have been produced. Thus a number of writers possess the form, whilst they want the spirit of those whom, it is alleged, they imitate; because the former is the endowment of the age in which they live, and the latter must be the uncommunicated lightning of their own mind......'

कवी केशवसुत हे मनाने शेली–बायरन–कीटस्–वर्डस्वर्थ यांच्या काव्यसृष्टोत वावरत होते; कवि-प्रवृत्तीने ते त्यांचे समकालीन होते. पण समानधर्मि-त्वामुळेच त्यांच्या कवितांतून त्यांची स्वतःची स्वतंत्र 'Spark promethean' सतत चमकत, झळा-ळत होती ! त्यांची मराठी कविता जितकी त्यांची आहे, तितकीच त्यांची इंग्रजी कविताही त्यांची स्वतःचीच आहे ! तिच्यामध्ये उथळ अनुकरणापेक्षा समानधर्मी कलावंताचे आत्मानुभूतीचे उत्स्फूर्त उन्मेषच अधिकांशाने प्रत्ययास येतात. कवीला अशा समान-धर्माची, त्याच्या समस्पंदनाची खूप अपेक्षा असते; कवी केशवसुतांनाही ही अपेक्षा आहे. 'Flowers from a Grave'मध्ये हे हृदयातले सूर ऐकून कोणी पांयस्थाने क्षणभर थांबावे, ही अपेक्षा साशंकपणे व्यक्त झाली आहे. उमरखय्यामची एक रुबाई आठवते—

That ev'n my buried
Ashes such a snare
Of Perfume shall fling up
into the Air,
As not a True Believer
passing by
But shall be overtaken
unaware.

(रु० ६८)

भास्करराव तांबे यांच्या 'रे अजात अज्ञात सखे जन !' या गीतातील भविष्यकाळातील समानधर्मी रसिकांपुढे कवोने केलेल्या हृदयाविष्करणातील आर्तताही अशीच तीव्रतेने जाणवते. केशवसुतांच्या इंग्रजी कवितेत व्यक्त झालेली ही त्यांची इच्छा मराठी काव्यरसिकांनी पुरी केली आहे. अर्वाचीन मराठी कवितेचे त्यांचे जनकत्व, त्यांच्या जन्मशताब्दीनिमित्त झालेल्या पुनर्विचारांमुळे पुन्हा एकदा नव्याने सिद्ध झाले आहे; दृढ झाले आहे.

---

* केशवसुतांच्या इंग्रजी कवितेतील आशयाचा विचार येथे केला; अभिव्यक्तीचा विचार अन्यत्र प्रकाशित होत आहे.

गतशतकांची पापे धेघो
क्षालायाला तुमची रुधिरे
पाहिजेत रे

केशवसुतांचा जन्मदिन १५ मार्च हाच! ७ आक्टोबर नव्हे!

प्रा. मधुकर शंकर वाबगावकर

एखाद्या लोकसमूहाचे काव्य हा त्याच्या सांस्कृतिक संचिताचा व परंपरेचा एक समृद्ध, सारभूत आविष्कार असतो. ह्या दृष्टीने मराठी भाषिकांची सांस्कृतिक परंपरा व काव्यपरंपरा यांच्या परस्पर अन्वयाचा आलेख काढून त्याच्या पार्श्वभूमीवर केशवसुतांच्या वैशिष्ट्याचे मूल्यमापन करण्याचा प्रयत्न उद्बोधक ठरावा. त्या दिशेने केवळ अंगुलिनिर्देश करण्याचे येथे योजिले आहे.


महाराष्ट्राच्या सांस्कृतिक संचिताचा पहिला वाङमयीन आविष्कार हालसातवाहनाची गाथासप्तशती. ती महाराष्ट्री–प्राकृतात आहे. पण महाराष्ट्री प्राकृताच्या अपभ्रंशापासून मराठी निघाली असल्याने मराठीची ती गर्भावस्था वा बीजावस्था होय. इसवी सनाचे पहिले दुसरे शतक हा स्थूलमानाने ह्या सप्तशतीचा काल. इतिहासकालातील महाराष्ट्राच्या ज्ञात संस्कृतीची पायाभरणी सातवाहन–कालात झाली. तिथपासून यादवकालाच्या अन्तापावेतो ही सांस्कृतिक परंपरा चित्र, शिल्प, संगीत आणि साहित्य इ. कलांच्या द्वारा स्वतःला उत्तरोत्तर विकसनशीलतेने अभिव्यक्त करीत राहिली. या काळातील अपभ्रंशातले वाङमय पुरेसे उपलब्ध नाही व मराठीच्या मुकुंदराज व महानुभाव यांच्या पूर्वीच्या अर्भकावस्थेतले साहित्यही अज्ञात आहे. पण उत्तरयादवकाल हा मऱ्हाठी सांस्कृतिक परंपरांच्या पतनासन्नतेचा काल होता. या पतनानंतर व्हावयाच्या उत्थानाचे भावी आधार आधीच उपलब्ध करून ठेवण्याच्या हेतूने ज्ञानेश्वरांनी वाङ्मयनिर्मिती केली. यादवकालानंतर कोसळलेली ही सांस्कृतिक परंपरा इस्लामचा आघात पचवून आपल्या पायावर उभी राहिली ती शिवकालात. पर्शीयन संस्कृतीची अनेक अभिजात अंगे शिवाजीने अचूक हेरली आणि आत्मसात् केली, हा इतिहासपंडित शेजवलकरांचा निर्वाळा येथे सहज आठवावा. येथे स्थिरावलेल्या मुस्लिम आक्रमकांची पर्शियन ही राजभाषा, अरबी ही धर्मभाषा व उर्दू ही व्यवहाराची बोलभाषा ह्या तिहींच्या माध्यमांद्वारा एतद्देशीयांना परिचित झालेल्या त्यांच्या काव्यपरंपरेतील संचिताचे काही संस्कार रामदासात ओळखू येतात. बहामनीकालातला इस्लामचा आक्रमक आघात पचवून आपल्या पायावर उभ्या राहिलेल्या जागृत महाराष्ट्राच्या सांस्कृतिक अस्मितेचा काव्यक्षेत्रातील परिस्फोट म्हणजे मुक्तेश्वर, रामदास आणि तुकाराम. पेशवाईच्या अस्तकाळी ही सांस्कृतिक परंपरा पुनः झाकळल्यागत, नवोन्मेषरहित, जीर्णोपजीवी झाली होती. इंग्रजी विद्या, कला, शास्त्रे व संस्कृती यांच्या आघातासरशी ती कोलमडली. ह्यापूर्वी ज्या इस्लामी परंपरेचे आक्रमण आम्ही अनुभवले होते ती इस्लामी परंपरा संस्कृतीच्या कोणत्याही अंगात आमच्याहून अधिक प्रगत वा विकसित नव्हती. पण अव्वल इंग्रजीच्या कालखंडात ज्या आंग्लपरंपरेचे पद्धतशीर आक्रमण झाले ती आंग्ल परंपरा संस्कृतीच्या भौतिक अंगांपुरती तरी आमच्याहून अधिक प्रगत होती. सनातन

भारतीय प्रकृती (महाराष्ट्रीय प्रकृती हा तिचाच एक घटकावयव) आणि पाश्चिमात्य नवसंस्कृती यांच्या आघातप्रत्याघातांतून, क्रियाप्रतिक्रियांमधून नवा समाज-पुरुष निर्मिला जात होता. आंग्लपरंपरेतील सत्त्वांश पचवून मराठी काव्यपरंपरा पुनः आपल्या पायावर आपल्या पूर्ण अस्मितेनिशी उभी राहिलेली दिसते ती प्रथम केशवसुतांमध्ये. मध्ययुगीन कृषिसंस्कृतीतून नव्या यंत्रयुगात नव्याने जन्म घेत असलेल्या, आकारास येत असलेल्या नवमहाराष्ट्राच्या जन्मखुणा, प्रसववेणा मराठी कवितेच्या इतिहासात पहिल्या प्रथम अभिव्यक्त झाल्या त्या केशवसुतांमध्ये. एकोणीसाव्या शतकाच्या चवथ्या चरणात भारताचे जे सांस्कृतिक पुनरुत्थान झाले त्या पुनरुत्थानाचा मराठी कवितेच्या क्षेत्रातला पहिला प्रकट उद्‌गार म्हणजे केशवसुत. सनातन भारतीय प्रकृती आणि पाश्चिमात्य नवविचार ह्यांच्या आघात-प्रत्याघातातून भारतीय जीवनाला नवा घाट, नवा आकार लाभण्याची प्रक्रिया अजूनही संपलेली नाही. त्या प्रक्रियेतून संपूर्ण भारतीय समाज (आणि अर्थात् महाराष्ट्रही) अद्यापही जातच आहे. केशवसुतांची कविता आजही शिळी वाटत नाही ती ह्यामुळेच. केशवसुतांच्या संकलित काव्यसंग्रहाच्या पहिल्या आवृत्तीचे परीक्षण करताना डॉ. पांडुरंग दामोदर गुणे ह्यांनी केशवसुतांना " महाकवि " म्हटले होते. (मनोरंजन, ऑक्टोबर १९१७) आज पन्नास वर्षांनंतर डॉ. गुण्यांचे ते शब्द अधिकच अर्थपूर्ण वाटतात !

पण अशा ह्या महाकवीच्या मृत्युदिनाबाबत परवापरवापावेतो वाद होता, आणि त्यांच्या जन्मशताब्दीच्या वेळीच नेमका त्याच्या जन्मदिनाचा वाद नव्याने निर्माण झाला. केशवसुतांचे पुतणे द. मो. दामले ह्यांनी " केशवसुतांची भावंडे व त्यांचा परिवार " नावाची एक पुस्तिका लिहून प्रसिद्ध केली. तिच्या प्रस्तावनेत ते म्हणतात - " केशवसुतांचा जन्मदिन मार्च १८६६ मध्ये किंवा ७ ऑक्टोबर १८६६ हा (रविवार, भाद्रपद वद्य १४ शके १७८८) याबद्दल नागपूरचे विद्वान् प्रो. भवानीशंकर श्रीधर पंडित यांनी वाद उत्पन्न केला आहे. पण ७ ऑक्टोबर १८६६ च्या बाजूने पुरावा जास्त प्रमाणात आहे, म्हणून मी आता पूर्वीपासून लोक समजत आहेत तीच जन्मतिथी म्हणून मानत आहे." गंमत अशी की प्रो. पंडित यांनी असा कोणताही वाद कधीच उत्पन्न केलेला नाही ! बरे, मार्च १८६६ मध्ये नेमक्या तारखेचा उल्लेख दत्तोपंत करीत नाहीत ! ती त्यांना माहीत नाही की काय ? शिवाय पूर्वीपासून लोक समजत आहेत ती जन्मतिथि १५ मार्च आहे ! द. मो. दामले म्हणतात त्याप्रमाणे ७ ऑक्टोबर नव्हे !

'सत्यकथे'च्या मार्च १९६६ च्या अंकात प्रा. विजया राजाध्यक्ष ह्यांनी 'केशवसुतांची जन्मतारीख' ह्या नावाची टीप लिहून श्री. द. मो. दामल्यांना दुजोरा देण्याचा प्रयत्न केला ! पण तोही व्यर्थ आहे. कारण ७ नोव्हेंबर १९०५ रोजी केशवसुत वारल्यानंतर केशवसुतांची मृत्युवार्ता आली ती काव्यरत्नावलीच्या डिसेंबर १९०५ च्या अंकातील (वर्ष १७, अंक १२) 'साल अखेर' सदरात. तेथे संपादकांनी म्हटले आहे, " यांचा जन्म सन १८६६ मार्च महिन्यात झाला. यांचे चरित्र लिहिण्याची मोठी पंचाईत पडली होती. परंतु आमच्या विनंतीस मान देऊन त्यांचे बंधु प्रो. मोरो केशव दामले यांनी आम्हास काही टिपणे देऊन आमची मनीषा पूर्ण केली." मोरोपंतांनी येथे तारीख दिलेली नसली तरी मार्च महिना निश्चित असा दिलेला आहे. मोरोपंतांचा जन्म इ. स. १८६८ मधला. म्हणजे केशवसुतांच्या ते पाठीवरचे. त्यांच्यापेक्षा दोनच वर्षांनी लहान. १८८३ साली नागपूरला मोरोपंत व केशवसुत हे नीलसिटी हायस्कूलमध्ये एकत्र शिकत होते. शाळेत एकाच वेळी दोघांची नावे घालताना केशवसुतांची जन्मतारीख व जन्ममहिना त्यावेळी १५ वर्षांचे असलेल्या मोरोपंतांना अधिकृतपणे माहीत झाला असणारच. आणि म्हणून मोरोपंतांच्या माहितीवरूनच काव्यरत्नावलीकारांनी मार्च १८६६ म्हटले ! त्यामानाने सी. के. दामले हे केशवसुतांपेक्षा अकरा वर्षांनी लहान. (विजयाबाई म्हणतात त्याप्रमाणे बारा वर्षांनी नव्हे ! कारण सी. के.चा जन्म १८७७ मधला) दोघांचा सहवास अथवा पत्रव्यवहारही सहसा न झालेला. (हे विजयाबाईंनीच लिहिले आहे !) केशवसुत वारले तेव्हा सी. के. दामले फर्ग्युसनमध्ये प्रोफेसर असून शिवाय ज्ञानप्रकाशचे संपादक होते ! मग काव्यरत्नावलीच्या डिसेंबर १९०५


च्या अंकातील मार्च १८६६ ह्या जन्ममहिन्याचा अथवा मनोरंजन जानेवारी १९०६च्या अंकातील १५ मार्च सन १८६६ ह्या जन्मतारखेचा त्याचवेळी प्रतिवाद त्यांनी का केला नाही ? बरे, त्यानंतर जून १९२१ मध्ये त्यांनी काढलेल्या केशवसुतांच्या समग्र कवितेच्या आवृत्तीला जोडलेल्या स्वलिखित कविचरित्रातही ह्याचा प्रतिवाद त्यांनी का केला नाही ? "वडील बंधूसंबंधी एका वाङ्मयविषयक ऋणांतून आपण मुक्त होऊ अशी मनाशी अटकळ करून आता मी हे चरित्र **स्वतःच्या माहितीप्रमाणे** लिहीत आहे." असे स्वतः सी. के.नीच जून १९२१ च्या आवृत्तीत म्हटले आहे. आणि मृत्युतिथीसारख्या इतर काही बाबतीत त्यांची ही "स्वतःची माहिती" चुकीची ठरलेली आहे ! ह्याच आवृत्तींत सी. के. दामले म्हणतात—"त्यांचे चरित्र यापूर्वीच कोणी लिहिवयास पाहिजे होते. कोणालाही माहिती पुरविण्याला माझी तयारी होती. त्यांच्या कवितेचे पुस्तक प्रथम छापून प्रसिद्ध करणारे कै. हरिभाऊ आपटे यांना त्यांच्या कविता संग्रहावरोबरच थोड्या माहितीचे टाचण मी दिले होते; परंतु त्यांनी कवितेच्या संग्रहाचा गाथा छापताना त्याला ते अल्पचरित्र जोडले नाही !" केशवसुतांचे पुतणे प. चिं. दामले यांचे जावई डॉ. प्र. न. जोशी यांच्याकडे केशवसुतांचे दोन बंधु श्रीधर केशव व मोरो केशव यांच्या मूळच्या पत्रिका आहेत. पण केशवसुतांची मात्र नाही, असे विजयाबाई लिहितात ! हरिभाऊंना कविचरित्राचे जे टाचण सी. कें. नी दिले त्यासोबत तर केशवसुतांची मूळ पत्रिका दिली गेली नाही ना ? दरम्यान् १९१९ साली हरिभाऊ वारले. व ते टाचण त्या पत्रिकेसह आनंदाश्रमातच राहिले असावे ! या दिशेने आनंदाश्रमातील कागदपत्रांत शक्य असल्यास एक दूरची आशा म्हणून शोध घ्यावा ! निदान तेथे सी. कें. नी कोणती जन्म तारीख दिली होती ते तरी कळेल ! कारण १९२१ च्या आपल्या आवृत्तीत सी. कें. नी केशवसुतांची पुढीलप्रमाणे जन्मलग्नकुंडली छापून त्याखाली भाद्रपद कृष्ण १४ रविवार, शके १७८८ सन १८६६, जन्मस्थान मालगुंड जिल्हा रत्नागिरी असा उल्लेख केला आहे ! येथे इंग्रजी महिना व तारीख ही दिलेली नाहीत ! ह्या दिवशी ७ ऑक्टोबर ही इंग्रजी तारीख येते. आता ही कुंडली "त्या वर्षीच्या भाद्रपद कृष्ण १४ रविवारचीच अगदी बरोबर आहे" असा कृष्णाजी विठ्ठल सोमण ह्या "प्रख्यात, व्यासंगी ज्योतिषाने दिलेला फार महत्वाचा पुरावा" विजयाबाई पुढे करतात ! पण महत्त्वाचा मुद्दा हा की ही कुंडली भाद्रपद कृष्ण १४ रविवार, (७ ऑक्टोबर) ह्या दिवसाची नव्हे असे कुणीच म्हणत नाही ! त्या दिवसाचीच ती कुंडली आहे एवढेच श्री. सोमण म्हणतात आणि ते बरोबरच आहे. **पण त्या कुंडलीची फले केशवसुतांच्या चरित्राशी जुळतात; म्हणून ती केशवसुतांचीच कुंडली आहे असे सोमण तरी म्हणतात काय ?** उलट स्वतः सी. के. दामल्यांनीच जून १९२१ च्या आवृत्तीत ह्या कुंडलीवर पुढीलप्रमाणे मननीय भाष्य केले आहे — "जन्मभर भिकारटाकार गावी म्युनिसिपल शाळांतून १५ ते ३० रुपयांपर्यंत रखडणाऱ्या खडतर दैवाच्या माणसाच्या पत्रिकेत या कुंडलींतील शनि, गुरु व मंगळ यांच्याप्रमाणे ग्रह सापडणे शक्य नाही. तेव्हा कोणीतरी चुकीची जन्मवेळ कळविल्यामुळे भलत्याच लग्नावर ही कुंडली रचिल्यासारखी दिसते. कारण तिच्यावरून फले कोणतीच जुळत नाहीत." ज्योतिषशास्त्राचे सर्वसामान्य प्राथमिक ज्ञान ज्यांना असेल त्यांना देखील सी. कें. चा वरचा अभिप्राय कसा खरा आहे ते स्वतः पडताळून पाहता यावे ह्यासाठी ती (सी. कें. नी केशवसुतांची म्हणून दिलेली पण त्यांच्याच म्हणण्याप्रमाणे वस्तुतः केशवसुतांची नसलेली) कुंडली खाली देत आहोत :—



'मनोरंजन' जानेवारी १९०६च्या अंकात केशवसुतांवर किरातांचा चरित्रलेख आलेला आहे. तो रहाळकरांचा असे माधवराव पटवर्धनांनी लिहिले,

पण ते चुकीचे आहे ! कारण त्यात रहाळकरांच्या कविता केशवसुतांच्या म्हणून दिलेल्या आहेत ! रहाळकर स्वतः तो लेख लिहिते तर आपल्या कविता केशवसुतांच्या म्हणून ते खचित देते ना ! त्या लेखात शिरोभागीच " केशवसुत अथवा कृष्णाजी केशव दामले जन्म फाल्गुन वद्य १४ शके १७८७ ता. १५ मार्च सन १८६६; मृत्यू कार्तिक शुद्ध १४ शके १८२६ ता. ७ नोव्हेंबर सन १९०५" असे स्पष्ट लिहिले आहे. येथे जन्म व मृत्यू ह्या दोहोबाबत हिंदु मिती व इंग्रजी तारीख असे दुहेरी निर्देश आहेत व त्या त्या मितीला ती ती तारीख बरोबर जुळते. आता ह्या जन्मतिथीची जन्मलग्नकुंडली आजवर कुणी मांडूनच पाहिली नाही! सी. कें.नी १९२१च्या आवृत्तीत कुंडलीखाली दिलेल्या भाद्रपद कृष्ण १४ ह्या मितीला १५ मार्च ही इंग्रजी तारीख येत नाही, ७ ऑक्टोबर येते, ही साधी विसंगती आजवर कुणाच्या लक्षात आली नाही ! ती प्रकट केल्याबद्दल श्री. दत्तोपंत दामले बहुत धन्यवादास पात्र आहेत ! पण जी कुंडलीच मुळात फलितांच्या दृष्टीने अग्राह्य आहे तिच्याखालची जन्ममिती व तिची संवादी इंग्रजी तारीख तरी कशी प्रमाण मानता येईल ? ह्या उलट मनोरंजन जाने. १९०६च्या अंकात श्री. किरातांनी दिलेल्या फाल्गुन वद्य १४ शके १७८७ ता. १५ मार्च सन १८६६ ह्या जन्मतारखेची प्रातःकाळची जन्मकुंडली नागपूरचे प्रख्यात ज्योतिषाचार्य श्री. नानाजी पेंडके ह्यांनी त्या वर्षीचे पंचांग पाहून करून दिली ती पुढीलप्रमाणे—

फाल्गुन वद्य १४ गुरुवार, शततारका नक्षत्र, शके १७८७, कुंभराशी, ता. १५।३।१८६६



आश्चर्याची गोष्ट अशी की प्लेगसारख्या साथीच्या रोगाने वयाच्या ३९व्या वर्षी केशवसुतांना आलेला अपमृत्यू, केशवसुतांना पुत्र नसणे, केशवसुत व त्यांची पत्नी यांचा ८ दिवसांच्या अंतराने लागोपाठ झालेला एकाच साथीने सहमृत्यू इत्यादी त्यांच्या आयुष्यातील सर्व घटना या कुंडलीतील ग्रहस्थितींच्या फलादेशांशी तंतोतंत जुळतात ! दोन्ही कुंडल्या वर दिलेल्या आहेत ! ह्यांपैकी कोणत्या कुंडलीची फले खरोखर केशवसुतांच्या चरित्राशी जुळतात हे ज्योतिषशास्त्राचे सामान्य ज्ञान असणारे एखादे शेंबडे पोर देखील सांगू शकेल ! शिवाय ही तारीख किरातांनी दिलेली. किरात हे बेळगाव धारवाडकडचे. म्हणून त्यांना ही माहिती धारवाडच्या सरकारी हायस्कुलातून किंवा हुबळीला ज्यांच्याकडे केशवसुतांना अपमृत्यू झाला ते केशवसुतांचे तिथे शिक्षक असलेले चुलतचुलते हरिकाका दामले ह्यांच्याकडून मिळालेली असल्यास अधिकृत असण्याचा संभव अधिक. किरातांचा जन्म १८६५ मधला. म्हणजे केशवसुतांपेक्षा ते एकच वर्षाने मोठे. पुण्याहून १८८६ साली ते मॅट्रिक झाले. केशवसुत मॅट्रिकला पहिल्यांदा १८८७ साली पुणे सेंटरमधून बसलेले. म्हणजे उभयता बहुधा शालेय वयापासूनच एक वर्षाच्या अंतराने एकमेकांचे सहाध्यायी व सन्मित्र. फार काय मनोरंजन जुलै १९१८च्या अंकातील आपल्या प्रसिद्ध लेखात रहाळकर म्हणतात—" केशवसुतांचे तिसरे कविमित्र किरात. (श्रीयुत कृष्णाजी लक्ष्मण सोमण) या कवीबद्दल केशवसुतांच्या अंतःकरणात विशेषच प्रेम असे. 'किरात' हे एक प्रसिद्ध नाटककार असून त्यांचा लेखनव्यवसाय दांडगा आहे. त्यांनी अनेक गद्य व पद्य नाटके लिहिली असून त्यांपैकी काही रंगभूमीवरही आलेली आहेत. हे गृहस्थ उत्तम टीकाकारांपैकी एक असून त्यांचे टीकात्मक लेख फार वाचनीय आहेत. किरातांची कविता नीटस असून रेखलेली असते, असे केशवसुतांचे म्हणणे असे. प्रस्तुत लेखकाशी बोलताना केशवसुत किरातांच्या नाटकांबद्दल विशेषच प्रशंसोद्गार काढीत. कोकणात जातांना व तेथून परत येताना ते काही काल तरी किरातांच्या सहवासात घालविल्यावाचून राहत नसत."—(सदर, पृ. ५४) केशवसुतांच्या नित्य

अनुक्रमणिका

निकट सहवासात शालेय विद्यार्थिदशेपासूनच राहिलेले त्यांचे समवयस्क अंतरंगमित्र किरात यांनी दिलेली जन्मतारीख १५ मार्च १८६६ व तीही ज्योतिषशास्त्रीय पुराव्याने सत्य ठरत असताना ती प्रमाण मानावयाची की, सी. कें. सारख्या के. सु पेक्षा अकरा वर्षांनी लहान असलेल्या व के. सु. शी कधी सहवास वा पत्रव्यवहार नसलेल्या माणसाने दिलेली व तीही ज्योतिषशास्त्रीय फलितांच्या दृष्टीने अजिबात चुकीची असलेली जन्मतारीख ७ ऑक्टोबर १८६६ प्रमाण मानावयाची ?

आपल्या 'हरपले श्रेय' पुस्तकात प्रा. रा. श्री. जोगांनी ७ ऑक्टोबर तारीख दिली व "ती देणारे जोग हे एकमेव हे खरे !" असे विजयाबाई म्हणतात ! पण प्रा. जोगांनीही १९६४ सालच्या पुनर्मुद्रणात ही तारीख दिली आहे ! १९५६ च्या पहिल्या आवृत्तीत १५ मार्चच जोगही देतात ! बरे, आपल्या 'केशवसुत काव्यदर्शना'त केशवसुतांना वर्गात दुर्मुखलेला म्हणणारे त्यांचे शिक्षक प्रसिद्ध संस्कृतपंडित वामन शिवराम आपटे होत असे जोगांनी लिहिले आहे. तेच जोग आता 'हरपले श्रेयात' टीपेंत "हे शिक्षक कोण ?" असे का लिहितात ? फार काय पुनर्मुद्रणातही पृ. २०७ वर "हे शिक्षक कोण" ही पृच्छा कायम आहे ! "विद्यासंस्कृत त्या तुझ्या क्षणभरी मस्तिष्कतंतूंवरी"...ह्या त्या कवितेतल्या ओळीतला श्लिष्टार्थमूलक ध्वनी ध्यानात घेतला तर ते शिक्षक संस्कृत विषयाचे होते म्हणजे आपटेच होते हे स्पष्ट आहे !

प्रा. पंडितांच्या समग्र केशवसुतातही दोन तपशीलांचा काटेकोर उल्लेख नाही अशी विजयाबाईंची "तक्रार" ! के. सु च्या आईवडिलांना सहा पुत्र, सहा कन्या झाल्याचे जे पंडितांनी लिहिले आहे त्याऐवजी सात पुत्र, पाच कन्या हवे होते असा बाईंचा आक्षेप. पण ज्या दत्तोपंत दामल्यांची बाजू घेऊन बाई काटेकोरपणा शोधायला निघाल्या त्या दत्तोपंतांनी स्वतः आपल्या वडिलांच्या 'शास्त्रीय मराठी व्याकरणाच्या' अलिकडे निघालेल्या आवृत्तीला जे स्वलिखित पितृचरित्र जोडले आहे त्यात के. सु. च्या आईवडिलांना १०-१२ अपत्ये (म्हणजे १० की १२) झाली असे अगदीच मोघम म्हणजे मुलामुलींच्या वाटणीचा काटेकोर हिशेब न देता लिहिले आहे त्याचे काय ? शिवाय "१९०२ च्या अखेर केशवसुत मातृनिधनानंतर उज्जैन येथे आले होते, तेव्हा आम्ही सर्वांनी एकदा मंडळीमध्ये फोटोला बसण्याचा त्यांना अत्यंत आग्रह केला !" असे सी. के. १९२१ च्या आवृत्तीत स्पष्ट म्हणतात. के. सु. चे फैजपूरचे सहकारी वा. वा. गद्रे ह्यांनी देखील "१९०२ साली त्यांची आई उज्जनींत निवर्तली त्यावेळी के. सु. बंधु चिंतोपंत व मुलगा परशुराम यांसह उज्जनीस फैजपुराहून गेल्याचे स्मरते"— असे के. सु. स्मृतिग्रंथात पृ. २३५ वर स्पष्ट लिहिले आहे ! तरी दत्तोपंत दामले मात्र वर सांगितलेल्या मोरोपंतांच्या व्याकरणातील आपल्या पितृचरित्रात के. सु. ची आई १९०१ का १९०२ मध्ये वारली असे मोघमच लिहितात ! वाहवा रे काटेकोरपणा !

प्रा. मं. वि. राजाध्यक्ष ह्यांनी संपादिलेले 'पाच कवी' नावाचे एक सुंदर पुस्तक विजयाबाईंना नक्कीच माहीत असेल ! त्यात १९६२ च्या ताज्या पुनर्मुद्रणात "रहाळकर ह्यांना लिहितांना— A crab in the heart ! But, alas ! where is the restorative ? असे शब्द केशवसुतांनी वापरले" असे विधान पृ. २०६ वर संपादकांनी केले आहे ! वास्तविक के. सु. नी हे किरातांना लिहिले आहे, रहाळकरांना नव्हे ! आणि तेथे "A crack in the heart !'...असे शब्द आहेत ! crab नव्हे ! (पहा, मनोरंजन, जाने. १९०६, पृ. २५७) केशवसुतांचे म्हणून सर्वत्र उद्धृत केले जाणारे इंग्रजी पत्रातले सर्व उतारे मुळात ह्या अंकातल्या आपल्या लेखात किरातांनीच सर्वप्रथम छापले आहेत ! मनोरंजनातला हा लेख किरातांचाच हे रहाळकरांना माहीत होते हे पुढे मनोरंजनांत १९१८ साली केशवसुतांवर त्यांनी जी लेखमाला लिहिली तिच्यातच कळते. 'किरातांच्या लेखातील माहितीचा रहाळकरांनी जागोजाग उपयोग करून घेतला आहे. पण तो करताना मुळातल्या crack चे त्यांनी crab केले ! रहाळकरांच्या लेखमालेत १ल्या लेखांकात पृ. ६० वर आणि ४ थ्या लेखांकात पृ. ३३२ वर असे

दोन ठिकाणी crab आले आहे ! आणि प्रा. मं. वि. राजाध्यक्षांनी किरातांचा मूळ लेख न पाहताच केवळ रहाळकरांवर विसंबून crab वर निर्वाह केलेला दिसतो! इतकेच नव्हे ह्या crab च्या संदर्भात त्यांना ब्राउनिंग् आठवतो. ते लिहितात "Pauline ह्या आपल्या पहिल्याच (आणि अपूर्ण) काव्याच्या स्वतः-च्या प्रतीत ब्राउनिंगने पुढील वाक्य लिहून ठेवले. 'Only this crab remains of the shapely Tree of Life in my fool's Paradise.' अवतरण सुंदर खरे पण इथे अप्रस्तुत आहे ! कारण मुळात मुळी crab नाहीच. crack आहे ! पण लक्ष्यात कोण घेतो ?

'इससे भी जादा' गंमत तर पुढेच आहे ! रे. नारायण वामन टिळक ह्यांची त्यांचे चिरंजीव कै. देवदत्त ह्यांनी अधिकृतपणे दिलेली जन्मतारीख ६ डिसें. १८६१ ही आहे. तदनुसार त्यांची जन्मशताब्दी महाराष्ट्रात सर्वत्र साजरी होऊन गेली. ती संधी साधून त्यांच्या जन्मशताब्दीचा एखादा वाद स्वतःच उकरून काढून तो अळेवळेच दुसऱ्या पंडिताच्या अंगाला चिकटविणारा टिळकांचा कोणी नातलग अजून तरी पुढे आलेला नाही. पण तरीही प्रा. मं. वि. राजाध्यक्षांच्या "पाच कवि" पुस्तकाच्या अगदी ताज्या १९६२ च्या पुनर्मुद्रणात रे. टिळकांचे जन्मवर्ष १८६५ च दिले आहे ! (बहुधा ४५ वर्षांपूर्वीच्या माडखोलकरांच्या "आधुनिक कविपंचका"वर विसंबून !) दरम्यान् टिळकांची जन्मशताब्दी होऊन गेली तरी त्यांच्या खऱ्या जन्मदिनाचा राजाध्यक्षांना पत्ता नाही ! केवढा हा "तपशिलांचा काटेकोरपणा !"

पुण्याच्या न्यू इंग्लिश स्कूलच्या जनरल रजिस्टर-मध्ये केशवसुतांसंबंधीच्या नोंदीत 'जन्मस्थान' या रकान्यात जो उल्लेख आहे तो म्हणे द. मो. दामल्यांना वळणेसारखा वाटतो ! "(संशोधकांना नवीन उद्योग! केशवसुतांचा स्थलनिर्णय : मालगुंड की वळणे ? इत्यादी)"—इति विजयाबाई. पण स्वतः केशवसुतांनीच आपल्या 'नैऋत्येकडील वारा' कवितेत "जन्मस्थान मदीय सुंदर असे त्या माल्यकूटांतल्या। आनंदें वनदेवता मधुर जीं गानें भलीं गाइल्या..... वाग्देवीसुत जन्मला अपुलिया ग्रामांत या लागुनि। जै जै कार करा, सुरां परिसवा हा मंगलाचा ध्वनि !" असा मालगुंड ह्या जन्मस्थळाचा स्पष्ट उल्लेख करून ठेवल्यामुळे जन्मकाळाप्रमाणेच जन्मस्थळाबाबतही वाद पिकविण्याची सोय राहिली नाही ! अरेरे !

तात्पर्य, फाल्गुन वद्य १४ शके १७८७ ता. १५ मार्च सन १८६६ ही जानेवारी १९०६च्या मनोरंजनात किरातांसारख्या केशवसुतांच्या अंतरंगमित्राने प्रथम दिलेली व तेव्हापासून आजतागायत अबाधित चालत आलेली तारीख हीच केशवसुतांची खरी जन्मतारीख होय. ती त्याज्य, चुकीची वा असत्य ठरविणारे एकही बलवत्तर प्रमाण अजून तरी पुढे आलेले नाही ! उलट नागपूरचे ज्योतिषाचार्य श्री. नानाजी पेंडके ह्यांनी ज्योतिषशास्त्राच्या आधारे तिला नव्याने प्रतिष्ठित केले आहे !!

काळोखाच्या जगामधें या
मृत आशांच्या चितांवरूनिया
पिशाच माझें भटकत आहे--शांति नसेचि तया !

कवी केशवसुत जन्मशताब्दी निमित्त रविवार दि. २ ऑक्टोबर ६६ रोजी रात्रौ केशवसुत काव्यदर्शनात 'कवींच्या दृष्टिकोनातून केशवसुत' या शीर्षकाखाली श्री. शं. के. कानेटकर (गिरीश), श्री. आ. रा. देशपांडे (अनिल), प्रा. भ. श्री. पंडित, श्री. सोपानदेव चौधरी आणि प्रा. या. मु. पाठक यांनी प्रत्येकी एका कवितेचे रसग्रहण श्रोत्यांपुढे सादर केले.

अनुक्रमणिका

केशवसुत - काव्यदर्शन

(प्रख्यात मराठी कवींनी केलेले केशवसुतांच्या काही कवितांचे रसग्रहण)

अनुक्रमणिका

हरपलें श्रेय

त्रिखंड हिंडुनि धुंडितसें,
न परि हरपलें तें गवसे ! ॥ध्रु॥
होत्यें अजाण माहेरीं
तों खेळ खेळल्यें परोपरी
लटूपटीच्या घरदारीं
लटकीच जाहल्यें संसारी;
तेव्हांचें सुख तें आतां
खऱ्या घरींहि न ये हाता !
चुकचुकल्यापरि
वाटे अन्तरि,
होउनि बावरि
निज श्रेय मी पाहतसें,
न परि हरपलें तें गवसे ! १

प्राप्त जाहलें तें तुजला
तूं मागितलें जें देवाला,
ज्याचे मोल तुवां दिधलें
तेंच तुझ्या पदरीं पडलें—
या वचनें चुकला सौदा
उमगुनि हृदया दे खेदा !
दिलें हिरण्मय
हातीं मृण्मय,
हा हतविनिमय !
परत मला मम मिळे कसे ?
न परि हरपलें तें गवसे ! २

किरण झरोक्यांतुनी पडे,
अणूंसवें त्यांतून उडे
परोक्षविषयीं मन माझें
विसरुनियां अवघीं काजें
हयगय त्यांची मज जाची
परि न मला पर्वा त्याची !
वेडी होउन
बसल्यें अनुदिन
एकच घेउन—
मज माझें लाभेल कसें ?
न परि हरपलें तें गवसे !

जेथें ओढे वनराजी
वृत्ति रमे तेथें माझी;
कारण कांही साक्ष तिथें
मम त्या श्रेयाची पटते;
म्हणुनी विजनीं मी जात्यें
स्वच्छंदें त्या आळवित्यें.
स्वभास दावुनि
परि तें झटदिनि
जाई लोपुनि !
मग मी हांका मारितसें !
न परि हरपलें ते गवसे !

भीडभाड माझी फिटली,
जग म्हणतें की 'ही उठली !'
जनमर्यादा धरुनि कसें
अमर्याद तें मज गवसे ?
एक शब्द बोलेन जरी
सकलां कुण्ठित करिन तरी !
अशी आगळी
परी बावळी
आहे दुबळी;
कांकीं त्याविण सुचत नसे !
न परि हरपलें तें गवसे !

स्वपतिचितेवरि उडी सती
संसृतिविमुखी घेई ती;
दीपशिखेवरि पतंग तो
प्रेमें प्राणाहुति देतो;
मी न करिन का तेंवि तर्धी
माझें मज लाभेल जधीं ?
मजपासोनी
हाय ! हिरोनी
नेलें कोणीं !—
म्हणुनि जीव पाखडीतसें
न परि हरपलें तें गवसे

केशवसुतांचे हरपले श्रेय

प्रा. शंकर केशव कानेटकर

केशवसुतांनी आधुनिक कविता लिहून आपले पहिले स्थान पूर्ण टिकवले आहे. आज त्यांची 'हरपले श्रेय !' ही कविता अर्थाच्या दृष्टीने पहावयाची आहे. केशवसुतांवर आजवर अनेकांनीं लिहिले आहे. अगदी न. शं. रहाळकरांपासून प्रा. म. श्री. पंडितांपर्यंत सर्वांनी त्यांचा मान केलेला आहे. पण त्यांपैकी प्रा. रा. श्री. जोग, डॉ. माधवराव पटवर्धन, श्री. वि. स. खांडेकर, प्रा. श्री. के. क्षीरसागर व प्रा. भ. श्री. पंडित यांची लिखाणेच विचारार्ह आहेत.

श्री. वि. स. खांडेकर म्हणतात—"केशवसुत रूढ अर्थाने आस्तिक नव्हते. ते अज्ञेयवादी होते. त्यांनी आमरण अत्यंत निष्ठेने उपासना केली ती कवितेची. ...'ईश्वरावर तुमची श्रद्धा आहे की नाही ?' असा कोणी त्यांना प्रश्न केला असता तर 'आहे, पण ती कवितेच्या रूपाने प्रगट होणाऱ्या ईश्वरावर आहे', असे उत्तर त्यांनी कदाचित दिले असते !"

याला अनुसरून त्यांनी 'प्रतिभा', 'स्फूर्ती', 'आम्ही कोण ?', 'फिर्याद' आदी वीस कविता लिहिल्या आहेत. कै. डॉ. माधवराव पटवर्धन याशी संगनमत आहेत. ते श्री. किरातांना लिहिलेले पत्र देतात, ते असे—" You can guess my state of mind from my piece in the Manoranjan (हरपले श्रेय) ! A crack in the heart ! But alas ! where is the restorative ?. . . .मन एखाद्या ठिकाणी एकाग्र केंद्रीभूत झाले की त्या वेळेपुरता बाह्य उपाधींचा विसर पडतो. ...हे वर्णन वज्राहून कठोर पण कुसुमाहून मृदू या वर्णनाप्रमाणे परस्परविरोधी व चमत्कृतिजनक वाटते. परंतु येथे 'दुःखेष्वनुद्विग्नमनाः सुखेषु विगतस्पृहः' अशा लोकोत्तर द्वंद्वातीत स्थितप्रज्ञाची स्थिती अभिप्रेत आहे, का केवळ तन्मयतेची, एकाग्रतेची स्थिती अभिप्रेत आहे" ? श्री. सीतारामपंत दामले यांनी प्राचीन संत-कवींच्या कवितेचा अर्थ लावावा तसा लावल्याने पुष्कळसे कवीहि तसाच अर्थ लावू लागले आहेत. कवीची विश्वव्यापी अत्युक्ति, आत्मवादातील परिभाषेचा दुरुपयोग हीहि याची दोन कारणे आहेत. ब्रह्मानंद या शब्दाचा अर्थ नेहमीच्या भाषेत अत्यानंद इतकाच आहे. कवीचा अर्थ लावताना दिशाभूल होते. माधवराव म्हणतात—"रुष्ट सुंदरीस" 'फिर्याद', 'वियोगामुळे', आणि 'हरपले श्रेय' ही हृदयस्पर्शी विरहगीते त्या अत्यद्भुत, गूढ, लहरी मोहिनीस उद्देशून आहेत, यात तिलप्राय शंका नाही !" पुन्हा ते म्हणतात—"केशव-सुतांची कविता ही तुकारामाच्या विराणीइतकी असंदिग्धपणे भक्तिवादी नाही. मग 'हरपले श्रेय' ही कविता कोणास उद्देशून असावी ? ही कविता 'प्रतिभा'-नामक मोहक शक्तीस उद्देशून असावी. 'श्रेय' हा शब्द 'तन्मयतेचे सुख' व 'ते सुख देणारी दिव्य शक्ति' या दोन्ही अर्थांनी वापरलेला आहे—तिला सृष्टिसुंदरी म्हणा, कवितादेवी म्हणा—पण तिचा ध्यास केशव-सुतांना लागला होता, हे खास······एका वेळी जें दृश्य स्वर्गीय सौंदर्याने मुसमुसलेले दिसले, तेच मागाहून फिके, न्यूनपूर्ण, व निराशाजनक वाटू लागते. केशवसुतांच्या मनावर वर्डस्वर्थच्या " Ode to intimations of immorality " ने परिणाम केला असावा. सामान्य दृश्य स्वर्गीय तेजाने नटलेले दिसे...पण आता कोठेही गेलो तरी सृष्टीतील काही तरी मोहक तेज नाहीसे झाले आहे याची जाणीव झाल्यावाचून रहात नाही. वर्डस्वर्थ म्हणतो, "तान्हेपणात आपण स्वर्गीय तेजात गुरफट-लेले...वय वाढत चालले की अंधार गडद होऊं लागतो, मनुष्यपणात ते तेज नष्ट होते ! " यावरून डॉ. माधव-रावना यात अध्यात्म मर्यादित दिसते असे वाटते.

(पुढील मजकूर पान २२५ वर)

गोफण केली छान

स्वहृदय फाडुनि निज नखरीं,
चिवट तयाचे दोर
काढुनि, गोफण वळितों ही
सत्वाचा मी चोर! १

त्वेषाचा त्या दोराला
घट्ट भरुनियां पीळ,
गांठ मारितों वैराची
जी न पीळ दवडील! २

वैर तयांला, बसती जे
स्तिमितचि आलस्यांत
वैर तयांला, पोकळ जे
बडबडती तोऱ्यांत! ३

वैर तयांला, वैरी जे
त्यांच्या पायधुळींत
लोळुनि कृतार्थ होती जे
प्राप्त तूपपोळींत! ४

वैर तयांला, पूर्वींच्या
आर्यांचा बडिवार
गाउनि जे निज षंढत्वा
मात्र दाविती फार! ५

वैर तयांला, थप्पड बसतां
चोळिति जे गालांस,
वैर तयांला जे गरिबी
शिकवितात बालांस! ६

गांठ मारुनी वैराची
गोफण केली छान;
कठिण शब्द या धोंड्यांनीं
करितो हाणाहाण! ७

केशवसुतांची गोफण

आत्मारामजी रावजी देशपांडे 'अनिल'

तसे पाहिले तर केशवसुतांच्या पहिल्यावहिल्या चार पाच कविता सोडल्या तर बाकीच्या सर्व कविता माझ्या फार आवडत्या आहेत. त्यांतली अमुक एक विशेष आवडती म्हणून निवडायची म्हटले तर माझे मन बुचकळचात पडते. वेगळचा काळात, निराळचा परिस्थितीत आणि मनाच्या आगळचा अवस्थेत, एकदा ह्या तर मग त्या, अशा केशवसुतांच्या कविता मला फार आवडत गेल्या आहेत. आजकाल जे काय चालले आहे त्याने मनाचा प्रक्षोभ होत नाही, अशी विचारवंत व्यक्ती क्वचितच दिसते. माझे मन तर उद्वेगाने भरून येत असते. अशा मनःस्थितीत आपल्याशीच संतापत म्हणायला मला केशवसुतांची 'गोफण केली छान' ही कविता फार फार आवडते. एका दृष्टीने ही कविता सर्वकालीन आहे. प्रत्येक कालखंडात अशा काही व्यक्ती, असे सामाजिक गट, अशा वृत्ती, आणि कृती असतात की, त्यांचा जीवनावर होणारा अधोगतीचा परिणाम तीव्रतेने जाणवत राहतो. त्यांच्याविषयी तितिक्षा दाखविणे, सहिष्णु वृत्ती ठेवणे म्हणजे एक अपराध आहे असे वाटते. ज्या गोष्टी सहन होत नाहीत त्यांना कोणी 'मैत्र' देऊ शकत नाही, त्यांना 'वैर' द्यावेसे वाटते. अशा गोष्टी, केशवसुतांनी ही गोफणफेक केली, त्यावेळी होत्याच, आजही आहेतच, आणि त्यात काही नवीन भरही पडलेली आहे.

मला ही कविता फार आवडते, कारण ती रसपरिपूर्ण आहे. मात्र रसांच्या आठबुरुजी तटबंदीतच राहणे बिनधोक असे मानणाऱ्या, किंवा नवरसांच्या नव्या नवकोनी बंगल्याची दारेखिडक्या बंद करून आत राहणाऱ्या रसिकांना ह्या कवितेतल्या वेगळचा रसाची जाणीव होत असून देखील तो मानणे अडचणीचे वाटत असावे. तरी पण कळत नकळत ह्या प्रक्षोभ रसाची चर्वणा ते करीत असलेच पाहिजेत आणि आस्वाद घेत असले पाहिजेत, असे मला वाटते.

ही कविता केशवसुतांनी १९०५ साली लिहिली. 'मनोरंजना'च्या १९०५ च्या जानेवारी–फेब्रुवारी अंकात ती छापून आली. त्यानंतर त्यांनी दोनच कविता लिहिल्या. एक 'हरपले श्रेय' आणि दुसरी 'तुझे नाम मुखी'–मरणापूर्वीच्या दहाबारा महिन्यांतल्या ह्या कविता. म्हणजे ह्या कवितांत केशवसुतांच्या ३९ वर्षांच्या जीवनाची आणि २० वर्षांच्या कविजीवनाची परिपूर्णता आहे, निदान मला तरी तसे वाटते. केशवसुतांच्या समाजविषयक तीव्र जाणिवांचा, त्यांच्या रूढिभंजक प्रवृत्तीचा, आणि पुरोगामी आव्हानाचा परिपाकच 'गोफण' ह्या कवितेत आहे. मला तर केशवसुतांच्या समाजविषयक कवितांच्या स्थायी वृत्तीचे 'सूत्र'च किंवा केशवसुतांच्या शब्दात सांगायचे म्हणजे 'स्व हृदय निजनखरी फाडूनि वळलेला चिवट दोर' ह्या कवितेत सापडतो. तसेच नवप्रतीति धर्माच्या (निओमिस्टिसिझमच्या) किंवा गूढगुंजन म्हटल्या गेलेल्या जाणिवांचे सार मला 'हरपले श्रेय' ह्या कवितेत आहे असे जाणवते.

केशवसुतांच्या सामाजिक जाणिवांच्या कविता सहृदयतेने आणि तल्लीनतेने वाचीत असताना, म्हणत असताना, आपल्याला काय वाटत राहते, आपल्या भाववृत्ती कशामुळे उचंबळून येतात ह्याचा विचार मी करू लागलो, तेव्हा मला जाणवले की चीड, संताप, उद्वेग, उबग अशा भावनांनी आपले मन भरून जाते. ह्या भावना काव्यात रस पदवीला पोचल्या म्हणजे त्या आस्वाद्य होतात. चीड, संताप, उद्वेग, इत्यादि भावनांना आपण आवेग, अथवा संवेग म्हणू.

(पुढील मजकूर पान २२६)

मूर्तिभंजन

मूर्ति फोडा, धावा !। धावा, फोडा मूर्ति ।
आंतील संपत्ति । फस्त करा ! ।।

व्यर्थ पूजाद्रव्यें । त्यास वाहूनियां ।
नाके घासूनीया । काय लभ्य ? ।।

डोंगरीचे आम्ही । द्वाड, आडदांड ।।
आम्हांला ते चाड । संपत्तीची ! ।।

कोडें घालूनियां । बैसली कैदाशीण, ।।
उकलिल्यावीण । खाईल ती ! ।।

तिच्या खळीमध्यें । नाहीं आम्हां जाणें, ।।
म्हणूनि करणें । खटाटोप ।।

मूर्ति फोडोनीयां । देऊं जोडूनीयां ।।
परी विकूनीयां । टाकू न त्या ! ।।

विकूनि टाकिती । तेचि हरामखोर ।।
तेचि खरे चोर । आम्ही नव्हों ।।

युगवाणी ; वर्ष २१, अंक ६

अनुक्रमणिका

केशवसुतांचे मूर्तिभंजन

प्रा. भवानीशंकर पंडित

केशवसुतांचा

हा प्रत्येकी साडेतीन चरणक असणारा सात चरणांचा केशवसुतांचा एक अ–मंग अभंग आहे. यावर त्यांचे बंधु सीतारामपंत यांची टीप आहे;—"मूर्तिभंजन या शब्दाचा अर्थ देवळातल्या मूर्ति फोडणे असा नसून जुन्यावाईट, अन्यायाच्या चालीरीति व रूढि यांचा नायनाट करा, आणि 'आंतील संपत्ति फस्त करा' म्हणजे रूढीमधील चांगला भाग तेवढा राखा, परंतु सोयीपलीकडे तिला जास्त महत्त्व देऊन तिचे जे बंड व स्तोम माजले आहे ते मोडा असा आहे." [केशवसुतांची कविता, आ. ४ थी, परिशिष्ट २ रें, पृ. १२] याच अभंगावर सुप्रसिद्ध काव्यमीमांसक बाळकृष्ण अनंत भिडे यांचा ताशेरेवजा मार्मिक शेरा आहे;—" काव्याला दुर्बोधपणा अगर संदिग्धत्व जिने येईल अशी भाषा कवीने वापरल्यास त्याच्यासंबंधी दुर्ग्रहही उत्पन्न होतो. केशवसुतांच्या या कवितेचा विचार केला असता भाषा अगदीच साधी परंतु कोडयाची आहे. कवीची अंतःस्थ कल्पना गूढ किंवा विक्षिप्त असते असे मुळीच नसून, गूढपणा काय तो भाषेतच असतो."

[वि. ज्ञा. वि., जाने. १९२०]

या दोन 'दीपिकां'च्या प्रकाशात या अभंगाच्या भाषेचा व त्यातील आशयाचा उलगडा सहज होतो. या अभंगाखाली स्थलकालनिर्देश नाही किंवा एखाद्या मासिकात हा प्रसिद्ध झाल्याचा पुरावा नाही. केशवसुतांच्या कवितासंग्रहात अठराशे शहाण्णव–सत्त्याण्णवच्या कवितांजवळ याचा क्रम आहे. तेव्हा त्या सुमारास महाराष्ट्रात सामाजिक विचारांचे जे मंथन चालू होते, त्यातून हे विचाररत्न बाहेर पडले आहे.

इंग्रजी राज्याच्या काळात या देशातील रूढ आचाराविचारात स्थित्यंतर घडू लागले. हे स्थित्यंतर जुन्या रूढिवाद्यांना मान्य नव्हते. त्यामुळे समाजात नवे व जुने हा संघर्ष सुरू होता. केशवसुत नवीन विचारांचे समाजसुधारक होते. समाजात घडणाऱ्या स्थित्यंतरास अनुरूप अशी समाजाची नव्याने पुनर्घटना (Reconstitution) झाली पाहिजे असे त्यांस वाटत होते. ते इंग्रजीतून विचार करीत. त्यामुळे 'सुधारणा' या अर्थी 'री-फॉर्म' (Re-form) हा शब्द त्यांच्या समोर होता. त्यांनी 'फॉर्म' ला 'मूर्ती' हा प्रतिशब्द योजिला आहे. त्यामुळेही त्यांना मध्ययुगीन इतिहासातील मूर्तिभंजनाची घटना स्फुरली असावी. 'मूर्ती' म्हणजे 'देवमूर्ती' (Idol) हा अर्थ त्यांना अभिप्रेत नाही. समाजाची घडण मोडकळीस येत आहे, तेव्हा ती पुन्हा नव्याने उभविली पाहिजे असे त्यांना ध्वनित करावयाचे आहे.

जुने कर्मकांड आता व्यर्थ आहे हे सांगण्यासाठी त्यांनी 'पूजाद्रव्यां'चा व नमस्कारासाठी 'नाक घासण्या'च्या विधीचा निर्देश केला आहे. जुनी मंडळी सुधारकांना असंस्कृत, उत्पातक व त्रासदायक समजत. त्यासाठी त्यांनी 'आम्ही डोंगरी माणसे द्वाड व आडदांड आहोत,' ही कल्पना आणली आहे. जुन्यातील समाजोपकारक उपयुक्त तत्त्व सुधारकांना कायम ठेवावयाचे आहे हे स्पष्ट करण्यासाठी त्यांनी 'आतील संपत्ती फस्त करा' आणि 'आम्हाला ते चाड संपत्तीची' हे विचार मांडले आहेत. परंतु सुधारणेच्या आड रूढि राक्षशीण येते. तिला बळी पडावयाचे नसेल, तर तिचे 'कूट प्रश्न' (Problems and puzzles) युक्तीने सोडवले पाहिजेत असे ते सांगतात. या संदर्भात केशवसुतांना इजिप्तमधील 'स्फीन्क्स' (Sphinx) आठवली आहे. सिंहाचे शरीर व स्त्रीचा मुखवटा असलेली ही एक राक्षशीण आहे. वाळवंटातील प्रवाश्यांना ती बाल्य, तारुण्य आणि वार्धक्य या मनुष्यजीवितातील तीन अवस्थांवर आधारलेले एक कोडे घालीत असे; आणि त्याचे जर

(पुढील मजकूर पान २२८ वर)

—प्रत

सिद्ध झालों मी दूर जावयाला
कण्ठ तेव्हां तव फार भरुनि आला;
मला म्हटलें तूं गद्‌गद स्वरानें
"खुशालीचें तें वृत्त लिहित जाणें !"

"लिहिन" म्हटलें मीं तुला आश्वसाया,
पुढिल केला मीं मुळीं नच विचार;
करीं घेतां परि पत्र हें लिहाया,
खुशालीचें क्षीणत्व दिसे फार !

लोचनांला या होसि तूं प्रकाश
मदीयात्म्याचा तूंच गे विकास;
नाडि माझी तव करीं वाहताहे,
हृदय माझें तव उरीं हालताहे !

करा अपुल्या तूं पहा चांचपून,
उरा आपुलिया पहा तपासून;
प्रकृति माझीही तिथें तुज कळेल,
विकृति माझी तुज तिथें आढळेल !

अनुक्रमणिका

केशवसुतांची ' —प्रत '

प्राचार्य या. मु. पाठक

केशवसुतांची " — प्रत " ही कविता मी ४५ वर्षांपूर्वी प्रथम वाचली. तेव्हापासून अगदी या क्षणा-पर्यंत ती कविता मला फार फार आवडते. अगदी पहिल्याच वाचनात तिने माझ्या मनाचा ठाव घेतला. आणि ते अम्लान–पुष्प अजूनही माझ्या मनात तसंच ताजं नि टवटवीत आहे. केशवसुतांच्या समकालीन कवींत "तुतारी" कवितेने जसं वादळ उठवलं आणि त्या कवितेसारखी एखादी कविता आपलीही असावी अशी अहमहमिका सुरू झाली, तसाच काहीसा प्रकार या कवितेचाही झाला, "To —"; ही इंग्रजी टूम वास्तविक केशवसुतांनी मराठीत आणली. पण ती आणताच गोविंदाग्रजांना आपली ' –स– ' ही कविता सुचली, बालकवीला "–ला–" ही कविता लिहा-वीशी वाटली, आणि विनायकाला स्वतःची कैफियत आपल्या ' –प्रत ' या कवितेतून सांगाविशी वाटली. अनुकरण ही सगळ्यात मोठी प्रशस्ती. परंतु तुतारीची नक्कल जशी फसली, तशीच या अस्सल '– प्रत 'ची सरही बाकीच्या कवींच्या कवितांना आली नाही.

जीवाला जाऊन झोंबल्यासारखं असं या कवितेत आहे तरी काय ? प्रमुख समीक्षकांवर तिचा विशेष प्रभाव पडलेला दिसत नाही. त्या कवितेची नाडीच त्यांच्या हाती लागली नाही. एका अस्सल, जिवंत कवितेची त्यांनी मरणोत्तर चिरफाड केली असे वाटते. कुणाला केवळ तीत अर्थचमत्कृती दिसली, तर कुणाला पाश्चिमात्य वैद्यकातील नवे ज्ञान ! एका संपादक-द्वयाने तर हे प्रेयसी--प्रियकरातले प्रेम आहे असे सुचविले. ही कविता लिहिली त्यावेळी केशवसुत २३ वर्षांचे होते. आठ वर्षांपूर्वी त्यांचे लग्न झालेले असले तरी त्यांची नवोढा पत्नी त्यावेळी नूतनयौवना म्हणजे षोडशवर्षा होती. मॅट्रिकची परीक्षा उत्तीर्ण झाल्यामुळे त्यांना एकटचाला पोटासाठी दूर भटकणे भाग होते. पतीपत्नीची या निमित्ताने ताटातूट झाल्यानंतर आपल्या प्रेमाच्या अद्वैताची केशवसुतांना जी उदात्त जाणीव झाली त्यातूनच या उत्तुंग प्रेमकवितेचा जन्म झाला.

सिद्ध झालों मी दूर जावयाला
कंठ तेव्हां तव फार भरुनि आला
मला म्हटले तू गद्गद स्वरानें
" खुशालीचें तें वृत्त लिहित जाणें ! "

हा कवितेचा आरंभ वाचताना वडिलधाऱ्या मंडळींना नमस्कार करून आणि त्यांचा निरोप घेऊन बाहेर पडणारी पतीदेवाची मूर्ती पाहताच त्यांच्या नवोढा शालीन पत्नीनं आडोशातून जो साध्या प्रेमाने रसरस-लेला काळजीचा निरोप मीतभीत दिला तो त्यातील सहजोद्रेक सरळ आपल्या हृदयाचा ठाव घेतो. दऱ्याखोऱ्यातून, रानावनातून, जंगली जनावरांशी आणि चोर डाकूंशी सामना देत देत आपला पती ' नियुक्त स्थळी ' सुखरूप पोचेल की नाही ही त्या साध्वीची " अतिस्नेहः पापशंकी " अशी अवस्था.

" लिहिन " म्हटलें मी तुला आश्वसाया
पुढिल केला मीं मुळीं नच विचार

या ओळी लिहीत असताना त्यावेळच्या रीतीरिवाजा-प्रमाणे वडीलधाऱ्या मंडळींनी गजबजणाऱ्या घरात आपण आपल्या पत्नीला उद्देशून वेगळे पत्र लिहिणे कसे शक्य आहे ?—ही अडचण केशवसुतांच्या लक्षात साहजिकच आली नसेल काय ? या अडचणीला तोंड देण्यासाठी त्यांनी आपल्या भावनांचं जे उदात्तीकरण

(पुढील मजकूर पान २३३ वर)

झपूर्झा !

हर्षखेद ते मावळले
हास्य निमालें;
अश्रु पळाले;
कण्टकशल्यें बोथटलीं,
मखमालीची लव वठली;
कांही न दिसे दृष्टीला
प्रकाश गेला,
तिमिर हरपला;
काय म्हणावें या स्थितिला ?
झपूर्झा ! गडे झपूर्झा !

हर्षशोक हे ज्यां सगळें,
त्यां काय कळे ?
त्यां काय वळे ?
हंसतिल जरि ते आम्हांला,
भय न धरूं हें वदण्याला:—
व्यर्थी अधिकचि अर्थ वसे
तो त्यांस दिसे
ज्यां म्हणति पिसे.
त्या अर्थाचे बोल कसे ?--
झपूर्झा ! गडे झपूर्झा !

ज्ञाताच्या कुंपणावरून,
धीरत्व धरून,
उड्डाण करून,
चिद्घनचपला ही जाते,
नाचत तेथे चकचकते;
अंधुक आकृति तिस दिसती,
त्या गाताती
निगूढ गीती;
त्या गीताचे ध्वनि निघती--
झपूर्झा ! गडे झपूर्झा !

नांगरल्याविण भुई बरी
असे कितितरी;
पण शेतकरी
सनदी तेथें कोण वदा ?
हजारांतुनी एकदा !
तरी न तेथुनि वनमाला
आणायाला
अटक तुम्हांला;
मात्र गात हा मंत्र चला--
झपूर्झा ! गडे झपूर्झा !

पुरुषाशीं त्या रम्य अति
नित्य प्रकृति
क्रीडा करिती;
स्वरसंगम त्या क्रीडांचा
ओळखणें, हा ज्ञानाचा--
हेतु; तयाची सुन्दरता
व्हाया चित्ता--
प्रत ती ज्ञाता,
वाडें कोडें गा आता--
झपूर्झा ! गडे झपूर्झा !

सूर्यचंद्र आणिक तारे
नाचत सारे
हे प्रेमभरें
खुडित खपुष्पें फिरति जिथें,
आहे जर जाणें तेथें,
धरा जरा निःसंगपणा
मारा फिरके,
मारा गिरके,
नाचत गुंगत म्हणा म्हणा —
झपूर्झा ! गडे झपूर्झा !

युगप्रवर्तक केशवसुत

सोपानदेव चौधरी

युगप्रवर्तक महाकवी केशवसुत यांच्या जन्मशताब्दिनिमित्त हा स्मृतिसमारंभ आपण साजरा करीत आहोत. महाराष्ट्राच्या अनेक भाग्यापैकी हे एक महाभाग्य आहे, अहोभाग्य आहे. महाकवी तेच की जे जगाला अमृतसंदेश देतात. खंडकाव्ये लिहितो तोच महाकवी असे मी मानीत नाही. अखंडितपणे कवितेला नवीन नवीन वळणे देत आपल्या काव्यातून महामंत्र देतो तो महाकवी ! परमात्ममुखाने जीवात्मा जे काही बोलतो, सांगतो, गातो ते अमर असते म्हणूनच ते महाकाव्य ! केशवसुत स्वतःला जरी दुर्मुखलेला म्हणवीत असले तरी अंतःमुखाने सन्मुखच होते. सहस्रमुख होते म्हणूनच ते विराट पुरुषाची कवनें गाऊ शकले. पहिल्याप्रथम केशवसुतांना वेड लागले ते निसर्गाचे. सृष्टिसौंदर्यांत ते रमून गेले. "जे रम्य ते बघुनिया मज वेड लागे" वृक्षवल्लरींशी ते खेळले, पानाफुलांशी बोलले. कांटेरी शेवरीच्या बोंडातून निघून वाऱ्यावर तरंगणारी म्हातारी, त्या म्हातारीला पकडणाऱ्या मुलीकडे बघून केशवसुतांना आपले बालपण आठवले—

> ते दिन पुष्पांचे
> कोंवळया किरणीं खेळांचे
> मज वय विसरूं दे
> मुग्धमधु बाल्यीं उतरूं दे.

प्रौढत्वी निजशैशवास जपणारा हा कवी असला तरी काव्यात परतत्वस्पर्शु झाला नाही असे कसे होईल ? मग ते केशवसुत कसले ? धादांतातही वेदान्त उभा करणे हे तर केशवसुतांचे वैशिष्टच !

> अज्ञातामधला, मूर्त तूं ध्वनि गमसी मजला
> अर्थ तुझा कोण ? मला तो देइल सांगोन
> मी तो अंधार, लोपवू झटेन साचार !

आणि मग का कुणास ठाऊक ! मला सतारीच्या बोलाची सय येते, अंधारानेही उजेडावर मात करावी केशवसुतांनी सतारीचे बोल कसे ऐकले ते बघा.

> काळोखाची रजनी होती,
> हृदयीं भरल्या होत्या खंती;
> अंधारांतचि गढलें सारें
> लक्ष्य, न लक्षी वरचे तारे;
> विमनस्कपणें स्वपदें उचलित
> रस्त्यांतुनि मी होतो हिंडत
> खिडकी मधुनी सूर तदा
> पडले—दिड दा, दिड दा, दिड दा !

त्या सतारीच्या बोलात त्यांना काय ऐकू आले ?

> सोसाटयाचे वादळ येते,
> तरि ते तेव्हा मज मानवते;
> भुतें भोंवती जरि आरडती
> तरि ती खचितचि मज आवडती
> कारण आंतिल विषण्ण वृत्ती !
> × × ×
> सतार फोडुनि टाकिसि न कां ?

रंजकता बाजूलाच राहिली. केशवसुतांच्या विमनस्क स्थितीने भंजकताच निर्माण केली.

> सतार फोडुनि टाकीसि न कां ?

"दिड दा दिड दा..." हे स्वर या ठिकाणीं वरेली तारेच्या नखीने न छेडता दगडाच्या कपचीने ओरबडले जणु ! आणि मग रुष्ट झालेली ती गती माघारी वळली. केशवसुतांचे हृदय निवाले, ते तन्मय झाले दा दिड् दाऽ स्वर ऐकून केशवसुतांच्या डोळयाला पाणी आले. बाह्य भैरवी घरि ते प्रीती. (भैरवी म्हणजे भयंकर

वृत्तीतून) त्या वृत्तीतून शेवटी गोड भैरवीचेच सूर आले.

शांत वाजली गती शेवटीं
शांत धरित्री, शांत निशा ती
शांतच सारे, शांतच वारे
शांतचि हृदयीं झाले सारे.

काही झाले तरी या सतारीत तुतारीचे स्वर डोकावून गेले. केशवसुतांच्या बहुतेक कवितांमधे काव्यविषया-मधे स्वतःच्या मनःस्थितिबरोबरच समाजाचे चित्रण आढळून येते. समाजातील दंभ, ढोंग, रुढी, विषमता बोलून उठते. "नरेंच केला हीन किती नर," हे शल्य त्यांना बोचते. खरोखरी त्यांना सुंदर सतारीची जरुरी नव्हती. दीर्घ किंकाळीने समाजाला, देशाला जागे करणारी तुतारी त्यांना हवी होती. ती तुतारी त्यांनी फुंकली. कुरुक्षेत्रावर वसुदेवसुत–श्रीकृष्णाच्या मुखी रणशंख प्रस्फुरला, त्याचप्रमाणे केशवसुत–कृष्णाजींनी स्वप्राणाने तुतारी फुंकली. श्रीकृष्णाने प्रथम वासरी वाजविली तर कृष्णाजींनी प्रथम सतार छेडली एवढेच काय ते ! केशवसुतांच्या या जन्मशताब्दिनिमित्त मला हे देवत्व बहाल करावेसे वाटले. असो.

केशवसुतांनी स्वप्राणाने तुतारी फुकली, गगने भेदून टाकण्याचा त्यांनी चंग बांधला, तुतारीने महाराष्ट्र जागा केला. केवळ मालगुंडपासून तर फैजपूर मडगांवपर्यंत हवा खाल्लेल्या, जगबुडी नदी-पासून तर तापी–गिरणेपर्यंत पाणी प्यायलेल्या या महाकवीने साऱ्या महाराष्ट्रात नवचैतन्य निर्माण केले. तुतारी या काव्यावद्दल मी विशेष सांगावे असे नाही. आलम् मराठी रसिकांना तुतारी माहीत आहे. ज्याला माहीत नसेल त्याच्यासारखा करंटा दुसरा कुणी नाही.

केशवसुतांची समग्र कविता वाचून त्यातील दोन टप्पे मला दिसून आले. म्हातारीपासून सतारी-कडे ! आणि सतारीपासून तुतारीकडे ! केशव-सुतांच्या काव्यप्रवाहातील दोन्ही किनाऱ्याचे दोन प्रवाह म्हणा हवे तर ! आणि या दोन प्रवाहामधली धार म्हणजे माझी अत्यंत आवडती कविता झपूर्झा ! झपूर्झा या कवितेला मानवी आकार दिला तर त्यात उपलब्ध नसलेले केशवसुतांचे चित्रच दिसेल ! एकट्या झपूर्झा या कवितेने देखील केशवसुत अमर झाले असते. या कवितेत केशवसुतांचा आत्मा घुमतो आहे, परोक्षअपरोक्षाचा नाद घुमतो आहे. या नाद-सौंदर्यामधे बोधसौंदर्य भरले आहे. सारे काही सामावले आहे.

नांगरल्याविण भुई बरी
असे कितितरी, पण शेतकरी
सनदी तेथें कोण वदा ?

नांगरलेली भूमी शेतमालकांची ! शेत कसणाऱ्याची ! नांगरणाराची असेलच असे नाही. परंतु जी भूमी, ती अजून नांगरली गेली नाही ती भूमी, जमीन कोणाची ? त्याचा सनदी कोण ? मालक कोण ? हजारातुनी एखादा ? आजच्या या नव्या युगात आचार्य विनोबा भावे यांना याच चिंतनातून भूदानाचे कार्य दिसले असेल का ? दिसले असावे असे मला वाटते. हजारातून एखादाच सनदी का ? सर्वच असले पाहिजेत. काहीही असो. झपूर्झा ही कविता मला फार आवडते, त्या कवितेचे दर्शन मी घडवून आणीत आहे.

जें रम्य तें बघुनिया मज वेड लागे
गाणें मनांत मग होय सवेंचि जागें.

हरपलं श्रय (पान २१५ वरून)

प्रा. रा. श्री. जोग 'केशवसुत'या पुस्तकात (पाने १२१-१२२) म्हणतात--

"लहाणपणी अज्ञान असता साऱ्याच गोष्टी-संबंधी जो उल्हास, उत्साह वाटे तो वाटेनासा झाला आहे...लहान असताना मोठे व्हावेसे वाटते. उत्कट इच्छा असते. पण आता मोठे झाल्यावर,जे मागितले ते म्हणजे प्रौढपणा मिळाला खरा, पण बाल्यात वाटणारा अकारण, निरागस आनंद गेला. आनंद, उल्हास, उत्साह ही देऊन घेतले काय, तर प्रौढपणींच्या चिंता. सोने देऊन माती मिळवल्यासारखे झाले." यात लहानपणातला आनंद गेला व तो प्रौढपणी निमाला, हे वर्डस्वर्थचे प्रतिबिंब असले तरी ते कशासाठी, याचा बोध नीट होत नाही; हीच यातील मोठी उणीव आहे ! म्हणून ते पटत नाही !

प्रा. श्री. के. क्षीरसागरांनाही आपल्या 'गूढ-वादाच्या' उत्तरार्धात ('टीकाविवेक' ग्रंथ) असेच वाटते, ते म्हणतात--'हरपले श्रेय' ही कविताही गूढगुंजनाच्या विवेचनात एक कसोटीची कविता ठरण्यासारखी आहे. सारांश 'ही या अर्थाने गूढ नसून 'कूट' वा 'संदिग्ध' या अर्थाने गूढ आहे...अर्थात् गूढ काव्यापेक्षा रोमँटिक काव्याशीच या लक्षणांचे नाते अधिक जवळचे आहे. सारांश, 'हरपले श्रेय' ही कविता अभिव्यक्तीच्या, अस्पष्टतेच्या, गूढ अनुभूतीच्या दृष्टीने पाहता, रोमँटिक संप्रदायाची आहे असेच म्हणावे लागेल."

"जेथे ओढे वनराजी,
वृत्ति रमे तेथे माझी!"

यातच तिची 'काव्यतंद्रा' रमते.

श्री. वि. स. खांडेकर म्हणतात—"उदात्त-बुद्धीला" वगैरे वाक्ये असे दाखवितात, की हे वर्णन 'कवि', 'कलावंत', 'संशोधक', 'ध्येयवादी' इत्यादिकांनाच ते लागू पडते. केशवसुत जुन्या अर्थाने अध्यात्मिक नव्हते. ते ऐहिकतेचे पुरस्कर्ते होते.... त्यांची खरीखुरी श्रद्धा एकाच देवतेवर होती. ती देवता म्हणजे कविता!"

प्रा. म. श्री. पाडत म्हणतात—'हरपले श्रेय या कवितेत केशवसुतांच्या वाढत्या वयातला विराग आहे. येथपर्यंत सर्व ठीक आहे. पण, पान ३८० वरील टीपेत ते म्हणतात—"या चिंतनिकेचा विषय सांताने अंतःस्फूर्तीच्या बलावर अनंताचा चालविलेला शोध हा आहे!" इथे मात्र ते पूर्ण घसरले आहेत.

प्रत्यक्ष कविता रचनेमध्ये केशवसुतांनी पालुपद अत्यंत व्यापक, परमार्थी व हृदयस्पर्शी ठेवले आहे. चित्रणात मनोवेधकता व आकर्षकता आहे. पहिल्या प्रथम लहानपणी सुख होते; आता नाही, दिले तसे मिळाले; मोल दिले तेच मिळाले; सोने देऊन माती घेतली; झरोक्यातून किरण येतो, त्याच्या अणूंतून मन परोक्षात जाते; ओढे वनराजीत मन रमते; अरण्यात त्याला मी आळविते. लोक मला 'उठली!' असे म्हणतात! मी बावळी व दुबळी आहे! मला काही सुचत नाही! मी सती आहे; पतंग दीपशिखेवर उडी घेतो! माझे ते श्रेय हरपले म्हणून मी जीव पाखडीत आहे! ते श्रेय कसे मिळणार?

ब्रह्मानंद म्हणजे अत्यानंद; काव्यतन्द्रा, ओढे व वनराजीत ती मला मिळते. पण मी दुबळी व बावळी आहे. हे भाव स्थितप्रज्ञतेत नसतात. 'मी जीव पाखडीत आहे!' याचा अर्थ हे काव्यतंद्रेसाठीच आहे, हे स्पष्ट दिसते.

केशवसुतांचा जीवनकाल म्हणजे १८६६ ते १९०५ हा काल श्रीरामकृष्ण परमहंस व त्यांचे परमोत्तम शिष्य नरेंद्र ऊर्फ स्वामी विवेकानंद यांचा काळ! या कालात गुरूंनी 'भावाविष्ट' होणे व स्पर्शाने नरेंद्रात ऊर्फ स्वामी विवेकानंदात परमार्थाचे चमत्कार घडवून आणणे या गोष्टी झाल्या! त्या दोघांनी श्रेष्ठ चमत्कार केले. 'समाधि', 'ब्रह्मानंद', 'स्थितप्रज्ञता' व 'त्याग' त्यांनी साक्षात् उभे केले. त्या अवस्था अंगी येण्यास 'गुरु' पाहिजे, 'सत्संग', पाहिजे, 'त्याग' पाहिजे, 'अनुभूति' पाहिजे. 'जीवन-विकास', व 'Gospel of Shri Ram-Krishna', त्यांचे अनेकपरीचे साक्षात्कार देतात. त्यावेळी "श्रीरामकृष्ण ईश्वरप्रेमाने अहर्निश मत्त झालेले असतात! निरंतर 'भावाविष्ट' व समाधि-

मग्न ! वहिर्जगतात मन मुळीच नाही ! " आणखी एक विलक्षण चमत्कार झाला होता—" महाराज, आपण ईश्वर पाहिला आहे काय ? " असे एका अठरा वर्षाच्या प्रियदर्शी किशोराने ('विवेकानंदांनी') प्रक्षुब्ध अंतःकरणाने आवेग भरल्या शब्दात श्रीरामकृष्णांना हा जळजळीत प्रश्न विचारला !

श्रीरामकृष्णांच्या हसऱ्या चेहऱ्यावर एक अपूर्व प्रभा झळकली ! तिळमात्रही न थबकता श्रीरामकृष्णांनी उत्तर दिले—"होय बेटा, मी त्याला पाहिले आहे—जसे तुला पाहत आहे तसे—त्याहीपेक्षा कितीतरी अधिक स्पष्टपणे ! —तो लाभू शकतो, तो दिसू शकतो ! तू त्याला पाहू इच्छितोस ?—सांगेन त्याप्रमाणे वागशील, तर मी तुलाहि तो दाखवू शकेन ! " (फेब्रु. १९६३ 'जीवनविकास')

श्रीरामकृष्ण परमहंस व स्वामी विवेकानंद यांनी अशा रीतीने सर्व जगाला उजळून टाकले ! महेंद्रांनी त्यांच्या कथा लिहिल्या !

'काव्यतंद्रा' किंवा 'प्रतिमेची अत्यद्भुत मोहक देवता' ही एक अवस्था आहे; पण ती फार अलिकडली ! ते 'श्रेय हरपले आहे, ते मिळत नाही ! हीच कविश्रेष्ठ केशवसुत यांची तकरार आहे !

केशवसुतांनी गाढ अभ्यासलेला 'इमर्सन' म्हणतो, "The real evidence about immortality is too subtle!" ('समग्र केशवसुत'—पान ३८०)

गोफण केली छान

(पान २१७ वरून)

'आवेग' हा संचारी भाव आपल्या साहित्यशास्त्रात मानलेला आहेच. त्यालाच स्थायीभाव मानले तर त्याच्या प्रकर्षाने मनाचा जो क्षोभ होतो त्यालाच प्रक्षोभ रस म्हणता येईल. अशा प्रक्षोभ रसाचा आस्वाद ही गोफण कविता वाचताना, म्हणताना, मी घेत होतो.

पण हे लक्षात ठेवले पाहिजे की हा प्रक्षोभ कशाच्या विरुद्ध आहे ? मानवी जीवनाला अधोगर्तेला नेणाऱ्या गोष्टीविरुद्ध हा प्रक्षोभ आहे. भारतीय सामाजिक जीवनातील सदैव बोचणाऱ्या गोष्टींवर ही दगडफेक आहे.

ह्या कवितेतल्या भावपूर्ण आणि आवेशयुक्त शब्दयोजनेने एकदम माझ्या मनाची पकड घेतली. आपल्या हृदयाला आपल्याच नखांनी फाडून त्यातल्या स्नायूंचे चिवट दोर काढून, कवी ही गोफण वळतो आहे. कवी म्हणतो मी सत्त्वाचा चोर आहे. 'सत्त्वाचा मी चोर' ही ओळ एकदम मनाला भिनून जाते. मग तिचा अर्थ जाणण्याचा प्रयत्न होतो एक अर्थ, मी सत्त्व असलेला चोर आहे. दुसरा, तुमचे सत्त्व हरण करण्यासाठी तुमची सत्त्वपरीक्षा करण्यासाठी, मी चोर बनून आलो आहे असा. दुसरा मनाला जास्त चाटून जातो. ह्या गोफणीच्या दोराला त्वेषाचा घट्ट पीळ भरलेला आहे. विश्वप्रेमाच्या पोकळ गोष्टी बोलणारे पुष्कळ असतात. पण, त्वेषाचे महत्त्व ते विसरतात. 'विनाशाय च दुष्कृताम्' हे काम त्वेषाविना होत नाही. दुष्टता प्रेमाने नाहीशी होत नाही. ती त्वेषानेच नाहीशी करावी लागते. तिथे 'मैत्र' नको, वैरच पाहिजे. वैरच आपल्या हृदयाला फाडून काढलेल्या स्नायूंच्या दोरांचा पीळ कधी दवडणार नाही अशी घट्ट गाठ मारू शकते.

केशवसुत म्हणतात—

वैर तयांला, बसती जे
स्तिमितचि आलस्यांत
वैर तयांला, पोकळ जे
बडबडती तोऱ्यांत !

कोण असे आहेत ? चोहो बाजूला पाहावे.

(पुढे चालू)

ह्या ओळीतली शब्दयोजना मला अतिशय प्रभावी वाटते. पण केशवसुतासारख्या प्रतिभावंत कवीपेक्षाही आपणाला जास्त कळते असे समजणारे काही टीकाकार असतात. तीर्थस्वरूपी भूमिका घेऊन ते गुणदोपविवेचन करतांना म्हणतात. 'वैर तयांला' हा प्रयोग इंग्रजी धर्तीवर आहे. 'वैर तयाशी' असा असावयास होता. मला तर 'वैर तयांला' ह्या प्रयोगातच एक अर्थाचा वेगळा आविष्कार जाणवतो. मराठी व्याकरणाच्या दृष्टीनेही हा प्रयोग चुकीचा नाही. ते कसे हे दाखवायला जरा 'कारक' विचारात शिरावे लागेल. ते आता नको. केशवसुतासारख्या कवीचा सहजस्फूर्त उद्‌गार 'वैर तयांला' असा का आला, 'वैर तयाशी' असा सहज सुचणारा आणि छंदालाही जुळणारा का आला नाही, हे टीकाकारांनी आधी नम्रपणे पाहायला पाहिजे. ही काही एखाद्या नवशिक्या पोरासोराची कविता नाही. प्रतिभावंत कवीची परिणतप्रज्ञेची कविता आहे. इथे व्यक्तीने व्यक्तीशी वैयक्तिक वैर धरलेले नाही तर अशा वृत्तीच्या समाजकंटकांना वैर दिलेले आहे. प्रेम देता येते, मैत्र देता येते, तसेच वैरही देता येते. इथे संप्रदान अभिप्रेत असल्यामुळे 'वैर तयांला' हाच प्रयोग अधिक योग्य वाटतो.

कुणाकुणास हे वैर दिले आहे केशवसुतांनी ! ते पाहिले म्हणजे आजही वाटते आपणही त्यांना वैरच दिले पाहिजे ! आजही हे प्रकार आहेतच. लहानपणी शाळेत असताना आम्ही मारामारी केली, आम्हाला थप्पड मारणाऱ्याला आम्ही चार ठोसे दिले तर आमचे एक शिक्षक आम्हाला ही आर्या म्हणून दाखवून उपदेश करायचे--

दिधले दुःख पराने उसने फेडू नयेचि सोसावे
शिक्षा देव तयाला करिल म्हणोनी उगेचि बैसावे !

बाळांना अशी गरिबी शिकवणाऱ्यांना, केशवसुतांनी 'वैर' दिले आहे. आणि कठीण शब्द ह्या धोंड्यांनी त्यांचेवर हाणाहाण केली आहे. काही टीकाकारांना हा 'धोंडा' जरा लागलेला दिसतो. ते म्हणतात, हा गद्यप्राय, शिवराळ, कटु शब्द वापरायला नको होता. मग कोणता ? दगड ? की 'गोटा' की अश्म ? स्वहृदयाला निजनखरी फाडून त्याचे दोर वनवून केलेल्या गोफणीतून करनखरी संगमरवरी शब्द फेकायचे नसतात तर कठीण शब्दांचे धोंडेच !

अशी ही प्रक्षोभरसाची ओजस्वी कविता, तिच्यातील त्वेषाने, आवेशाने, संतापाने, माझ्या मनात जेव्हा वाचतो तेव्हा विलक्षण क्षोभ, सात्त्विक संताप उत्पन्न करते. त्याच त्या नवरसात्मक कवितांचा वीट आला, भोवतालची परिस्थिती बेचैन करणारी असली, म्हणजे तर ही कविता मला हलवून सोडते. म्हणूनच मला ही कविता फार फार आवडली आणि आवडते.

आम्हा डोळे नसति बघण्या पारतंत्र्यामुळे हो
ऐकायाला श्रुतिरि नसतो पारतंत्र्यामुळे हो

देवदानवां नटें निर्मिले हें मत लोकां कळवूं द्या.
काठोकाठ भरूं द्या पेला, फेस भराभर उसळू द्या.

केशवसुतांचे मूर्तिभंजन (पान २१९ वरून)

उत्तर मिळाले नाही, तर ती प्रवाश्यांना गिळीत असे. ते कोडे असे;--"ज्याला सकाळी चार पाय, दुपारी दोन पाय व सायंकाळी तीन पाय असतात असा प्राणी कोणता ?" केशवसुतांना आत्मविश्वास आहे. ते म्हणतात, "आम्ही सुधारक या रूढी राक्षसिणीच्या कोडयात अडकणार नाही." या ठिकाणी त्यांना कदाचित् ग्रीक पुराणकथा अभिप्रेत असावी. त्या कथे-प्रमाणे ओडिपस्‌ने "मनुष्य" असे उत्तर दिले व स्फिन्क्सचे कोडे सोडवले. त्यासरशी तिने खडकावरून उडी मारली आणि प्राण दिले.

जीर्णमतवादी मंडळी नवीन सुधारकांना धर्म-द्रोही, समाजविध्वंसक, परक्या इंग्रजांना देश विकणारे समजत; आणि 'चोर' व 'हरामखोर' अशा शिव्या देत. केशवसुत म्हणतात, "आम्ही सुधारक आवश्यक त्या सुधारणा करून समाजाची पुनर्घटना करणार आहोत. आम्ही त्याचा उच्छेद करणार नाही."

केशवसुतांची वाणी जात्याच ओजस्वी आहे. रूढीवरील संतापामुळे अभंगासारख्या शुद्ध मऱ्हाटी छंदात तिच्यात आवेश व त्वेष यांचा स्वाभाविक सन्निवेश झाला आहे. अभंग हा छंद निवडताना कदाचित् त्यांच्यापुढे सोंगाढोंगावर तुटून पडणाऱ्या तुकाराम महाराजांचा आदर्श असावा.

मनातील भाव, आशय किंवा कल्पना स्पष्ट होण्याकरिता इंग्रजी काव्यरीतीप्रमाणे कवी आपल्या कवितेत एखाद्या 'प्रतिमे'ची (Image) योजना करतो. आदर्शात किंवा जलाशयात जसे एखाद्या पदार्थाचे प्रतिबिंब परावर्तित होते, तसे कवितेत योजिलेल्या 'प्रतिमे'त कवीच्या मनातील भाव, आशय अथवा कल्पना परावर्तित होते. आलंकारिक संस्कृतज्ञ उपमारूपकादी अर्थालंकार योजितो. परंतु त्यात 'सूचकते'चा (suggestion) व 'पृथगा-त्मते'चा (originality) अभाव असतो. 'प्रतिमा' सूचक व पृथगात्म असते. गंध हा जसा पाकळीला बिलगूनही विलग असतो किंवा सूर हा जसा तंत्रीला लागूनही अलग असतो, तशीच 'प्रतिमा' ही कवितेतील भाव, आशय व कल्पना यांच्याशी संबद्ध असूनही स्वतंत्र असते. अलंकारांना स्वतंत्र अस्तित्व नसते. ते त्या तिघांना चिकटून असतात.

केशवसुतांची ही कविता दुर्बोध वाटते. याचे कारण, हिच्यात योजिलेल्या 'मूर्तिभंजन' आणि स्फिन्क्सचा 'कूट प्रश्न' या दोन्ही प्रतिमा रसिकांना अनोळखी आहेत; आणि दगडातहि जिला देवाचा साक्षात्कार होतो त्या आपल्या संस्कृतीला 'मूर्ति-भंजना'ची कल्पना अपरूप आहे. 'प्रतिमा' अनोखी व नवखी असेल, तर कवितेची सरसता व सुंदरता द्विगुणित होते. पण ती अनोलखी नसावी व आशयाला अनुरूप असावी.

जिकडे जावें तिकडे माझीं भावंडें आहेत,
सर्वत्र खुणा माझ्या घरच्या मजला दिसताहेत;
कोठेंही जा--पायांखाली तृणावृता भू दिसते
कोठेंही जा--डोईवरतें दिसतें नीलांबर तें !

सांवलीत गोजिरी मुले,
उन्हात दिसती गोड फुले
बघता मन हर्षून डुले

तीं माझी, मी त्यांचा, एकच ओघ अम्हातुनि वाहे !
नव्या मनूंतिल नव्या दमाचा शूर शिपाई आहे !

अनुक्रमणिका

"अरे, ही गुलाबी दारू नव्हे ! ही आग आहे आग ! बाबारे, हे पाणी नव्हे ! माझ्या प्रेमाची ही कथा क्षणभंगुर नव्हे. ती काही मेलेल्या मनाची कहाणी नव्हे !...समजून उमजून (या क्षेत्रात) पाऊल पुढे टाकायचं असतं वरं ! कारण जग म्हणजे कठोर सत्य आहे—ती काही काल्पनिक कादंबरी नव्हे !".

केशवसुतांचं सौंदर्यप्रेम आणि सामाजिक ध्येयवाद, ही दोन्ही नकली वा उसनी म्हटल्यावर केशवसुत, आगरकर, मर्ढेकर हे सर्व एकाच गोत्राचे वाटल्यास नवल नाही ! मर्ढेकरी कविता ही सौंदर्यवाद व ध्येयवाद यांच्याविरुद्ध झालेली cynical प्रतिक्रिया होय· तर उलट सौंदर्याने मनात उभी राहणारी स्वप्ननगरी आगरकरांना सांगूनही समजण्यासारखी नव्हती ! आणि तरी हे तिथे एकच असे जी टीका सांगते, तिची मूल्ये तरी कोणती ?

प्रो. जोग विचारतात : "म्हणून केशवसुतांचा संप्रदाय वेगळा होता व आजचा संप्रदाय वेगळा असे समजण्याचे कारण काय ?"

उत्कटतेचा, प्रेमाचा, आणि ध्येयवादाचा मोक्ता जिगर मुरादाबादी यानं जे उत्तर देऊन ठेवलं आहे, तेच या प्रश्नाचे उत्तर !

"अरे, आग है आग ! पानी नहीं है !"

केशवसुतांची '—प्रत' (पान २२१ वरून)

केलं त्याला मराठी कवितेत तोड नाही. जुन्या संस्कृत पद्धतींच्या शारीरिक वासनामय प्रणयभावातून उत्तुंग झेप घेऊन तारुण्यसुलभ विकारग्रस्त केशवसुत इथे बाहेर पडले आणि दूरस्थ पत्नीच्या अद्वैताचा निरागस साक्षात्कार एकाएकी त्यांच्या व्यक्तित्वाला झाला.

करीं घेतां परि पत्र हें लिहाया
खुशालीचें क्षीणत्व दिसे फार !

मग त्यांना प्रत्यंतर आलं की आपल्या पत्नीच्या ान्निध्यात एकेक युग क्षणासारखं जातं आणि आता जवळ नसताना आपल्यातलं चैतन्यच नामशेष न एकेक क्षण युगासारखा जाता जात नाही. प्रत्यक्ष सान्निध्य नसताना आता कसली खुशाली ? खुशाल आहे असं खोटंच का लिहायचं ? त्या र्विकल्प प्रेमसमाधीत मग एकच जाणीव उरली की—

लोचनाला या होसि तूं प्रकाश,
मदीयात्म्याचा तूंच गे विकास;
नाडि माझी तव करीं वाहताहे,
हृदय माझें तव उरीं हालताहे !

—आणि असे जर आहे तर आता पत्र लिहिण्याचे प्रयोजन तरी काय ? कवीनी तिला एक मूकसंदेश दिला की—

करा अपुल्या तू पहा चाचपून,
उरा अपुलिया पहा तपासून

आपलीच नाडीपरीक्षा पहा. आपल्या हृदयाचे ठोके मोज. माझ्या निकट सान्निध्याच्या जाणीवेनं तुझं मन उल्लसित झालं म्हणजे ज्या निरागस आनंदाचा तुला प्रत्यय येईल तीच तुझी प्रकृती. त्याचवेळी मीही इकडे तंदुरस्तीतच असेन आणि माझ्या विरहानं तुझा जीव कासावीस झाला, पंचप्राण तळमळू लागेल त्या औदासीन्याच्या अवस्थेत जीव मेताकुटीस आला म्हणजे तुला जेव्हा ओकंओकं वाटेल तीच तुझी विकृती. त्यावेळी समज की मीही इकडे तुझ्याकरिता जीव पाखडीत आहे व माझ्याही जीवाला अगदी बरं वाटत नाही.

प्रकृति माझीही तिथे तुज कळेल,
विकृति माझी तुज तिथे आढळेल

अशी ही केशवसुतांची कविता केवळ अप्रतिम आहे. तिची गोडी अवीट आहे. पतीपत्नींच्या अलौकिक तादात्म्याचा–अद्वैताचा हा साक्षात्कार केवळ अपूर्व आहे.

संपादकीय—

'केशवसुतां'ची प्रतिभा इंग्रजी हैमकोशाने प्रस्फुरित झाली असेल, पल्लवित झाली असेल, इमर्सन, आगरकर आदींच्या विचारांनी पोसलीही गेली असेल. पण १८८५ ते १९०५ ह्या भारतीय पुनरुत्थानाच्या काळात त्या पुनरुत्थानाला मराठी मनाचा एक प्रतिसाद ह्या नात्याने तिची कामगिरी महनीयच समजली पाहिजे. नाही तर उण्या एकोणचाळीस वर्षांचे आयुर्मान लाभलेल्या ह्या कवीची स्मृती मृत्यूत्तर एकसष्ट वर्षे जागृत ठेऊन त्याचा जन्मशताब्दी समारोह साजरा करण्यास साहित्यकारांपासून सरकारापर्यंत जे प्रयत्न चालू आहेत, ते होते ना ! शब्दांची विद्युन्मयता त्यांनी हेरली होती. शारदेच्या 'मंत्रा'ने ते मारून गेले होते, झपाटले होते. अर्थातच 'काव्यं यशसे' किंवा 'स्वान्तःसुखाय' इत्यादी काव्यासंबंधीच्या समजापासून त्यांना सुटका हवी होती. त्यासाठीच 'आहात मोठे पुसतो तुम्हाला ?' हा सवाल त्यांना करावा लागला. कवी नि निसर्ग––मानवसमाज आणि कवी आणि मानव नि मानव ह्यांचे सौहार्द कसे आहे—असावे ह्या संबंधीची एक दृढ कल्पना त्यांनी आपल्या ठायी रुजवली होती आणि त्यामुळे शब्द काव्य—प्रतिभा हे ज्याप्रमाणे त्यांच्या कवितेचे विषय झाले त्याचप्रमाणे अंत्यजाचा मुलाचा प्रश्नही, त्यांचा प्रश्न झाला आणि मजुरांच्या उपासमारीची खंत त्यांचा काव्यविषय होऊ शकली. शब्दांच्या श्रुतिमनोहरतेपेक्षा शब्दार्थाच्या सामर्थ्यावरच ते अधिक निर्भर होते. अल्पाक्षर बह्वर्थदर्शक 'चतुर्दशपद्या' म्हणूनच त्यांच्या प्रकृतीस मानवल्या. केशवसुतांची प्रतिभा भारतीय पुनरुत्थानाच्या काळात या पुनरुत्थानाला मराठी मनाचा एक प्रतिसाद असे न म्हणता, त्यांची प्रतिभा त्या पुनरुत्थानाच्या काळाला उद्देशून घातलेला साद आहे असे म्हटल्यास अधिक सयुक्तिक होईल. कारण बाहू उंचावून आवाहन करणाऱ्या एखाद्या कृष्णद्वैपायनाच्या जाणिवेने त्यांनी काव्य लिहिले. ही हतवेळा जल्शाची नसताना जगाची अशी कशी गाफिलगिरी !

* * *

सर्वत्र गतिवाचक शब्दरचना हे केशवसुतांच्या शैलीचे एक वैशिष्ट्य आहे. जडत्व आणि स्थिरत्व केशवसुतांच्या प्रकृतिधर्मात नव्हते. त्यांच्या कवितांची पहिली नि दुसरी ओळ ह्या दृष्टीने अभ्यसनीय ठरावी. वानगीदाखल काही उदाहरणे पाहा—घारेवरी जाउनि देव पोचला; जायाचे जग हे असेच, रवी उतरतो आहे समुद्रावरी, सिद्ध झालो मी दूर जावयाला; उद्या प्रातःकाळी इथुन मजला जाणे निघणे, फिरायास मी मित्र घेवोनि गेलो; नाही ज्यापरि डोंगळा......; आत्माराम सुखें वनामधुनि तो होता जरा हिंडत; तेजाचे पंख वाऱ्यावरि हलवित ती चालली शब्दपंक्ति; दूर कोठे एकला जाउनीया; तुम्ही दोघे कोठुनि चुकला इकडे हो वाटे; रानोमाळ कुठे तरि तुजविणे मी हिंडता वेचली......इत्यादी इत्यादी.

* * *

ह्या अंकाच्या निमित्तानं अनेक सारस्वतांना लेखांची मागणी केली होती. ज्या साहित्यिक–कवी–समीक्षकांनी ह्या अंकास लेखनसाहित्य पुरवले त्यांचे अत्यंत आभारी आहोत. श्री. वेडेकर आणि श्री. चित्रे ह्यांचे आभार मानण्यास जवळ शब्द नाहीत. सहा महिन्यापासून त्यांचे लेख हाताशी आहेत. ज्या कवींनी केशवसुत काव्यदर्शनासाठी कविता निवडून तिचे रसग्रहण युगवाणीत छापण्यासाठी आधी पाठविण्याचे श्रम घेतले, त्यांचे किती आभार मानावेत ! 'कवींच्या दृष्टिकोनातून केशवसुत' हे त्यामुळे साध्य होऊ शकले. हे ह्या अंकाचे एक वैशिष्ट्य ठरावे. केशवसुत जन्मशताब्दी, केशवसुतांच्या जन्मतिथीसंबंधीच्या वादाने गाजली. जन्मशताब्दीचे वर्ष त्यामुळे तरी चांगलेच स्मरणात ठसावे. त्याचा वाद पुढील पिढ्यांना वारसा हक्काने आपण करू दिला नाही ह्या गोष्टीचा त्यांचा रोष आपणावर होऊ नये म्हणजे मिळविली !

केशवसुतांच्या स्मृतीस हा अंक सादर समर्पण.

—मा. नी. गलगलीकर

अनुक्रमणिका

संघवार्ता

बाबुराव चिमोटे
सरचिटणीस, वि. सा. संघ, यांजकडून

भेट

मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालयाचे प्रमुख कार्यवाह श्री. वा. वि. भट, भारतीय विद्याभवनाचे डॉ. पंड्या, सिद्धार्थ कॉलेज (मुंबई)चे ग्रंथपाल श्री. शां. शं. रेगे, नाशिक येथील सार्वजनिक वाचनालयाचे ग्रंथपाल श्री. औरंगाबादकर यांनी दि. ५ सप्टेंबर ६६ रोजी सकाळी ९ वाजता वि. सा. संघ आणि श्रीशिवाजी ग्रंथालयाला भेट दिली.

कै. न्या. मू. रानडे आंतर महाविद्यालयीन वादस्पर्धा

वि. सा. संघ आणि वक्तृत्वोत्तेजक सभा पुणे या संस्थांच्या विद्यमाने कै. न्या. मू. रानडे आंतर महाविद्यालयीन वादस्पर्धा दि. २३, २४ आणि २५ सप्टेंबर रोजी आयोजित करण्यात आली.

या स्पर्धेत एकूण १६ महाविद्यालयांनी भाग घेतला.

यावर्षी नागपूर महाविद्यालयाने (नागपूर) फिरती रौप्य ढाल मिळविली.

कु. पद्मिनी नांदे (नागपूर महाविद्यालय) यांना १०० रुपयांचे प्रथम क्रमांकाचे पारितोषिक आणि ६० टक्यांहून अधिक गुण मिळाल्याबद्दल प्रमाणपत्र मिळाले.

श्री. ए. बी. देशमुख (श्रीबिझाणी नगर महाविद्यालय) यांना ७५ रुपयांचे द्वितीय क्रमांकाचे पारितोषिक आणि प्रमाणपत्र मिळाले.

श्री. धनंजय आचार्य (सीताबाई आर्टस् कॉलेज अकोला) आणि श्री. प्रकाश लोथे (मेडिकल कॉलेज नागपूर) यांना ६० टक्यांहून अधिक गुण मिळाल्याबद्दल प्रमाणपत्रे देण्यात आली.

दि. २५ सप्टेंबर ६६ रोजी श्री. कृ. ग. पाठक, डेप्युटी डायरेक्टर ऑफ एज्युकेशन, विदर्भ विभाग, नागपूर यांच्या हस्ते बक्षीस वितरण समारंभ झाला.

या स्पर्धेचेवेळी तीनही दिवस परीक्षक म्हणून ॲड. श्री. म. पु. केळकर, श्री. कृ. अ. कुळकर्णी आणि श्री. मा. नी. गलगलीकर यांनी सहकार्य दिले.

साहित्य गोष्ठी

बुधवार दि. २८ सप्टेंबर ६६ रोजी सायं. ७ वा. 'साहित्य गोष्ठी' ह्या पाक्षिक कार्यक्रमात 'वासुनाका' पुस्तकावर चर्चा झाली.

अनुक्रमणिका

विदर्भ साहित्य संघाचे २६ वे साहित्य संमेलन, काटोल

वि. सा. संघाचे २६ वे वार्षिक अधिवेशन काटोल (जि. नागपूर) येथे शनिवार दि. १७ आणि रविवार दि. १८ सप्टेंबर ६६ रोजी झाले.

संमेलनाचे उद्घाटन दि. १७ सप्टेंबर ६६ रोजी सायं. ६ वा. माननीय बॅ. शेषरावजी वानखेडे अर्थमंत्री, महाराष्ट्र राज्य (मुंबई) यांच्या हस्ते झाले.

संमेलनाचे अध्यक्ष सुप्रसिद्ध साहित्यिक प्रा. डॉ. अ. ना. देशपांडे हे होते.

संमेलनाचा विस्तृत वृत्तांत पुढील अंकात प्रसिद्ध करण्यात येईल.

या अंकासोबत अध्यक्षीय भाषणाची प्रत पाठविली आहे.

परीक्षा समिती—

वि. सा. संघ : परीक्षा समितीच्या विद्यमाने घेण्यात येणाऱ्या सर्व परीक्षा—मराठी प्रवेश ते साहित्य स्नातक—शनिवार दि. ८ आणि ९ ऑक्टोबर १९६६ रोजी होणार आहेत. यावेळी एकूण १५३३ परीक्षार्थी परीक्षेस बसले असून एकंदर ४७ परीक्षा केंद्रे आहेत.

अनुक्रमणिका

मुद्रक : पां. ना. बनहट्टी, नारायण मुद्रणालय, धनतोली, नागपूर १.
प्रकाशक : मा. नी. गलगलीकर, विदर्भ सहित्य संघ, उत्तर अंबाझरी रस्ता, सीतावर्डी, नागपूर १.

अनुक्रमणिका